विभागाने श्री.नानेगांवकर यांना वरीलप्रमाणे देय वेतनानुसार झालेले कमी-जादा वेतन वसुलीचे विवरणपत्रात रक्कम रु.१०३०५८/- वसुली दर्शविली असून माहे सप्टेंबर-२०१६ च्या वेतनातून कपातीची कार्यवाही चालू केल्याचे अनुपालनात कळविले आहे. तथापि सदरची रक्कम पूर्णपणे वसुली झाली नसून सेवापुस्तकात तशी नोंद केल्याचे अगर वेतन देयकातून अतिप्रदान रक्कम वसुली केल्याबाबत संबंधित महिन्यांची वेतन देयके लेखा परीक्षणात दर्शविली नसल्याने अतिप्रदान रक्कम परिपूर्ण वसुली करून संबंधित लेख्यांसह लेखा परीक्षणास अनुपालन करणे आवश्यक आहे.

3) सेवापुस्तकातील नोंदीचे अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची वैयक्तीक नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

(DGPV11MT001 (Ref No : 11, Item No : 123)

## 9 *श्री.किरण राठोड, यांच्या वेतन निश्चितीबाबत व सेवापुस्तकातील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 04

*लेखा शीर्ष : आस्थापना मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
**गुंतलेली रक्कम** रु. 117566.00 /-
**वसूलपात्र रक्कम** रु. 117566.00/-

***श्री.किरण राठोड, उपअभियंता यांची चुकीची वेतन निश्चिती झाली आहे. त्यांची वैयक्तिक नस्ती, मनपा सेवेत रुजू नोंद अहवाल, सेवेत कायम नोंद याबाबतचे आदेश लेखा परीक्षणात उपलब्ध झाले नसून सहावा वेतन आयोग वेतन निश्चिती विवरणपत्र सेवापुस्तकात जोडले नाही.***

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाचे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात अधिकारी कर्मचारी यांची सेवापुस्तके तपासणीत श्री.किरण राठोड, उपअभियंता यांचे सेवापुस्तक तपासता आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.१२४ दिनांक ०२/१२/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.मनपा/सा.प्र.वि./२००२/२०१७ दिनांक २८/०२/२०१७ चे पत्र प्रत्यक्ष प्राप्त दिनांक ०६/०३/२०१७ हे लेखा परीक्षणात मुदतीत सादर न करता विलंबाने सादर केले आहे सदर केलेला खुलासा व सोबतचे सादर अभिलेखे तपासून लेखा परीक्षणात खालील अभिप्राय आहेत.

१) श्री. राठोड, कनिष्ठ अभियंता हे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सेवेत कार्यरत होते आदेश क्र. संकीर्ण-२००२/साप्रमु/प्रक्र९१३ दिनांक २३/०५/२००२ च्या आदेशान्वये कार्यालयीन वेळेनंतर सेवामुक्त केले आहे. तथापि ते कोणत्या दिवशी मिरा-भाईंदर महानगरपालिका सेवेत हजर झाले याची नोंद सेवापुस्तकात आढळून आली नाही. तरी ते सेवेत हजर झाल्याचे रुजू अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध करून दर्शवावा. सहाव्या वेतन आयोगाचे विवरणपत्र सेवा पुस्तकात जोडले नाही.

२) श्री. राठोड यांना कनिष्ठ अभियंता या पदावर सेवेत कायम केल्याची नोंद सेवापुस्तक आढळून आली नाही. सबब सेवेत कायम केल्याचे आदेश लेखा परीक्षणास उपलब्ध करावेत.

३) श्री. राठोड यांना दिनांक ३०.०३.२००७ पासून उप अभियंता या पदावर सुधारित वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० (असुधारीत वेतनश्रेणी रु.८०००-२७५-१३५००) मध्ये पदोन्नती आहे. तथापि त्यांची सेवापुस्तकात केलेली वेतन निश्चिती चुकीची असल्याने त्यांना दिलेले व देय वेतन खालीलप्रमाणे आहे.

| दिलेले वेतन | | | देय वेतन | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतन | तपशिल | दिनांक | वेतन | तपशिल |
| ०१.०८.२००५ | ६३५० | | ०१.१२.२००५ | ६३५० | |
| ०१.०१.२००६ | ११८२०+५४०० | | ०१.०१.२००६ | ११८२०+४२०० | |
| ०१.०७.२००६ | १२३१०+५४०० | ग्रेड पे दर्शविलेले | ०१.०७.२००६ | १२३००+४२०० | |
| ३०.०३.२००७ | १५६००+५४०० | नाही | ३०.०३.२००७ | १२३००+५४०० | विकल्पनुसार |
| ०१.०७.२००७ | १६६२०+५४०० | | ०१.०७.२००७ | १२३००+५००+५१०= १३३१०+५४०० | |
| ०१.०७.२००८ | १७२९०+५४०० | | ०१.०७.२००८ | १३८८०+५४०० | |
| ०१.०७.२००९ | १७९८०+५४० | | ०१.०७.२००९ | १४४६०+५४०० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ० | | | | |
| ०१.०७.२०१० | १८६९०+५४०० | | ०१.०७.२०१० | १५०६०+५४०० | |
| ०१.०७.२०११ | १९४२०+५४०० | | ०१.०७.२०११ | १५६८०+५४०० | |
| ०१.०७.२०१२ | २०१७०+५४०० | | ०१.०७.२०१२ | १६३२०+५४०० | |
| ०१.०७.२०१३ | २०९४०+५४०० | | ०१.०७.२०१३ | १६९८०+५४०० | |
| ०१.०७.२०१४ | काढले नाही | | ०१.०७.२०१४ | १७६६०+५४०० | |
| ०१.०७.२०१५ | काढले नाही | | ०१.०७.२०१५ | १८३६०+५४०० | |

विभागाने श्री.राठोड यांना वरीलप्रमाणे देय वेतनानुसार झालेले कमी-जादा वेतन वसुलीचे विवरणपत्रात रक्कम रु.११७५६६/- वसुली दर्शविली असून माहे सप्टेंबर-२०१६ च्या वेतनातून कपातीची कार्यवाही चालू केल्याचे अनुपालनात कळविले आहे. तथापि सदरची रक्कम पूर्णपणे वसुली झाली नसून सेवापुस्तकात तशी नोंद केल्याचे अगर वेतन देयकातून अतिप्रदान रक्कम वसुली केल्याबाबत संबंधित महिन्यांची वेतन देयके लेखा परीक्षणात दर्शविली नसल्याने अतिप्रदान रक्कम परिपूर्ण वसुली करून संबंधित लेख्यांसह लेखा परीक्षणास अनुपालन करणे आवश्यक आहे.

४) सेवापुस्तकातील नोंदीचे अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची वैयक्तीक नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

DGPVTTM7001 Ref No : 12 ...

### *10 श्री.सुरेश वाकोडे, कार्यकारी अभियंता यांच्या वेतन निश्चितीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : आस्थापना मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

**गुंतलेली रक्कम** रु. 94643.00 /-

**वसूलपात्र रक्कम** रु. 94643.00/-

***श्री.सुरेश वाकोडे, कार्यकारी अभियंता यांना जादा वेतन प्रदान झाले आहे. सेवापुस्तकात ६ वा वेतन आयोग विवरणपत्र जोडले नसून वैयक्तिक नस्ती लेखा परीक्षणात उपलब्ध झाली नाही.***

श्री.सुरेश वाकोडे, कार्यकारी अभियंता यांचे सेवापुस्तक व वेतननिश्चिती तपासता आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र. १२५ दिनांक ०५/१२/२०१६ अन्वये कळविले असता विभागांने त्यांचे पत्र क्र.मनपा/सा.प्र.वि./२००२/२०१७ दिनांक २८/०२/२०१७ चे पत्र प्रत्यक्ष प्राप्त दिनांक ०६/०३/२०१७ हे लेखा परीक्षणात मुदतीत सादर न करता विलंबाने सादर केले आहे सदर केलेला खुलासा व सोबतचे सादर अभिलेखे तपासून लेखा परीक्षणात खालील अभिप्राय आहेत.

१)श्री. वाकोडे यांची प्रथम नियुक्ती दिनांक १४/०७/२००६ झाली त्यावेळी त्यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडील सेवा व वेतन विचारात घेऊन वेतन निश्चित केले आहे. त्यावेळी त्यांचे वेतनश्रेणी रु.८०००-२७५-१३५०० मध्ये वेतन १०२०० होते. त्यांना सुधारित वेतन श्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० दिले असून त्यांचे दिलेले व देय वेतन खालीलप्रमाणे आहे.

| दिलेले वेतन | | | देय वेतन | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतन | तपशिल | दिनांक | वेतन | तपशिल |
| १४.०७.२००६ | १८९८०+५४०० | ग्रेड पे वेतन दर्शविले नसून मंजूर केले नाही. | १४.०७.२००६ | १८९८०+५४०० | |
| ०१.०७.२००६ | १९७२०+५४०० | | ०१.०७.२००६ | — | |
| ०१.०७.२००७ | २०४८०+५४०० | | ०१.०७.२००७ | १९७२०+५४०० | |
| ०१.०७.२००८ | २१२६०+५४०० | | ०१.०७.२००८ | २०४८०+५४०० | |
| ०१.०७.२००९ | २२०६०+५४०० | | ०१.०७.२००९ | २१२६०+५४०० | |
| ०१.०७.२०१० | २२८९०+५४०० | | ०१.०७.२०१० | २२०६०+५४०० | |
| ०१.०७.२०११ | २३७४०+५४०० | | ०१.०७.२०११ | २२०६०+८३०=<br>२२८९०+६६०० | पदोन्नती |
| ०१.०७.२०१२ | २४६५०+५४०० | | ०१.०७.२०१२ | २३७८०+६६०० | |
| ०१.०७.२०१३ | २५५९०+५४०० | | ०१.०७.२०१३ | २४७००+६६०० | |
| ०१.०७.२०१४ | वेतन काढले नाही | | ०१.०७.२०१४ | २५६४०+६६०० | |

विभागाने श्री.वाकोडे यांना वरीलप्रमाणे देय वेतनानुसार झालेले कमी-जादा वेतन वसुलीचे विवरणपत्रात रक्कम रु.९४६४३/- वसुली दर्शविली असून माहे सप्टेंबर-२०१६ च्या वेतनातून कपातीची कार्यवाही चालू

केल्याचे अनुपालनात कळविले आहे. तथापि सदरची रक्कम पूर्णपणे वसुली झाली नसून सेवापुस्तकात तशी नोंद केल्याचे अगर वेतन देयकातून अतिप्रदान रक्कम वसुली केल्याबाबत संबंधित महिन्यांची वेतन देयके लेखा परीक्षणात दर्शविली नसल्याने अतिप्रदान रक्कम परिपूर्ण वसुली करून संबंधित लेख्यांसह लेखा परीक्षणास अनुपालन करणे आवश्यक आहे.

२) संबंधितांचे ६ वा वेतन आयोग वेतननिश्चिती विवरणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही.

३) सेवापुस्तकातील नोंदीचे अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची वैयक्तीक नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

DGPVTTM7001 (Ref No. D. Item No: 125)

## 11 *महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी बाहय मार्गाने ठेका पद्धतीने कंत्राट देणेच्या कामाबाबत व खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 08

*लेखा शीर्ष : आस्थापना मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1979678.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1979678.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 217761.00/-

***मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विविध कामांसाठी बाहय मार्गाने (Out Sourcing) ठेका पद्धतीने कंत्राटात उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भां १०८८/(२५१२)/उद्योग-६ दिनांक २ जानेवारी ११९२ मधील परीच्छेद क्रमांक ८.३(ह) पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते ६ महिन्यांच्या कालावधी करिताच देणेचे आहेत असे असताना वर्ष २०१२-१३ च्या ठेकेदारास वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये मुदतवाढ देवून नवीन अतिरिक्त नेमणूकीचे कार्यादेश दिले असून त्यांस स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही. वार्षिक होणारा अंदाजित खर्च लक्षात घेऊन मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार विहित रक्कमेचे मुद्रांक पेपरवर करारनामे केले नाहीत. एकूण ३४ संगणकचालक यांचे निविदेतील अटी व शर्तीत नमूद असलेली कागदपत्रे लेखा परीक्षणात उपलब्ध झाली नाहीत. ईपीएफ, ईएसआयसी व व्यवसाय कर रक्कमा कपात करून संबंधित संस्था/ शासन खाती भरणा केल्याची चलने लेखा परीक्षणात उपलब्ध झाली नाहीत. कपात सेवाकर रक्कम शासनखाती भरणा केल्याची चलने लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. विभागाने संगणकचालक यांचे पुरवठा केल्याबाबत व हजेरीबाबत प्रमाणपत्र नोंदविले नाही.***

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विविध कामांसाठी बाह्य मार्गाने ( Out Sourcing) ठेका पद्धतीने कंत्राट देण्यासाठी दिनांक २०/१२/२०११ व दिनांक ३१/१२/२०११ रोजी फ्री प्रेस जर्नल व दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात निविदा प्रसिद्धी केली त्यास अनुसरून ६ निविदा प्राप्त झाल्या त्यात संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता न केल्याने सदरची निविदा प्रक्रिया रद्द केली. दिनांक ११/०२/२०१२ दैनिक नवाकाळ या वर्तमानपत्रात व ई निविदा पद्धतीने निविदा मागविली त्यात १ निविदा मे.जी.ए.डीजीटल वेबवर्ड प्रा.लि. प्राप्त झाली सदरची निविदा मंजूर करून त्यांना ठेका दिला आहे.

वर्ष २०१३-१४ एकूण २३ संगणकचालक व वर्ष २०१४-१५ एकूण ३४ संगणकचालक कार्यरत असल्याचे नस्तीवरून दिसून आले असून वर्ष २०१२-१३ पासून पुढे प्रत्येक वर्षी सदर ठेक्यास मुदतवाढ दिली आहे. सदर ठेक्याबाबत व खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भां १०८८/(२५१२)/उद्योग-६ दिनांक २ जानेवारी ११९२ मधील परीच्छेद क्रमांक ८.३(ह) पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते ६ महिन्यांच्या कालावधी करिताच देणेचे आहेत असे असताना वर्ष २०१२-१३ च्या ठेकेदारास वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये मुदतवाढ दिली असून मुदतवाढ मिळालेल्या कालावधीत नव्याने अतिरिक्त कंत्राटी ठेका कर्मचारी नियुक्त करता येत नसतानादेखील नवीन अतिरिक्त नेमणूकीचे कार्यादेश दिले असून त्यांस स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही.

२) संबंधित ठेकेदार मे.जी.ए.डीजीटल वेबवर्ड प्रा.लि. यांचे बरोबर वर्ष २०१२-१३ या वर्षाचा करारनामा दिनांक ०१/०६/२०१२ रोजी रक्कम रु.१००/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. तसेच वर्ष २०१३-१४ व त्यापुढील वर्षाकरीता नव्याने करारनामा केले नाहीत. प्रस्तुत प्रकरणी वार्षिक होणारा अंदाजित खर्च लक्षात घेऊन मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार विहित रक्कमेचे मुद्रांक पेपरवर करारनामे केले नाहीत. तरी कामाचे मुल्यानुसार मुद्रांक शुल्क रक्कम वसुली केल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले नाही.

३) एकूण ३४ संगणकचालक यांचे निविदेतील अटी व शर्तीनुसार एस.एस.सी. उत्तीर्ण, एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण, शासनमान्य परीक्षा प्रमाणपत्र मराठी व इंग्रजी ३० शब्द प्रती मिनिटे टंकलेखन असलेची कागदपत्रे लेखा परीक्षणात उपलब्ध झाली नाहीत.

४) वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये झालेल्या खर्चापैकी खालील प्रमाणके लेखा परीक्षणात उपलब्ध झाली. उर्वरित महिन्यांची प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल | पुरवठा महिना | इतर तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १११ | २०२०१३.०५. | २२७९४८ | २३ संगणकचालक | जाने२०१३. | |
| ०२ | १११ | २०.०५.२०१३ | २०२०४७ | १९ संगणकचालक | फेब्रु२०१३. | |
| ०३ | २९५ | २१२०१३.०६. | २०२८१० | १९ संगणकचालक | मार्च २०१३ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | २९५ | २१.०६.२०१३ | १९४६२५ | १९ संगणकचालक | एप्रिल २०१३ | ईपीएफ झेरॉक्स चलन प्रत मार्च २०१३ ची जोडली आहे. ईएसआयसी झेरॉक्स चलन प्रत जानेवारी २०१३ ची जोडली आहे. |
| ०५ | ७४१ | ०५.०९.२०१३ | २२४१५८ | २१ संगणकचालक | जुलै २०१३ | |
| ०६ | ३५२ | ०४.०८.२०१४ | २४२८३८ | २३ संगणकचालक | फेब्रु२०१४. | |
| ०७ | ३५२ | ०४.०८.२०१४ | २३०३५७ | २३ संगणकचालक | मार्च २०१४ | |
| ०८ | ३५२ | ०४.०८.२०१४ | २३५९०१ | २३ संगणकचालक | एप्रिल२०१४ | |
| ०९ | ४०४ | १९.०८.२०१४ | २१८९९४ | २२ संगणकचालक | मे २०१४ | |
| | | एकूण रक्कम रु. | **१९७९६७८** | | | |

वरील खर्च प्रमाणकांबाबत लेखा परीक्षणात खालील अभिप्राय आहेत.

अ) माहे मार्च २०१३ महिन्यांच्या देयकांचे प्रदानासोबत माहे मार्च २०१३ चे ईएसआयसी झेरॉक्स चलन प्रत ठेकेदाराने सादर केली नाही.

ब) उर्वरित सर्व महिन्यांचे देयकासोबत ईपीएफ, ईएसआयसी व व्यवसाय कर रक्कमा कपात करून संबंधित संस्था / शासन खाती भरणा केल्याची चलने देयकासोबत ठेकेदाराने सादर केलेली नसताना देयकांचे प्रदान कसे काय करणेत आले याबाबत लेखा परीक्षणास खुलासा करणेत यावा.

क) उपरोक्त खर्च प्रमाणकांत एकूण रक्कम रु.१९७९६७८/- वर १२.३६% सेवा कर रक्कम रु.२,१७,७६१/- संबंधित ठेकेदारास प्रदान केला आहे परंतु सदर रक्कम शासनखाती भरणा केल्याची चलने लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे रक्कम रु.२१७७६१/- वसूलपात्र व खर्च रक्कम रु.१९७९६७८/- आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

ड) संबंधित ठेकेदाराचे बिलावर विभागाने संगणकचालक यांचे पुरवठा केल्याबाबत व हजेरीबाबत प्रमाणपत्र नोंदविले नाही.

D(?)V : 1(?)7001 (Ref No : 14, Hmm No : 143)

*12 आस्थापना विषयक बाबींचे परीक्षण करणारी मनपांतर्गत कार्यपध्दती अस्तित्वात नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष : आस्थापना मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 588287000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 588287000.00/-

***महानगरपालिकेने वर्ष २०१४-१५ मध्ये स्थायी-अस्थायी आस्थापनेवर ५८.८३ इतका महसुली खर्चात आस्थापना विषयक खर्चाचा सर्वात मोठा हिस्सा असून सदर खर्च हा अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वेतन श्रेणी, वेतन निश्चिती, वार्षिक वेतनवाढ व पदोन्नतीवर अवलबुन असतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेंतर्गत शासन मान्य आकृती बंधानुसार वेगवेगळया संवर्गात कार्य करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा व वेतन विषयक बाबींची परीक्षण करणारी स्थायी कार्यपध्दती अस्तित्वात नसल्यामुळे चुकीची वेतन निश्चिती होणे, जास्तीच्या मुळ वेतनावर वेतन आहरीत करणे, पदोन्नती देतांना विविध शासन निकषांचे पालन न होणे व त्यामुळे सेवानिवृत्ती विषयक लाभांच्या चुकीच्या परिगणना होणे या स्वरुपातील सर्वसाधारण अनियमितता लेखा परीक्षणात निदर्शनास आल्या असल्याने याबाबत वेतन पडताळणी विषयक स्थायी कार्यपद्धती निर्मिती करणे आवश्यक आहे.***

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या वर्ष २०१४-१५ या वर्षाच्या लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे आस्थापना विषयक खर्चाची वार्षिक लेख्यात नोंद आढळून आली. गोषवारा पुढील प्रमाणे

| अ.क्र | विभाग | सन 2014-15 | | |
|---|---|---|---|---|
| | | स्थायी | अस्थायी | एकूण |
| 1 | सामान्य प्रशासन | 370.16 | 129.29 | 499.45 |
| 2 | स्थानिक संस्था कर | 273.45 | 4.1 | 277.55 |
| 3 | कर विभाग | 413.26 | 0 | 413.26 |
| 4 | वाहन विभाग | 91.04 | 69 | 160.04 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | सार्व. आरोग्य विभाग | 1927.72 | 0 | 1927.72 |
| 6 | रूग्णालय | 504.3 | 99.13 | 603.43 |
| 7 | अतिक्रमण विभाग | 0 | 7.99 | 7.99 |
| 8 | सार्व. बांधकाम विभाग | 296.85 | 98.69 | 395.54 |
| 9 | ग्रंथालय विभाग | 10.79 | 0 | 10.79 |
| 10 | संगणक विभाग | 0 | 109.5 | 109.5 |
| 11 | वृक्षप्राधिकरण विभाग | 56.19 | 159.31 | 215.5 |
| 12 | बालवाडी | 81.38 | 4.33 | 85.71 |
| 13 | अग्निशमन विभाग | 0 | 0 | 0 |
| 14 | मिळकत विभाग | 0 | 36.52 | 36.52 |
| 15 | पाणी पुरवठा विभाग | 259.13 | 114.78 | 373.91 |
| 16 | शिक्षण विभाग | 668.62 | 97.34 | 765.96 |
| एकूण | | 4952.89 | 929.98 | 5882.87 |

वरील प्रमाणे स्थायी / अस्थायी आस्थापनेवर वर्ष 2014-15 साठी रू.58.83 कोटी एवढा खर्च झालेला आहे. सदर आर्थिक वर्षामध्ये एकूण महसुली खर्च हा रू.268.87 कोटी आला आहे. एकूण महसुली खर्चाशी आस्थापना विषयक खर्चाचे प्रमाण हे 21.88% आहे. एकूण महसुली खर्चात आस्थापना विषयक खर्चाचा सर्वात मोठा हिस्सा आहे. सर्वसाधारणपणे आस्थापना विषयक खर्च हा अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतन श्रेणी, वेतन निश्चिती, वार्षिक वेतनवाढ व पदोन्नतीवर अवलबुन असतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेंतर्गत शासन मान्य आकृती बंधानुसार वेगवेगळया संवर्गात कार्य करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा व वेतन विषयक बाबींची परीक्षण करणारी स्थायी कार्यपध्दती अस्तित्वात नसल्यामुळे चुकीची वेतन निश्चिती होणे, जास्तीच्या मुळ वेतनावर वेतन आहरीत करणे, पदोन्नती देतांना विविध शासन निकषांचे पालन न होणे व त्यामुळे सेवानिवृत्ती विषयक लाभांच्या चुकीच्या परिगणना होणे या स्वरूपातील सर्वसाधारण अनियमितता निदर्शनास आल्या आहेत, याबाबत लेखापरीक्षणात स्वतंत्रपणे अर्धसमासपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत. तरी त्याअनुषंगाने वेतन पडताळणी विषयक स्थायी कार्यपध्दतीच्या निर्मितीसह अनुपालन सादर करावे

DATVGSM7201 (Ref No : 66, Item No : 150)

*13 सार्वजनिक आरोग्य (घनकचरा) विभागाची यंत्रसामुग्री/वाहने पुरवठा प्रमाणके तपासणीत आढळून आलेल्या अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 02

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4032129.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4032129.00/-

***प्रमाणकासोबत पुरवठादार/ ठेकेदार यांची बिले/इनव्हाईस नसताना देयकांचे नियमबाह्य प्रदान केले आहे. पुरवठादाराने पुरविलेली यंत्रसामुग्री वाहनांचे दैनंदिन वापराचे लॉगबुक ठेवलेले नाही.***

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य (घनकचरा) विभागाचे वर्ष २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात विभागाची यंत्रसामुग्री/वाहने पुरवठा प्रमाणके तपासणीत आढळून आलेल्या खालील अनियमिततावाबत अर्धसमास पत्र क्र.५७ दिनांक १९/०९/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने केलेला खुलासा विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

१)खालील खर्चाच्या प्रमाणकासोबत पुरवठादार/ ठेकेदार यांची बिले/इनव्हाईस नसताना देयकांचे नियमबाह्य प्रदान केले असल्याचे दिसून आले आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. दिनांक | रक्कम रु. | पुरवठादार/ ठेकेदार | तपशिल | इतर अनियमितता |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ४६९/३.९.२०१४ | १००६०४२ | मे.गणेश अर्थमुव्हिंग | यंत्रसामुग्री/वाहने पुरवठा | दैनिक वापर विवरणपत्र |
| ०२ | ४६९/३.९.२०१४ | १०९८२७४ | मे.गणेश अर्थमुव्हिंग | यंत्रसामुग्री/वाहने पुरवठा | दैनिक वापर विवरणपत्र |
| ०३ | ५०६/१२.९.२०१४ | १०१८३९५ | मे.गणेश अर्थमुव्हिंग | यंत्रसामुग्री/वाहने पुरवठा | दैनिक वापर विवरणपत्र |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | ५०६/१५.९.२०१४ | ९०९४१८ | मे.गणेश अर्थमुव्हिंग | यंत्रसामुग्री/वाहने पुरवठा | दैनिक वापर विवरणपत्र |
| | एकूण | ४०३२१२९ | | | |

२) उपरोक्त नमूद प्रमाणकांत व इतर अन्य प्रमाणकांद्वारे पुरवठादाराने पुरविलेली यंत्रसामुग्री/वाहनांचे दैनंदिन वापराचे लॉगबुक ठेवलेले नसल्याने प्रमाणकात दर्शविलेल्या वापर दिवस व तासांची खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही.

## 14 *पर्यावरण सद्यस्थिती अहवाल खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 03

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 905375.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 905375.00/-

***प्रमाणकासोबत मे. एनव्हायरो अनालिस्ट आणि इंजि. प्रा. लि. यांनी केलेल्या कामाचे बिल/इनव्हाइस नसताना प्रदान केले आहे. करारनाम्यातील अट क्रमांक २ नुसार मनपा क्षेत्रांतील हवा, पाणी, माती, ध्वनी परीक्षण करताना संबंधित विभागाचे प्रभाग अधिकारी यांना परीक्षणापूर्वी दोन दिवस अगोदर कळवून त्यांच्या उपस्थितीत परीक्षण अहवाल सादर करणे आवश्यक असता तसे केलेले नसून असे अहवाल दप्तरी नाहीत.***

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य (घनकचरा) विभागाचे वर्ष २०१४-१५ या वित्तीय वर्षात पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणेवर खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| पर्यावरण अहवाल वर्ष | प्रमाणक क्र./दिनांक | रक्कम रु. | प्रदान तपशिल |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | १०६०/२४.०३.२०१५ | ५३९७७५ | ऑक्टोबर २०१३ ते जून २०१४ |
| २०१४-१५ | ११३८/३१.०३.२०१५ | ३६५६०० | जुलै २०१४ ते डिसेंबर १४ |
| | एकूण खर्च | ९०५३७५ | |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७(अ) अन्वये महानगरपालिकेने दरवर्षी जुलै पूर्वी मनपा क्षेत्रातील पर्यावरण सद्‍स्थिती अहवाल प्रसिध्द करणेचे आहे. त्यानुसार वर्ष २०१३-१४ मध्ये दिनांक २९/३/२०१३ रोजी निविदा प्रसिध्द करून निविदा मागविल्या होत्या प्राप्त ३ निविदाधारकांची कागदपत्रे परिपूर्ण नसल्याने दिनांक ०९/०५/२०१३ रोजी फेरनिविदा मागविल्या त्यातील मे.एनव्हायरो अनालिस्ट आणि इंजि. प्रा.लि. यांची न्यूनतम दराची निविदा वाटाघाटीत दर मंजूर करून कार्यादेश क्र. मनपा/आरोग्य/९०/१२६५/२०१३-१४ दिनांक २६/०६/२०१३ अन्वये दिला. तर वर्ष २०१४-१५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या निविदा नस्ती लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. मे.एनव्हायरो अनालिस्ट & इंजि. प्रा.लि. यांना माहे ऑक्टोबर २०१३ ते जून २०१४ या ९ महिने कालावधीची रक्कम प्रमाणक क्र. १०६० दिनांक २४.०३.२०१५ अन्वये रु. ५३९७७५/- व प्रमाणक क्र. ११३८ दिनांक ३१/०३/२०१५ अन्वये माहे जुलै २०१४ ते डिसेंबर-२०१४ या ६ महिने कालावधीची रक्कम रु. ३६५६००/- प्रदान केली आहे. सदर खर्चाबावत अर्धसमास पत्र क्र.५६ दिनांक १९/०९/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) प्रमाणक क्र.१०६० दिनांक २४/०३/२०१५ सोबत मे.एनव्हायरो अनालिस्ट & इंजि. प्रा.लि. यांचे केलेल्या कामाचे बिल/इनव्हाइस नसताना संबंधितास नियमबाहय प्रदान केले आहे.

२) मे.एनव्हायरो अनालिस्ट & इंजि. प्रा.लि. यांचेसोबत महानगरपालिकेने करारनामा केला आहे करारनाम्यातील अट क्रमांक २ नुसार मनपा क्षेत्रातील हवा, पाणी, माती, ध्वनी परीक्षण करताना संबंधित विभागाचे प्रभाग अधिकारी यांना परीक्षणापूर्वी दोन दिवस अगोदर कळवून त्यांच्या उपस्थितीत परीक्षणं अहवाल सादर करणेचे आहे. मे. एनव्हायरो अनालिस्ट & इंजि. प्रा.लि. यांनी प्रभाग अधिकारी यांना २ दिवस अगोदर कळविल्याचे व प्रभाग अधिकारी यांचे उपस्थितीत हवा, पाणी, माती, ध्वनी परीक्षण केल्याचे मासिक अहवाल नस्तीत अथवा प्रमाणकासोबत उपलब्ध झाले नाहीत.

३) करारनाम्यातील अट क्र.१५,१७,१८,१९,२०,२३,२४,२५ व २६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित ठिकाणी हवा, पाणी, ध्वनी, माती प्रदूषणाचे नमुने प्रभाग अधिकारी यांचे उपस्थितीत नमुने घेऊन अहवाल सादर केल्याबाबतचे अहवाल दप्तरी उपलब्ध नसल्याचे दिसून आले आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 2, Hmm No : 56)

### *15 पावसाळ्यापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई व खोदाई करणे, गाळ माती वाहतूक करणेकामी आवश्यक यंत्रसामुग्री, मजूर पुरवठा व इतर साहित्य पुरवठा करणेच्या निविदे व खर्चाबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 02

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5931271.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5931271.00/-

***नालेसफाई च्या प्रमाणकासोबत मोजमाप पुस्तिका, दैनिक विवरणपत्रे, मशिनरी वापराची चलने उपलब्ध झाली नाहीत. मे. मे.एम.ई.प्रोजेक्ट प्रा.लि यांची प्रमाणकासोबत मुळ मागणी बिल/देयक नसताना ठेकेदारास रक्कम प्रदान केली आहे.***

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील कच्चे व पक्के नाले यांची पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, खोदाई, गाळ, माती वाहतूक करणेच्या कामाकरिता विविध आवश्यक यंत्रसामुग्री व मजूर पुरवठा करणे व साचणारे पाणी उपसा करणेकामी सक्शन पंप पुरवठा करणे व बसविणेचे कामाकरिता निविदा प्रक्रिया करणेत आली होती. सदर कामासाठी प्राप्त निविदापैकी यंत्रसामुग्री, मजूर पुरवठा मे.एम.ई. प्रोजेक्ट प्रा.लि. यांचे दर प्रभाग क्र.१ व २. व मे.आशापुरा कन्सट्रक्शन यांचे दर प्रभाग क्र.३, ४ साठी व मे.मनोहर ट्रेडिंग कं. यांचे सक्शन पंपसाठीचे प्राप्त न्यूनतम दर वाटाघाटीत मंजूर करून कार्यादेश दिले आहेत. वर्ष २०१४-१५ मध्ये खालील प्रमाणकांद्वारे खर्च केला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र./दिनांक | रक्कम रु. | ठेकेदार | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ४६८/०३.०९.२०१४ | ३१३६३७४ | मे.एम.ई.प्रोजेक्ट प्रा.लि | वर्ष १४-१५ प्रभाग १ नालेसफाई यंत्रसामुग्री व मजूर दि.१२/५/१४ ते १८/६/१४ |
| २ | ४६८/०३.०९.२०१४ | २७९४८९७ | मे.एम.ई.प्रोजेक्ट प्रा.लि | वर्ष १४-१५ प्रभाग २ नालेसफाई यंत्रसामुग्री व मजूर दि.१०/५/१४ ते ०८/०७/१४ |
| | एकूण | ५९३१२७१ | | |

उपरोक्त खर्चाबाबत आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.७५ दिनांक २९/०७/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने सादर केलेले अनुपालन/खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.

१) उपरोक्त नालेसफाई, खोदाई, गाळ उचलणेकामी वापरलेल्या यंत्रसामुग्री/मशिनरी व मजूर वापराचा तपशिल कोणत्या ठिकाणी, कोणत्या नाल्यावर कोणत्या मशिनरी, किती मजूर कोणत्या दिनांकास वापरले, मशिनरी किती तास वापरून नालेसफाई केली आहे यांची मोजमाप पुस्तिका, दैनिक

विवरणपत्रे, मशिनरी वापराची चलने प्रमाणकासोबत आढळून आली नाही. वरील अभिलेख्याचे अभावी ठेकेदारास आलेले प्रदान हे अचुक व अनुज्ञेय असल्याची लेखापरीक्षणास तपासणी करता आली नाही.
२) उपरोक्त अनुक्रमांक २ प्रभाग क्र.०२ च्या नालेसफाई प्रमाणकासोबत स्वछता निरीक्षक खारीगाव, नवघर विभाग व प्रभाग अधिकारी ३ व ४ यांचे स्वाक्षरीत प्रमाणपत्रात एकूण मजूर संख्या ३४९३ दर्शविली आहे तर ठेकेदार मे. मे.एम.ई.प्रोजेक्ट प्रा.लि. यांचे बिलात नियमित ३२११ मजूर (पूर्णवेळ ) व जादा मजूर ७५६ (३ तास) असे एकूण ३९६७ दर्शविले आहेत. तरी जादा मजूरांबाबत समर्पक खुलासा विभागाने केला नाही. तसेच स्वछता निरीक्षक खारीगाव, नवघर विभाग व प्रभाग अधिकारी ३ व ४ यांचे स्वाक्षरीत प्रमाणपत्रात जेसीबी मशीन, पोकलेन मशीन, पोकलेन मशीन बोटसह यांचे वापर तास व डंपर वापर संख्या यांत खाडाखोड, उपरीलेखन केले आहे.

उपरोक्त नमूद त्रुटी व नमूद अभिलेख्यांच्या उपलब्धतेअभावी वरील प्रमाणकांद्वारे झालेला एकूण खर्च रक्कम रु.५९३१२७१/- आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

### *16 वर्ग २ अधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता देय नसताना प्रदान केलेबाबत*

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष : वाहनभत्ता मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 180000.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 180000.00/-

***महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ३३ दिनांक २३/०६/२०११ अन्वये वर्ग-१ चे अधिकारी यांना रक्कम रु.१५,००० देय असताना वर्ग२ च्या विधी अधिकारी श्रीमती सई वडके यांना माहे जाने-१४ ते डिसें-१४ या १२ महिन्यातील एकूण रक्कम रु. १८०००० चे नियमबाह्य प्रदान झाले आहे.***

मिरा-भाईंदर मनपाच्या वाहन विभागाचे वर्ष २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात असे दिसून आले की, स्थायी समिती ठराव क्रमांक ३३ दिनांक २३/०६/२०११ अन्वये वर्ग-१ चे अधिकारी यांना रक्कम रु.१५,०००/- देय आहे. तद्नंतर सदर भत्त्यात पुढे स्थायी समिती ठराव क्रमांक १३० दिनांक २९/०१/२०१६ अन्वये वर्ग-१ व २ चे अधिकारी यांना रक्कम रु.२००००/- इतका भत्ता देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. श्रीमती सई वडके, विधी अधिकारी या वर्ग-२ चे पदावर कार्यरत असताना त्यांना दिलेल्या वाहन प्रतिपूर्ती भत्त्याबाबत अर्धसमास पत्र

क्र. १६१ दिनांक १०/०१/२०१७ अन्वये कळविले असता विभागाने पत्र क्र. मनपा/वाहन/१६२/१६-१७ दिनांक ३१/०१/२०१७ अन्वये कळविलेल्या खुलाशात शासन निर्णय क्र.१००५/प्र.क्र.१३/२००५/विनिमय दिनांक २५/०५२००५ अन्वये स्थायी समिती ठराव क्र.७० दिनांक १८/०६/२००७ व आयुक्त यांचे दिनांक १७/०७/२००७ चे इतिवृत्तानुसार कामकाजाचे स्वरूप पाहून वाहन प्रतिपूर्ती भत्ता अदा करण्यात येतो असे नमूद केले आहे. उपरोक्त नमूद दिनांक २५/०५/२००५ चे शासन निर्णयात सचिव दर्जाखालील, सचिव दर्जाचे व सचिव दर्जावरील अधिकारी ज्यांना वाहन अनुज्ञेय आहे अशा अधिकारी यांना लागू असून सरसकट सर्वच वर्ग-२ चे अधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता देणेत यावा याबाबत शासनाचे स्वयंस्पष्ट आदेश नाहीत. तसेच नमूद स्थायी समिती ठराव व आयुक्त यांचे इतिवृत्त हे सन २००७ मधील असून त्यानंतरची सुधारणा स्थायी समिती ठराव क्र. ३३ दिनांक २३/०६/२०११ झाली असल्याने विभागाने केलेला खुलासा मान्य करता येण्यासारखा नाही. सबब याबाबत लेखा परीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) वाहन विभागाचे लेखा परीक्षणात उपलब्ध झालेल्या अभिलेख्यात असे दिसून ाले की, श्रीमती सई वडके, विधी अधिकारी या वर्ग-२ चे पदावर कार्यरत असून त्यांचे पदाची वेतनश्रेणी रक्कम रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० आहे. असे असताना श्रीमती वडके यांना वाहन विभागाचे उपलब्ध तरतूद/खर्च नोंदवही नुसार माहे जानेवारी १४ पासून प्रती महा रु.१५०००/- वाहन प्रतिपूर्ती भत्ता स्थायी समिती ठराव क्रमांक ३३ दिनांक २३/०६/२०११ नुसार देय नसताना नियमबाह्यरित्या प्रदान केला आहे. तरी सदर लेखा परीक्षण वर्षातील एकूण महिने जाने-१४ ते डिसें-१४ या १२ महिन्यातील एकूण रक्कम रु. १,८०,००० व पुढे ठराव क्रमांक १३० दिनांक २९/०१/२०१६ चा अंमलात येईपर्यंतची रक्कम संबंधिताकडून वसुली करून लेखा परीक्षणास अनुपालन केले नाही.

२) वरीलप्रमाणे उपरोक्त नमूद कालावधीत वर्ग-२ च्या इतर अधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता दिला असल्यास तो वसुली करून लेखा परीक्षणास अनुपालन करावे.

DGPVTTM700 : (Ref No : 17, Hmm No : 161)

## *17 अग्निशमन वॉटर टेंडर चेसीसवर बॉडी बांधणेच्या खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : अग्निशमन अग्निशमन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 284290.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 284290.00/-

*मे. विजय फायर वेव्हीकल पंप्स लि. मुंबई यांचे शासनाचे बरोबर वॉटर टेंडर बॉडी बांधणेचे कामाचे दर करार*

*अस्तित्वात होते. दर कराराचे शेड्युल एक नुसार बॉडी बांधून वाहनाचा डिलिव्हरी कालावधी ४ महिने irrespective of no. of vehicles इतका असताना महानगरपालिका अग्निशमन विभागाने कार्यादेशात ६ नग चेसीसवर बॉडी बांधणेचा कालावधी नियमबाह्यरित्या ८ महिने इतका दिला आहे. अग्निशमन विभागाने नियमबाह्यरित्या कार्यादेशात व करारनाम्यात ८ महिने पुरवठा कालावधी मुदत नमूद करून त्यानंतर विलंबाने पुरवठा केल्यास प्रती दिन रु.१०००/- दंड प्रमाणे कार्यवाही करणेत येईल अशी पुरवठाधारकाच्या हिताची अट नमूद करून कार्यादेशानुसार ६ महिन्यात ६ नग चेसीस बॉडी बांधून दिल्याने शासनाच्या दर करारानुसार २ महिन्यांचे ६१ विलंब दिवस रक्कमेची वसुली महानगरपालिकेस करता आली नाही. महसूल मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार मे. विजय फायर वेव्हीकल पंप्स लि. मुंबई यांचेबरोबर करारनामा करताना विहित रक्कमेचे मुद्रांक शुल्क पेपरवर करारनामा करणेचे असताना रक्कम रु.१००/- चे मुद्रांक पेपरवर केल्याने रक्क. र रु. १२९०/- चे कमी मुद्रांक वापरले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कारानाम्यावर दोन स्थायी सदस्य यांच्या स्वाक्षरी, मनपा सील व नगरसचिव विभागाकडे करारनामा नोंदणी केलेला नाही.*

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता एकूण ६ वॉटर टेंडर चेसीसवर बॉडी बांधणेचे काम मे. विजय फायर वेव्हीकल & पंप्स लि. मुंबई यांचेकडून दरकरारावर प्रमाणक क्र. १८ दिनांक २२/०८/२०१४ अन्वये रक्कम १०२९००००/- करून घेतल्या आहेत. सदर खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) मे. विजय फायर वेव्हीकल & पंप्स लि. मुंबई यांचे शासनाचे बरोबर वॉटर टेंडर बॉडी बांधणेचे कामाचे दर करार अस्तित्वात होते. दर कराराचे शेड्युल एक नुसार बॉडी बांधून वाहनाचा डिलिव्हरी कालावधी ४ महिने ( irrespective of no. of vehicles) इतका असताना महानगरपालिका अग्निशमन विभागाने कार्यादेशात ६ नग चेसीसवर बॉडी बांधणेचा कालावधी नियमबाह्यरित्या ८ महिने इतका दिला आहे. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र.४५ दिनांक २२/०८/२०१६ च्या अनुषंगाने सादर केलेले उत्तर पत्र क्र.मिभा/मनपा/अग्नि/३७०/२०१६-१७ दिनांक २४/०८/२०१६ अन्वये संचालक , महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे दर करार शेड्युल 3 मध्ये मुद्दा क्र.२५(अ) नुसार ठेकेदारास वाढीव मुदत देण्याचे अधिकार नमूद आहेत. सदर मुद्दा हा Termination for Default शी संबंधित असल्याने केलेला खुलासा संयुक्तिक नाही.

२) संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे दर करारानुसार प्रत्येक चेसीस पुरवठा केल्यापासून ४ महिन्याचे आंत बॉडी बांधून पूर्ण करून पुरवठा करणेचे आहे. करारातील क्लॉज ६.१ नुसार विलंबाने पुरवठा केल्यास पहिल्या १५ दिवसांकरिता रु.३०००/- प्रती दिन त्यापुढे १५ दिवसानंतर रु.५०००/- प्रती दिन व जास्तीत जास्त टेंडर रक्कमेच्या १०% इतका विलंब रक्कम वसुली करणेची आहे. असे असताना अग्निशमन विभागाने नियमबाह्यरित्या कार्यादेशात व करारनाम्यात ८ महिने पुरवठा

कालावधी मुदत नमूद करून त्यानंतर विलंबाने पुरवठा केल्यास प्रती दिन रु.१०००/- दंड प्रमाणे कार्यवाही करणेत येईल अशी पुरवठाधारकाच्या हिताची अट नमूद केली आहे. मे. विजय फायर वेव्हीकल & पंप्स लि. मुंबई यांनी सदर कार्यादेशानुसार ६ महिन्यात ६ नग चेसीस बॉडी बांधून दिल्याने शासनाच्या दर करारानुसार २ महिन्यांचे ६१ विलंब दिवस रक्कमेची वसुली रक्कम रु.२७५०००/- महानगरपालिकेस करता आली नाही. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र.४५ दिनांक २२/०८/२०१६ च्या अनुषंगाने सादर केलेले उत्तर पत्र क्र.मिभा/मनपा/अग्नि/३७०/२०१६-१७ दिनांक २४/०८/२०१६ अन्वये ४ महिने वाढीव मुदतीसह कार्यादेश प्रदान केला असून वाहने मुदतीत प्राप्त झाल्याने विलंब शुल्काची आकारणी करण्यात आलेली नाही. तथापि दर कराराचे शेड्युल एक नुसार बॉडी बांधून वाहनाचा डिलिव्हरी कालावधी ४ महिने ( irrespective of no. of vehicles) इतका असताना महानगरपालिका अग्निशमन विभागाने कार्यादेशात ६ नग चेसीसवर बॉडी बांधणेचा कालावधी नियमबाह्यरित्या ८ महिने इतका दिल्याने दर करारातील तरतुदींचे पालन न करता कार्यादेश वाढीव मुदतीश दिला असल्याने केलेला खुलासा संयुक्तिक नाही.

३) महसूल मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार मे. विजय फायर वेव्हीकल & पंप्स लि. मुंबई यांचेबरोबर करारनामा करताना विहित रक्कमेचे मुद्रांक शुल्क पेपरवर करारनामा करणेचे असताना रक्कम रु.१००/- चे मुद्रांक पेपरवर केल्याने रक्कम रु. ९२९०/- चे कमी मुद्रांक वापरले आहेत. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र.४५ दिनांक २२/०८/२०१६ च्या अनुषंगाने सादर केलेले उत्तर पत्र क्र.मिभा/मनपा/अग्नि/३७०/२०१६-१७ दिनांक २४/०८/२०१६ मध्ये मे. विजय फायर वेव्हीकल & पंप्स लि. मुंबई यांना उर्वरित मुद्रांक शुल्क रक्कम भरणेस कळविले आहे. त्यामुळे कार्यवाही अपूर्ण आहे.

४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार करारनाम्यावर दोन स्थायी सदस्य यांच्या स्वाक्षरी, मनपा सील व नगरसचिव विभागाकडे करारनामा नोंदणी केलेला नाही. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र.४५ दिनांक २२/०८/२०१६ च्या अनुषंगाने सादर केलेले उत्तर पत्र क्र.मिभा/मनपा/अग्नि/३७०/२०१६-१७ दिनांक २४/०८/२०१६ मध्ये यापुढे विभागाने केलेल्या करारनाम्याची नोंद नगर सचिव विभागाकडे करण्याची खबरदारी घेण्यात येईल असे कळविले आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही केली नसल्याने खुलासा मान्य करण्यात येत नाही.

एकूण वसूलपात्र रक्कम रु.२७५०००+९२९० = २८४२९०

DCPVTTM7001 (Ref No : 22, Hmm No : 45)

*18 मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कर आकारणीच्या अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केलेबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय शासन पत्र क्रं.टीपीएस-1806/प्र.क्र.563/06 न.वि.-13 दि.07/08/07 अन्वये अधिकृत / अनिधिकृत मोबाईल टॉवर्सवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1966 नुसार नोटीस बजावून मालमत्ता कर वसूल करण्याबाबत आदेश आहेत. त्यानुसार प्रभाग क्षेत्रात कार्यरत असलेल्या मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराची आकारणी, वसुली व नवीन कर निर्धारण याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 च्या कलम 4 चे उल्लंघन झाले आहे.*** |

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय शासन पत्र क्रं.टीपीएस-1806/प्र.क्र.563/06 न.वि.-13 दि.07/08/07 अन्वये अधिकृत / अनिधिकृत मोबाईल टॉवर्सवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1966 नुसार नोटीस बजावून मालमत्ता कर वसूल करण्याबाबत आदेश आहेत. त्यानुसार प्रभाग क्षेत्रात कार्यरत असलेल्या मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराची आकारणी, वसुली व नवीन कर निर्धारण याबाबतची अभिलेखे उपलब्ध करण्याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.87 दि.25/10/2016 अन्वये विचारणा केली असता अभिलेखे तसेच अनुपालन अप्राप्त आहे.

1) सन 2013-2014 व 2014-2015 या वर्षामध्ये मान्यता देण्यात आलेले मोबाईल टॉवरबाबतची कर निर्धारणाची प्रकरणांची नस्ती उपलब्ध केली नाही.

2) सन 2012-2013 व 2013-2014 मधील मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराची थकबाकी, सन 2013-2014 व 2014-2015 मधील प्रत्यक्ष वसुली, वर्षा अखेरचा एकूण थकबाकीचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 च्या कलम 4 चे उल्लंघन झाले आहे.

## 19 एकत्रित मालमत्ता कर विभागाच्या कामातील अनियमीतते बाबत

एकत्रित मालमत्ता कर

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : एकत्रित मालमत्ता कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 103229000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5372942.00/-

***बँकेकडून मुख्यालयास परत आलेल्या अनादरीत धनादेशाचे बाबत विभागाने उचित कार्यवाही केली नाही. चेक रिटर्न शुल्क ची आकारणी रू 100/- प्रमाणे केली आहे. प्रत्यक्षात निरनिराळया बँकांचे रिर्टन चेकचे दर वेगवेगळे आहेत. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 74 नुसार नमुना क्र.43 मध्ये कर निर्धारण सूची ठेउन गोषवारा काढला नाही. नमुना 46 मध्ये वाढ/ घट नोंदवही ठेवली नाही 2014-15 मध्ये ठेवलेली मागणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नाही. लेखासंहिता 78 (3) नुसार नमुना क्र.43 मधील चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. कर विभागाने वसुली केलेली कराची रक्कम आणि लेखाशाखेने मनपा फंडात जमा केलेली कर वसुलीची रक्कम यात तफावत असल्याचे दिसून येते. एकंदर अंतर्गत तपासणी, अंतर्गत लेखापरीक्षण, अंतर्गत नियंत्रणाचा अभाव असल्याचे दिसून येते.***

एकत्रित मालमत्ता कर विभाग मुख्यालयात प्रत्येक वर्षाची स्वतंत्र चेक रिटर्न रजिस्टर ठेवले आहे. मालमत्ता धारकाने कराच्या वसुलीचा दिलेला धनादेश मनपा प्रभाग कार्यालयाकडून बँकेत पाठविला जातो. महानगरपालिकेच्या कर विभागासाठी एचडीएफसी बँक ही कराचा भरणा करण्यासाठी प्राधिकृत बँक ठरविली आहे. निरनिराळया प्रभागाकडून स्वीकारलेले धनादेश पारीत न झाल्यास ते बँकेकडून थेट महानगरपालिका मुख्यालयाकडे पाठविले जातात. मुख्यालयातील कर निर्धारण विभागाने ठेवलेल्या स्वतंत्र चेक रिटर्न रजिस्टरमध्ये त्याची नोंद होते. त्यात अनुक्रमांक , प्रभागाचे नांव, धनादेश क्रमांक व दिनांक, बँकेचे नांव, रक्कम इ. तपशील नमुद आहे. मुख्यालयात प्राप्त झालेले धनादेश त्या त्या प्रभागास परत केले जातात आणि संबंधीत निरीक्षक/लिपीक/कर्मचारी यांची स्वाक्षरी घेतली जाते. अशा परत आलेल्या धनादेशांचा विचार करता - वर्षभरात सुमारे एकुण रु.दोन कोटी रकमेचे धनादेश पारीत झालेले नाहीत असे दिसून येते. याचा उदाहरणादाखल तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**चेक रिटर्न सन 2014-15**

| अ.क्र. | वॉर्ड क्र. | चेक क्रमांक | दिनांक | बँकेचे नाव | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| | | | वॉर्ड क्र. - A | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | A | 100004 | 03/07/2014 | बेसीन कॅथलिक बँक | 4178 |
| 2 | A | 102347 | 08/09/2014 | युनियन बँक | 2322 |
| 3 | A | 102347 | 08/09/2014 | युनियन बँक | 5516 |
| 4 | A | 606402 | 04/09/2014 | अलहाबाद बँक | 30935 |
| 5 | A | 30362 | 03/11/2014 | युनियन बँक | 276896 |
| 6 | A | 100041 | 28/02/2015 | बेसीन कॅथलिक बँक | 11451 |
| 7 | A | 00903 | 13/09/2014 | बँक ऑफ बडोदा | 2309 |
| 8 | A | 690021 | 07/10/2013 | दि ठाणे जिल्हा म.स. | 1256 |
| 9 | A | 000017 | 16/08/2014 | बँक ऑफ बडोदा | 5416 |
| 10 | A | 140393 | 05/01/2014 | युनियन बँक | 3666 |
| | | | वॉर्ड क्र. - B | | |
| 11 | B | 744262 | 30/03/2015 | भारतीय स्टेट बँक | 15135 |
| 12 | B | 160990 | 12/03/2015 | दि शामराव विठ्ठल | 625935 |
| 13 | B | 160991 | 12/03/2015 | दि शामराव विठ्ठल | 592058 |
| 14 | B | 331460 | 24/03/2015 | जावली बँक | 21600 |
| 15 | B | 124323 | 02/03/2015 | विजया बँक | 18600 |
| 16 | B | 100046 | 27/02/2015 | कपोल बँक | 15037 |
| 17 | B | 183310 | 23/02/2015 | आय.डी.बी.एय. बँक | 21126 |
| 18 | B | 182317 | 08/01/2014 | डी.सी.बी. बँक | 12015 |
| 19 | B | 000115 | 18/11/2014 | बँक ऑफ बडोदा | 14198 |
| 20 | B | 488815 | 20/11/2014 | देना बँक | 17470 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वॉर्ड क्र. - D | | |
| 21 | D | 293060 | 17/04/2014 | एच.डी.एफ.सी. बँक | 8055 |
| 22 | D | 080253 | 30/08/2014 | ॲक्सिस बँक | 1898 |
| 23 | D | 100445 | 12/08/2014 | बेसीन कॅथलिक बँक | 13648 |
| 24 | D | 175180 | 11/01/2015 | आय.सी.आय.सी.आय. | 3081 |
| 25 | D | 106591 | 10/12/2014 | स्टेट बँक ऑफ म्हैसुर | 3223 |
| 26 | D | 11770 | 18/11/2014 | देना बँक | 2438 |
| 27 | D | 000016 | 01/12/2014 | एच.डी.एफ.सी. बँक | 3386 |
| 28 | D | 849776 | 17/10/2014 | कॅनरा बँक | 2900 |
| 29 | D | 72926 | 23/09/2014 | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | 2786 |
| 30 | D | 363329 | 09/03/2015 | सारस्वत बँक | 9291 |
| | | | वॉर्ड क्र. - C | | |
| 31 | C | 315528 | 11/08/2014 | भारतीय स्टेट बँक | 1074 |
| 32 | C | 233303 | 02/01/2015 | जावली बँक | 1743 |
| 33 | C | 528003 | 16/01/2015 | पंजाब नॅशनल बँक | 259 |
| | | | वॉर्ड क्र. - R | | |
| 34 | R | 724583 | 28/08/2014 | दि. ठाणे जिल्हा म.स. | 1472 |
| 35 | R | 612513 | 10/10/2014 | इंडियन ओवर बँक | 2171 |
| 36 | R | 30492 | 31/03/2015 | भारत बँक | 22037 |
| | | | वॉर्ड क्र. - P | | |
| 37 | P | 100111 | 13/09/2014 | बेसीन कॅथलिक बँक | 11825 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 38 | P | 100007 | 03/02/2015 | वेसीन कॅथलिक बँक | 3893 |
| | | | वॉर्ड क्र. - T | | |
| 39 | T | 774652 | 18/09/2014 | कॉर्परिशन बँक | 1422 |
| 40 | T | 50439 | 18/09/2014 | देना बँक | 3226 |
| 41 | T | 162028 | 05/01/2015 | देना बँक | 4572 |
| 42 | T | 13006 | 13/03/2015 | युनियन बँक | 23344 |
| | | | वॉर्ड क्र. - G | | |
| 43 | G | 016847 | 26/06/2014 | ॲक्सिस बँक | 15156 |
| 44 | G | 000010 | 04/12/2014 | बँक ऑफ इंडिया | 5563 |
| 45 | G | 033475 | 11/12/2014 | बँक ऑफ इंडिया | 11983 |
| 46 | G | 729044 | 03/02/2015 | बँक ऑफ महाराष्ट्र | 4726 |
| 47 | G | 068216 | 26/02/2015 | सारस्वत बँक | 5156 |
| 48 | G | 417672 | 27/02/2015 | कर्नाटक बँक लि. | 7621 |
| 49 | G | 321092 | 02/03/2015 | एन.के.जी.एस.बी. | 7185 |
| 50 | G | 777437 | 16/03/2015 | देना बँक | 21086 |
| 51 | G | 126660 | 24/03/2015 | सिंडिकेट बँक | 13412 |
| 52 | G | 949855 | 30/03/2015 | कॅनरा बँक | 16063 |
| | | | वॉर्ड क्र. - I | | |
| 53 | I | 915883 | 20/09/2014 | सिंडिकेट बँक | 6424 |
| 54 | I | 426952 | 04/12/2014 | युनियन बँक | 6850 |
| 55 | I | 699145 | 22/01/2015 | भारतीय स्टेट बँक | 4477 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 56 | I | 102099 | 11/02/2015 | कॉर्पोरेशन बँक | 17157 |
| 57 | I | 000112 | 28/02/2015 | बँक ऑफ बडोदा | 4000 |
| 58 | I | 801273 | 04/03/2015 | वसई विकास स. बँक | 2682 |
| 59 | I | 045130 | 03/03/2015 | बँक ऑफ इंडिया | 3193 |
| 60 | I | 000018 | 19/01/2014 | बँक ऑफ बडोदा | 11157 |
| 61 | I | 840922 | 24/03/2015 | पंजाब नॅशनल बँक | 5231 |
| 62 | I | 100005 | 01/10/2014 | वसई जनता सहकारी | 2145 |
| | | | वॉर्ड क्र. - F | | |
| 63 | F | 105112 | 30/04/2014 | कॅनरा बँक | 16146 |
| 64 | F | 982462 | 27/08/2014 | भारतीय स्टेट बँक | 17732 |
| 65 | F | 100031 | 13/12/2014 | अभ्युदय को.ऑ.बँक | 56600 |
| 66 | F | 009336 | 26/12/2014 | आय.सी.आय.सी.आय. | 45178 |
| 67 | F | 161848 | 27/01/2015 | कॅनरा बँक | 21071 |
| 68 | F | 004051 | 25/02/2015 | युनियन बँक | 31135 |
| 69 | F | 285980 | 13/03/2015 | कर्नाटक बँक लि. | 42562 |
| 70 | F | 100039 | 18/03/2015 | जनसेवा सहकारी बँक | 30265 |
| 71 | F | 066936 | 31/03/2015 | युनियन बँक | 35000 |
| 72 | F | 70884 | 30/03/2015 | एच.डी.एफ.सी. बँक | 30000 |
| | | | वॉर्ड क्र. - J | | |
| 73 | J | 100038 | 28/04/2014 | वसई जनता सहकारी | 5000 |
| 74 | J | 286986 | 27/05/2014 | बँक ऑफ इंडिया | 22280 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 75 | J | 025345 | 11/09/2014 | बँक ऑफ इंडिया | 4978 |
| 76 | J | 228871 | 29/09/2014 | युनियन बँक | 3794 |
| 77 | J | 750531 | 17/11/2014 | ग्रेटर बँक | 3604 |
| 78 | J | 169678 | 18/12/2014 | आय.डी.बी.आय. | 3105 |
| 79 | J | 621702 | 21/09/2014 | विजया बँक | 6536 |
| 80 | J | 52168 | 08/01/2014 | युनियन बँक | 23783 |
| 81 | J | 134945 | 16/02/2015 | सिंडिकेट बँक | 7114 |
| 82 | J | 785039 | 11/03/2015 | कॉर्पोरेशन बँक | 3757 |
| | | | वॉर्ड क्र. - H | | |
| 83 | H | 124770 | 20/06/2014 | एच.डी.एफ.सी. बँक | 28292 |
| 84 | H | 786733 | 23/08/2014 | कॉर्पोरेशन बँक | 71572 |
| 85 | H | 336980 | 10/10/2014 | एन.के.जी.एस.बी. | 18469 |
| 86 | H | 470865 | 16.09/2014 | कॉर्पोरेशन बँक | 33024 |
| 87 | H | 000165 | 08/12/2012 | बँक ऑफ बडोदा | 35084 |
| 88 | H | 224950 | 14/12/2014 | कॉर्पोरेशन बँक | 39816 |
| 89 | H | 033360 | 20/03/2015 | युनियन बँक | 85010 |
| 90 | H | 33362 | 20/03/2015 | युनियन बँक | 74273 |
| 91 | H | 012111 | 31/03/2015 | वसई जनता सहकारी | 20383 |
| 92 | H | 000171 | 31/03/2015 | बँक ऑफ बडोदा | 70000 |
| | | | वॉर्ड क्र. - E | | |
| 93 | E | 417297 | 26/03/2015 | ॲक्सिस बँक | 121260 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 94 | E | 555241 | 31/03/2015 | कॉर्परिशन बँक | 61704 |
| 95 | E | 211256 | 27/03/2015 | डी.सी.बी. बँक | 48948 |
| 96 | E | 000147 | 10/02/2015 | बँक ऑफ इंडिया | 68676 |
| 97 | E | 000007 | 25/02/2015 | एच.डी.एफ.सी. बँक | 42604 |
| 98 | E | 643728 | 12/01/2015 | इंडियन ओवरसीन | 125554 |
| 99 | E | 777932 | 31/10/2014 | आय.एन.बी. बँक | 59806 |
| 10 | E | 000001 | 16/09/2014 | डी.सी.बी. बँक | 49114 |
| 101 | E | 441535 | 22/09/2014 | ॲक्सिस बँक | 35729 |
| 102 | E | 002390 | 02/09/2014 | सिटी युनियन बँक | 37742 |
| वॉर्ड क्र. - F कनकिया | | | | | |
| 103 | F | 394703 | 29/03/2014 | भारतीय स्टेट बँक | 248113 |
| 104 | F | 759270 | 17/01/2015 | युको बँक | 92948 |
| 105 | F | 196299 | 20/11/2014 | ॲक्सिस बँक | 308023 |
| 106 | F | 100003 | 08/10/2014 | वेसीन कॅथलिक बँक | 253541 |
| 107 | F | 125866 | 07/04/2015 | अपना सहकारी बँक | 90000 |
| 108 | F | 000643 | 01/02/2015 | एच.डी.एफ.सी. बँक | 151745 |
| 109 | F | 202373 | 07/12/2014 | शामराव विठ्ठल बँक | 138264 |
| 110 | F | 215281 | 28/12/2014 | शामराव विठ्ठल बँक | 393243 |
| 111 | F | 100199 | 30/04/2014 | सी.आय.टी.आय. | 85779 |
| 112 | F | 309469 | 31/03/2014 | कोकन मर्कनाईल | 78456 |
| | | | | एकूण | 5372942 |

याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 63, दि. 21/09/2016 अन्वये खुलासा विचारला

होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) बँकेकडून मुख्यालयास परत आलेल्या अनादरीत धनादेशाचे बाबत विभागाने पुढील कोणती कार्यवाही केली याचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिला नाही. लेखापरीक्षणाचे वेळी कर निर्धारक व संकलक , उप करनिर्धारक व संकलक यांचेसोबत चर्चा केली. विभागास बँकेकडून परत आलेले धनादेश प्रभाग निहाय वाटप केले जातात. त्यांची पोहोच नोंदवहीत घेतली जाते. परंतु प्रभागाने त्यानंतर पुन्हा दंडासह कराची रक्कम वसुल केल्याचे बाबत मुख्यालयास कळविले नाही. तसेच लेखापरीक्षणास संबंधीत अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. त्यामुळे अनादरीत झालेल्या धनादेशाची रक्कम वसुल केल्याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही. वर नमुद तक्त्यात निर्देशीत केलेनुसार आ थि क वर्ष 2014-15 साठी रु.5372942 वसुलपात्र ठरते.

2) महानगरपालिकेने अनादरीत धनादेशाचे बाबत संबंधीत मालमत्ताधारकाकडून चेक रिटर्न शुल्क म्हणून रु. 100/- आकारणी केली आहे. प्रत्यक्षात निरनिराळया बँकाचे अनादरीत चेकचे बाबत आकारणीचे दर यापेक्षा जास्त आहेत.

3) महानगरपालिका स्थायी समितीच्या मंजुरीने - महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता , 1971 नुसार लेखे ठेवले आहेत. लेखा संहिता नियम 74 नुसार नमुना क्रमांक 43 मध्ये कर निर्धारण सुची तयार करणे आवश्यक आहे. तसेच नियम 75 नुसार प्रभागवार अनुक्रमांकानुसार वेगवेगळया निर्धारण सुची ठेवून त्याचा एकत्रित गोषवारा काढणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाकडे मागणी करुनही कर निर्धारण सुची लेखापरीक्षणास सादर केली नाही.

4) महानगरपालिका स्थायी समितीच्या मंजुरीने - महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता , 1971 मधील नमुना क्रमांक 46 नुसार कराची वाढ/घट नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु सदरची वाढ/घट नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

5) महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता , 1971 नियम 76 नुसार मागणी पुस्तक नमुना क्रमांक 47 मध्ये कराचे मागणी पुस्तक ठेवायचे आहे. मागणी पुस्तक प्रभागवार अनुक्रमांकानुसार वेगवेगळे ठेवायचे आहे. त्याचा एकत्रित गोषवारा काढणे आवश्यक आहे. 2014-15 करीता मागणी नोंदवही ठेवली आहे, परंतू ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आली नाही.

नियम 76(2) नुसार निर्धारण सुचिवरुन, या व मागील मागणी पुस्तकावरुन , मागण्यांच्या नोंदी अचुकपणे अग्रेषित केल्याची खात्री कर निर्धारक व संकलक यांनी करावयाची आहे. म्हणजेच मागील वर्षाच्या थकीत रकमा पुढील म्हणजे चालु वर्षात ओढल्याची खातरजमा विभाग प्रमुखाने केल्याचे प्रमाणीत करणे आवश्यक आहे. 2014-15 चे बाबत अशा प्रकारचे प्रमाणपत्र कर निर्धारक व संकलक यांनी दिलेले नाही.

6) लेखा संहिता नियम 78 (3) नुसार नमुना क्रमांक 13 मध्ये चलन तयार करुन ते नियम 79 नुसार वरिष्ठ कर्मचा-याने तपासुन मुख्यालयास/लेखा शाखेस सादर करावयाचे आहे.

महानगरपालिकेच्या कर विभागाची वसुली पध्दती पाहता प्रभाग निहाय वसुल केलेली रक्कम प्रभागातील लिपीक / निरीक्षकाकडून प्राधिकृत बँकेत थेट पाठविली जाते. प्राधिकृत बँकेच्या पोचपावतीसह चलनाची एक प्रत व संगणकीय दिवसभराच्या वसुलीची प्रत सोबत जोडून मुख्यालयास व लेखा शाखेस पाठविली जाते. त्या चलनात धनादेशाने वसुली केल्याचा तपशील दाखविला जात नाही. 2014-15 मध्ये कर विभागाने पाठविलेल्या चलनाच्या नोंदी रोखपालाने त्याचेकडील रोकडवहीत (नमुना क्रमांक 18) मध्ये घेतल्या नाहीत. याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी कर विभाग व लेखा विभागाच्या संबंधीतासोबत चर्चा केली. प्रभागाची रक्कम थेट बँकेत जात असल्याने रोखपालाने 2014-15 मधील चलनाच्या नोंदी त्याचे रोकडवहीत घेतल्या नाहीत. लेखा शाखेतील लिपीकाने कर विभागाच्या स्वतंत्र किर्दीत बँकेकडून एकत्रित प्राप्त होणा-या चलनाच्या नोंदी घेतल्याचे सांगीतले. म्हणून 2014-15 ची रोखवही उपलब्ध करुन देण्याबाबत लेखा शाखेस यांना सांगितले असता त्यांनी रोखवही उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे वसुलीची रक्कम महानगरपालिका फंडात जमा केल्याची खातरजमा करता आली नाही.

तसेच कर विभागाने सर्व प्रभागाच्या वसुलीची एकत्रित चलन लेखा शाखेस रोजच्या रोज पाठविले नाही. धनादेशाने जमा होणा-या रकमेची खात्री प्रभागाने किंवा विभागाने केली नाही. त्याचा परिणाम कर निर्धारक व संकलक यांनी दाखविलेली एकत्रित मालमत्ता कराच्या वसुलीची रक्कम व लेखा शाखेने प्रत्यक्षात मनपा फंडात जमा केलेली वसुलीची रक्कम यात तफावत पुढील प्रमाणे दिसून येते.

(रु.लाखात)

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | कराचे नांव | कर निर्धारक व संकलक यांनी लेख्यात दाखविलेली वसुलीची रक्कम रु. | लेखा विभागाने मनपा फंडात वसुलीची जमा केलेली रक्कम रु. | तफावत रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | घरपटटी | 4907.00 | 3869.76 | 1037.24 |
| 2 | ---//--- | वृक्षकर | 164.58 | 166.21 | (-) 1.63 |
| 3 | ---//--- | शिक्षण कर | 1167.00 | 1602.96 | (-) 435.96 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | ----//--- | रोजगार हमी कर | 125.64 | 93.51 | 32.13 |
| 5 | ----//--- | मनपा शिक्षण कर | 326.09 | 276.46 | 43.63 |
| 6 | ----//--- | विशेष स्वच्छता व मलप्रवास लाभ कर | 1308.05 | 929.77 | 378.28 |
| 7 | ----//--- | पाणी पुरवठा लाभ कर | 13.87 | 35.27 | (-) 21.40 |
| | | एकूण | | | 1032.29 |

या तफावतीबाबत विभागाने खुलासा केला नाही. तसेच शासकीय कर उदा. शिक्षण कर , रोजगार हमी कर या कराची विभागाने केलेली वसुली व लेखा शाखेने लेख्यात दाखविलेली वसुली यातील तफावतीमुळे शासनास देय होणा-या/दिलेल्या रकमेत तफावत झाली असल्याने याबाबतची महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षण अहवालात नोंद असल्यास लेखापरीक्षणास दाखविले नाही.

7) महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत असलेल्या मालमत्ता कर विभागाच्या कामाकडे प्रशासनाचे फारसे लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. कर विभागाने एकत्रित चलने रोजच्या रोज लेखा विभागाकडे पाठविली नाहीत. लेखा विभागाने बँकेच्या विवरणपत्रानुसार वसुलीच्या रकमा रोकडवहीत नमुद केल्या आहेत. अंतर्गत लेखापरीक्षणात उणीवांबाबत नोंदी नाहीत. अनादरीत धनादेशांची वसुलीबाबत विभागाने वेळेवर उचित कार्यवाही केली नाही. एकंदरीत कर वसुलीचे कामी अंतर्गत तपासणी (Internal Check), अंतर्गत लेखापरीक्षण (Internal Audit), अंतर्गत नियंत्रण (Internal Control) चा अभाव असल्याचे दिसून येते.

आक्षेपाधीन रक्कम रु.103229000

वसुलपात्र रक्कम रु.5372942

DATPMVM6001 (Ref No : 68, Hmm No : 63)

## 20 एकत्रित मालमत्ता कर विभाग - संगणक प्रणालीनुसार वसुलीतील अनियमीतते बाबत

**एकत्रित मालमत्ता कर**

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015

**अनियमितता संख्या** : 05

*लेखा शीर्ष : एकत्रित मालमत्ता कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***संगणक प्रणालीत मागणी नोंदवहीचा तपशील / गोषवारा उपलब्ध झाला नाही. महाराष्ट्र नगर परीषद 1971 नियम 76 नुसार नमुना क्र. 47 मध्ये संगणकीय मागणी पुस्तक ठेवले नाही. संगणक प्रणालीचे मोडयुल्ड तयार करतांना विभागाच्या आवश्यकतेनुसार / लेखासंहितेनुसार ते तयार केले नाही. कर निर्धारक संकलक यांनी लेखासंहिता नियम 51 नुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी विभागाने केलेल्या वसुली रक्कमेचा ताळमेळ लेखा शाखेतील वसुली नोंदवही सोबत घेतला नाही. संगणक प्रणालीत ऑडीट ट्रेल (Audit Trail) ची सुविधा नाही. नागरी सुविधा केंद्रात कर विभागाकडील कर्मचारी नाही. एकंदरीत या कामाबाबत अंतर्गत तपासणी (Internal Checks), अंतर्गत लेखापरीक्षण (Internal Audit), अंतर्गत नियंत्रण (Internal Control) चा अभाव असल्याचे दिसून येते***

एकत्रित मालमत्ता कर विभागाच्या वसुलीचे काम नागरी सुविधा केंद्रामार्फत केले आहे. 2014-15 मध्ये काही ठिकाणी जुन्या पावती पुस्तकाद्वारे वसुली केली आहे. नागरी सुविधा केंद्रातील संगणक प्रणालीचे अवलोकन करता त्यात पुढीलप्रमाणे आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 71, दि.27/09/2016 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) संगणक प्रणालीद्वारे प्रभागनिहाय एकत्रित मागणी समजू शकते. तसेच वर्षभरातील एकूण वसुली समजू शकते. संगणकीय मागणीमध्ये मालमत्ता धारकाचे नाव, मालमत्ता क्रमांक, कराचे नाव, इतर दंड, नोटीस, फी, मनपा शिक्षण कर, शिक्षण कर, पाणी पुरवठा लाभ कर, रोजगार हमी, मलप्रवाह सुविधा कर, शास्ती, शिक्षण कर, व्याज, वृक्षकर इ. कराची मागणी दाखविली आहे. परंतु या मागणी नोंदवहीत वसुलीचा पावती क्रमांक, दिनांक, रक्कम, थकबाकी इ. बाबी नाहीत. म्हणजेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 76 नुसार नमुना क्र. 47 मध्ये संगणकीय मागणी पुस्तक ठेवलेले नाही. तसेच प्रभागवार ठेवलेल्या मागणी पुस्तकांचा एकत्रित गोषवारा काढलेला नाही. किंबहुना तशी सोय संगणक प्रणालीत आढळून आली नाही. त्यामुळे संगणकीय प्रणालीद्वारे एकत्रित गोषवारा काढलेली एकूण मागणी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. वसुलीच्या बाबतीत सुध्दा प्रभागवार वसुलीची आकडेवारी संगणक प्रणालीत उपलब्ध आहे. परंतु एकत्रित वसुलीचा तपशिल उपलब्ध होवु शकला नाही. सबब संगणक प्रणालीद्वारे एकत्रित थकबाकीची रक्कम समजू शकत नाही. संगणक प्रणालीचे मोडयुल तयार करतांना विभागाच्या आवश्यकतेनुसार / लेखा संहितेनुसार ते तयार केल्याचे दिसून आले नाही. संबंधित विभागाचे कर निर्धारक व संकलक आणि संगणक प्रणालीचे प्रमुख म्हणुन उपायुक्त (मु.) यांनी या बाबींचा विचार न केल्याने संगणक प्रणालीद्वारे

एकत्रित मालमत्ता कराची 2014-15 या वित्तीय वर्षाची एकूण मागणी, एकूण वसुली, एकूण थकबाकी समजू शकत नाही.

लेखा संहिता 76 (2) नुसार निर्धारण सुचीवरून, या व मागील मागणी पुस्तकावरून, मागण्यांच्या नोंदी अचुकपणे अग्रेषित केल्याची खात्री कर निर्धारक व संकलक यांनी केली नाही. 2014-15 चे मागणी पुस्तक उपलब्ध करुन दिले, परंतु मागील वर्षाच्या थकित रकमा पुढील वर्षात म्हणजे चालु वर्षात (2014-15) ओढल्याची खातरजमा विभाग प्रमुखाने करुन तसे प्रमाणपत्र दिले नाही. त्यामुळे मागील वर्षाची थकबाकी पुढील वर्षात ओढल्याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.

2) लेखापरीक्षणास कर निर्धारक व संकलक यांनी सादर केलेले अभिलेख्यानुसार 2014-15 च्या वसुलीच्या रक्कम आणि याच कालावधीच्या लेखा शाखेने महानगरपालिका लेख्यात दाखविलेल्या रक्कमांत तफावत आढळून आली. ही बाब अर्धसमास पत्र क्र. 63 दि.20/09/2016 अन्वये विभागाच्या निदर्शनास आणुन दिली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 51 नुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी कर विभागाने वसुली केलेल्या रक्कमांचा ताळमेळ लेखा शाखेतील वसुली नोंदवही सोबत घेतलेला नाही. तसेच कर विभागाने रोजच्या वसुलीच्या एकत्रित चलन दररोज लेखा विभागाकडे पाठविले नाही. त्यामुळे या दोन विभागांनी दाखविलेल्या अभिलेख्यानुसार वसुली रक्कमेत तफावत आहे. सदरची तफावत कश्यामुळे येते याचा खुलासा कर विभाग, संगणक विभाग आणि लेखा विभाग यांनी केला नाही.

3) संगणक विभागाने-प्रणालीत ऑडीट ट्रेल (Audit Trail) ची सुविधा लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिली नाही.

4) प्रभाग कार्यालये व मुख्य कार्यालयात उपलब्ध असलेल्या नागरी सुविधा केंद्राच्या वसुलीवर विभागाचे नियंत्रण नाही. अनादरीत धनादेशाबाबत नागरी सुविधा केंद्रात सुधारीत मागणीत नोंद घेण्याची पध्दती उपलब्ध नाही. नागरी सुविधा केंद्रात कर विभागाचा एकही कर्मचारी नसल्याने कामातील अडचणीबाबत वेळीच उपाय योजना केली जात नाही. याचा परिणाम म्हणुन विभागाचे कामात सुसूत्रीपणा दिसून येत नाही.

5) महानगरपालिकेचा उत्पन्नाचा महत्त्वाचे स्त्रोत असलेल्या कर विभागाच्या कामाचे 2014-15 चे अंतर्गत लेखा परीक्षण झालेले नाही. एकंदरीत या कामाबाबत अंतर्गत तपासणी (Internal Checks), अंतर्गत लेखापरीक्षण (Internal Audit), अंतर्गत नियंत्रण (Internal Control) चा अभाव असल्याचे दिसून येते.

*21 संगणक विभागातील खर्चाचे प्रमाणके व संचिका उपलब्ध न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष : संगणक विभाग मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 1683052.00/- आक्षेपाधीन रक्कम रु. 1683052.00/-

***आर्थिक वर्ष 2014-15 मधील रु.1683052 खर्चाची प्रमाणके व संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 930 च्या कलम 4 चे उल्लंघन झाले आहे.***

मिरा भाईदर महानगरपालिकेतील संगणक विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षण करीत असताना,खालील तक्त्यात नमूद केलेल्या शिर्षातील प्रमाणकेलेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र 135 दिनांक 31/12/2016 अन्वये विचारणा केली असता अनुपालन अप्राप्त आहे.

1) संगणक / हार्डवेअर प्रणाली खरेदी खर्च :

| अ.क्र. | | 2014-15 |
|---|---|---|
| 1) | वार्षिक लेख्याप्रमाणे झालेला प्रत्यक्ष खर्च | रू.3514000 |
| 2) | प्रत्यक्ष लेखापरीक्षणास प्राप्त झालेले खर्चाची प्रमाणके | रू.3133771 |
| 3) | लेखापरीक्षणात उपलब्ध न झालेल्या प्रमाणकांची रक्कम | रू.380229 |

2) संगणक देखभाल दुरूस्ती :

| अ.क्र. | | 2014-15 |
|---|---|---|
| 1) | वार्षिक लेख्याप्रमाणे झालेला प्रत्यक्ष खर्च | रू.2397000 |

| | | |
|---|---|---|
| 2) | प्रत्यक्ष लेखापरीक्षणास प्राप्त झालेले खर्चाची प्रमाणके | रु.1094177 |
| 3) | लेखापरीक्षणात उपलब्ध न झालेल्या प्रमाणकांची रक्कम | रु.1302823 |

वर नमुद केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष 2014-15 मधील संगणक विभागाकडील रक्कम रु.1683052 च्या खर्चाची प्रमाणके व त्याबाबतच्या नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 च्या कलम 4 चे उल्लंघन झाले आहे.

DDDYKSM6801 (Ref No : 34 Para No : 135)

*22 एच.पी.मॉडेल नं: 3330 चे 09 संगणक संच खरेदीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : संगणक नगरसेवक निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 378000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 378000.00/-

***DGS AND D यांचेकडील दिनांक 06.01.2014 चे दर करार अवलोकन करता दर करारात मे.ट्रॉयजेम डिजीटेक यांचे नांव अधिकृत पुरवठादार म्हणून नमूद नाही साठा नोदवहीत संगणक खरेदीबाबतची नोंद आढळून येत नाही संगणक संचाबाबतची मागणीपत्रे व वाटपाबाबतचे अभिलेख उपलब्ध झाले नाहीत.***

मिरा भायंदर महानगरपालिकेअंतर्गत संगणक विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षण करता महापालिकेसाठी वेळोवेळी संगणक खरेदी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.सदर संगणक खरेदीमध्ये पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आले असून याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रं.138 दिनांक 22.12.2016 निर्गमित करण्यात आला आहे मात्र विभागाकडून अनुपालन अप्राप्त आहे.
लेखाशिर्ष- नगरसेवक निधी
ठेकेदार :- मे.ट्रॉयजेम डिजीटेक
मंजूरी :- मा.आयुक्त यांची दिनांक 27.06.2014 रोजी प्रशासकिय व अर्थिक मंजूरी.
कार्यादेश:- मनपा /भांडार/75/2014-15 दिनांक 27.06.2014.

प्रमाणक क्र.551 दिनांक 01.10.2014 (RTGS) रक्कम रु.352000/- अन्वये नगरसेवक निधीमधील एच.पी.मॉडेल नं. 3330 चे 09 संगणक संच खरेदी केले आहेत. याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे .
Invoice No.TD/14-15/48 dt 25.08.2014
H.P.3330 M7 Desktop @40000 प्रमाणे 09 संगणक संच रु.360000

+ VAT @5% रु.18000

एकूण रु.378000

पुरेशा तरतुदीअभावी नगरसेवक निधीतून रक्कम रु.352000 खर्च करण्यात आली आहे सदर खरेदी DGS & D यांचेकडील दिनांक 06.01.2014 चे दर करारानुसार केली आहे.याबाबत पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

1) DGS & D यांचेकडील दिनांक 06.01.2014 चे दर करार अवलोन करता दरकरारात मे.ट्रॉयजेम डिजीटेक यांचे नांव अधिकृत पुरवठादार म्हणून नमूद नाही. अशावेळी मे.ट्रॉयजेम डिजीटेक यांना H.P. संगणक संच पुरविणेबाबतचे आदेश कोणत्या प्राधिकारानुसार दिले याबाबतची साधार स्पष्टता लेखा परीक्षणास झाली नाही.
2) देयकांसोबतच्या दिनांक 15.09.2014 च्या टिप्पणीनुसार सदर संगणक प्राप्त झाल्याबाबतची नोंद नमुना नं. 114 च्या साठा नोंदवहीत पृष्ठ क्र. 31 वर घेतल्याचे प्रमाणित आहे. साठा नोंदवहीची पडताळणी करता मे.इंग्राम मायक्रो इंडिया प्रा.लि. यांच्याकडून दिनांक 20.01.2016 चे कार्यादेश क्र.308 अन्वये खरेदी केलेल्या 13 संगणकांची नोंद आढळून येते.साठा नोंदवहीत नोंद नसल्यामुळे खरेदीबाबतची सत्यता पडताळता आली नाही.
3) खरेदी केलेले 9 संगणक कोणत्या विभागास आवश्यक होते याबाबतची मागणीपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.तसेच सदर संगणकाचे वाटपाबाबतचे अभिलेख उपलब्ध झाले नाहीत.त्याअभावी रक्कम रु.378000 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPGDM5901 (Ref No : 50, Hmm No : 138)

***23 विकास आराखडयाची अंमलबजावणीसाठी आरक्षित जागा संपादनासाठी प्रदान केलेली TDR प्रमाणपत्र उपलब्धतेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : नगररचना मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 4715199.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4715199.00/-

*विकास आराखडयाची अंमलबजावणीसाठी आरक्षित जागा संपादनासाठी प्रदान केलेली TDR प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.*

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 अन्वये विकास आराखडयामध्ये आरक्षित जागांचे भूसंपादन करुन आरक्षणांचा विकास करण्याचे दायित्व महानगरपालिकेचे आहे. या संबंधी पुढील माहिती अभिलेख्यासह लेखापरीक्षणास सत्वर सादर करावी. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.60 दि.20/09/2016 निर्गमित करण्यात आला असून विभागाकडून दिनांक 28.09.2016 रोजी अनुपालन सादर केले आहे.त्याअनुषंगाने याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महापालिकेचे वार्षिक लेख्यानुसार महापालिकेचे 2014-15 साठी TDR पासून प्रत्यक्ष उत्पन्न 44.67 लक्ष आहे. याबाबत विभागाने लेखापरीक्षणास खाली नमुद अभिलेखे अद्याप उपलब्ध केले नाहीत.

a) ज्या भुसंपादन प्रकणात मुळ जमिन मालकास महापालिकेने TDR मंजूर केला आहे, अशा प्रकरणांच्या प्रकरण निहाय नस्ती, वितरीत TDR प्रमाणपत्रांचे कार्यालयीन प्रती व याबाबतचा एकत्रित लेखा

b) ज्या TDR प्रमाणपत्रांचे TDR प्रमाणपत्र धारकाकडून विकासकाकडे हस्तांतरण झाले आहे. अशा हस्तांतरण प्रकरणांच्या नोंदीचे अभिलेख

c) ज्या TDR प्रमाणपत्रांच्या आधारे विभागाने विकासकांना जादा चटई क्षेत्र (FSI) मंजूर केला आहे, अशा प्रकरणांच्या नोंदीचे अभिलेखे तसेच सदर प्रकरणाच्या प्रारंभ प्रमाणपत्राचे संचिका याबाबचे मुळ अभिलेख लेखापरीक्षणास अद्याप उपलब्ध झाले नाही.

2) महापालिकेचे वार्षिक जमा लेख्यानुसार TDR पोटी सन 2014-2015 या आर्थिक वर्षात जमा झालेली रक्कम व नगररचना विभागाने अनुपालनात सादर केलेली जमा रक्कम यामध्ये पुढीलप्रमाणे तफावत आढळून येते.

| वर्ष | वार्षिक जमा लेख्यानुसार जमा | नगररचना विभागाने अनुपालनानुसार सादर केलेली जमा | तफावत |
|---|---|---|---|
| 2014-2015 | 4467000 | 9182199 | (+)4715199 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे महापालिकेच्या वार्षिक जमा लेख्यानुसार जमा झालेल्या TDR रक्कमेपेक्षा नगररचना विभागाने सादर केलेल्या अनुपालनातील जमा ही रक्कम रु. 4715199 ने जादा

आहे.विभागाने अनुपालनात दर्शविलेल्या TDR जमेबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे तसेच सदर तफावतीबाबतची पडताळणी करता आली नाही.लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न केल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 च्या कलम 4 चे उल्लंघन झाले आहे.

DATPGDM5901 (Ref No : 46, Hmm No : 60)

*24 स्थानिक संस्था कर वसुलीमधील अनियमीतता व अंदाजपत्रकीय उत्पन्नातील रु.43 कोटीच्या नुकसानीबाबत*

**स्थानिक संस्था कर**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 11**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 649861380.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 157941380.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 61920000.00/-

***मनपाच्या वतीने परवानगी दिलेल्या व्यावसयकांपेक्षा, नोंदणी झालेली व्यापाऱ्यांची संख्या कमी आहे. अंदाजपत्रकात दाखविलेले उद्दीष्ट व प्रत्यक्षात वसुली यात तफावत आहे. नोंदणी झालेल्या व्यापाऱ्यांची विवरणपत्रे विभागाने तपासलेली नाहीत. गोदामाची सुविधा घेणाऱ्या व देय्य कराच्या 10% रक्कम भरणाऱ्या व्यापारांची प्रकरणे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नाहीत. सोने- चांदी व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्रे सादर केले नाहीत. परंतु मनपाने अशा बाबतीत कोणतीही कार्यवाही केली नाही. विवरणपत्र सादर न केलेल्या व्यावसायिकांवर ठोक कार्यवाही केली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम 48 (6) नुसार शास्तीची रक्कम वसुल न केल्याने 2014-15 मध्ये रु.6,19,20,000/- चे आर्थिक नुकसान झाले, जे वसुलपात्र आहे. प्राप्त झालेल्या सर्व वार्षिक विवरणपत्रांची तपासणी विभागाने केली नाही. महापालिकेने प्राधिकृत केलेल्या बँकेत परस्पर कराच्या रकमा भरणा केल्या जातात. परंतु त्यांचा ताळमेळ घेतला नाही. त्यामुळे विभागाने केलेली वसुली आणि लेखा शाखेनी मनपा फंडात जमा केलेली रक्कम यात एकूण तफावत रु.157941380/- इतकी आहे. काही व्यावसायिकांच्या कराची रक्कम प्रतिवर्षी कमी झाल्याची दिसून येते. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर नियम 27(4) नुसार कार्यवाही केली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 105, 106 व महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहीता 1971 चे नियम 194,195 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही. अंदाजपत्रकीय तरतुदीचे तुलनेत स्थानिक संस्था कर उत्पन्न 2014-15 मध्ये रु.43 कोटी रुपयाने कमी झाले आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीसाठी शास्त्रोक्त पध्दतीचा वापर न***

*करणे. करदात्याचे वर्गवारीनिहाय वर्गीकरण न करणे. स्वयंकर निर्धारण प्रकरणांचे अंतिम निर्धारण न करणे; थकबाकीदार करदात्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही न करणे, या बाबीमुळे अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा प्रत्यक्षात उत्पन्नात रु.43 कोटी चे नुकसान झाले आहे.*

स्थानिक संस्था कर विभागाचे लेखापरीक्षण 2014-15 चे केले असता या कराची आकारणी करण्याचे काम विभागामार्फत केल्याचे दिसून आले आहे. अंदाजपत्रकात तरतुद करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती या विभागाकडून पाठविली आहे. दि .01/04/2010 पासुन शासनाने स्थानिक संस्था कर लागु केला असुन त्यानुसार विभागाने या कराची आकारणी करुन वसुली करण्याचे काम केले आहे. लेखापरीक्षण काळात नोंदणी केलेल्या व प्रत्यक्षात वसुली केलेल्या व्यापा-यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | 2014-15 |
|---|---|---|
| 1 | स्थानिक संस्था कर नियम 3 अन्वये नोंदणी केलेल्या व्यापा-यांची संख्या | 23189 |
| 2 | झिरो पेमेंट धारकांची संख्या | 8355 |
| 3 | ठोक रक्कम भरणा करणा-या व्यापा-यांची संख्या ( द ) | 1824 |
| 4 | वार्षिक विवरणपत्र भरलेल्या व्यापा-यांची संख्या | 626 |
| 5 (1-2,3,4=5) | स्थानिक संस्था कर वसुली न झालेल्या व्यापा-यांची संख्या | 12384 |
| 6 | निर्धारण केलेल्या फाईलची संख्या | 300 |
| 7 | दहा लाखावरील व्यापा-यांची संख्या | 143 |
| 8 | एकुण वसुलीची रक्कम (रु. लाखात) | 9432 |

स्थानिक संस्था कर विभागाने, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2 ( ग)- एकुण 15 बँकांना महापालिकेचे वतीने स्थानिक संस्था कराची रक्कम स्वीकारण्यासाठी प्राधिकृत केले

आहे. (पदनिर्देशीत बँका) लेखापरीक्षण काळात या कराची वसुली प्राधिकृत बँकाव्दारे केली आहे. नोंदणी फीची रक्कम पावती पुस्तकाव्दारे वसुल केली आहे. याबाबत लेखापरीक्षणराचेवेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.26 दि.21/07/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाचा खुलासा पत्र क्र.65/16-17 दि.02/08/2016 रोजी प्राप्त झाला. सदरचा खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 3 व 9 नुसार वैध नोंदणी प्रमाणपत्र असल्या शिवाय व्यापा-यास कोणताही व्यवसाय करता येत नसल्याने दरवर्षी नोंदणी झालेल्या व्यापा-यांची संख्या वाढल्याचे दिसून येते. 2014-15 पर्यंत नोंदणी झालेले व्यापारी 23189 आहेत. महानगरपालिका क्षेत्रात व्यापा-यांची नोंदणी करण्यासाठी सर्व्हेअर किंवा लिपीकाने जो अहवाल कार्यालयास सादर केला, त्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत किंबहुना महानगरपालिकेच्या वतीने इतर परवाने उदा. उपहारगृह, नर्सिंग होम, विदयुत उपकरणे, कारखाने, पेट्रोल पंप, सिमेंट कंपन्या, गॅस एजन्सी इ. करीता दिले जातात. अशा परवांना विभागासोबत समन्वय साधुन स्थानिक संस्था कर वसुली धारकांची संख्या निश्चित केल्याचे दिसून येत नाही. म्हणजेच ज्या व्यापा-यांना अन्य परवाने दिले त्या व्यापा-यांची नोंदणी झाल्याचे तपासुन पाहता आले नाही. तसेच मनपा क्षेत्रात मोठयाप्रमाणात मालाची आयात करणारे व्यवसाईस उदा. बांधकाम व्यवसाईक, सुवर्णकार, पेट्रोल पंप, औदयोगिक परवाने धारक, वाहनांचे सुटे भाग, बिल्डींग व मटेरीअल, ऑनलाईन शॉपिंग, गोडाऊन यांची वर्गवारी निहाय नोंदणी बाबतची सांखिकी माहिती विभागाकडे उपलब्ध झाली नाही. त्यामुळे महानगरपालिका मोठयाप्रमाणात उत्पन्न देऊन शकणाऱ्या स्त्रोताकडून क्षमते इतके उत्पन्न निर्माण करण्यासाठी आवश्यक सांखिकीय डाटाबेस अभावी विभागाला आपेक्षित पुर्ण क्षमतेने उत्पन्न मिळु शकलेले नाही.

2) अंदाजपत्रक करतांना विभागाने पाठविलेल्या माहितीचे आधारावर संभाव्य वसुलीची रक्कम ठरविण्यांत येते. स्थानिक संस्था कर विभागाचा वसुलीचा अंदाज पाहता तो ढोबळ मानाने केल्याचे दिसून येते. 2014-15 मध्ये रक्कम रु.137 कोटीचे उददीष्ट असतांना प्रत्यक्ष वसुली रु.94.32 कोटी झाली. लेखापरीक्षण करतांना 2014-15 मध्ये एकुण 12384 व्यापा-यांकडून या कराची वसुली न झाल्याचे दिसून येते. वसुलपात्र व्यापा-यांची रक्कम अंदाजपत्रक तयार करतांना जमेस धरली नसल्याने अंदाज चुकीचे केले गेले. त्याचा परिणाम विभागाचे वसुलीवर झाला आहे.

अंदाजपत्रकीय तरतूदीच्या तुलनेत प्रत्यक्ष स्थानिक संस्था कर उत्पन्न हे 2014-15 मध्ये रु.43 कोटीने कमी झाले आहे. अंदाजपत्रकीय तरतूदीसाठी शास्त्रोक्त पध्दतीचा वापर न करणे, पात्र करदात्याचे वर्गवारी निहाय वर्गीकरण न करणे, स्वयंमकर निर्धारण कर दात्याचे लेख्यांची तपासणी अंती निर्धारण अंतीम न करणे, जे करदाते निर्धारण पश्चात थकबाकीचा कर भरणा करीत नाहीत. अशा कर दात्याविरूध्द आवश्यक प्रशासकीय कार्यवाही न करणे या सारख्या प्रशासकीय त्रुटी व

वित्तीय नियोजना अभावी महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाचे या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकीय तरतदीच्या तुलनेत रु.43 कोटीचे आर्थिक नुकसान झाले आहे.

3) नोंदणीकृत व्यापा-यांकडून मूल्यवर्धित कराचे विवरणपत्र, विक्रीकराचे विवरणपत्र मागवुन त्यासोबत त्याने खरेदी - विक्री केलेल्या मालाची किंमत ठरविणे आवश्यक आहे. म्हणजेच व्यापारी शासन मान्य दराने स्थानिक संस्था कराचा भरणा करतो की नाही हे तपासणे सुलभ होईल. अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही.

4) परवाना भाईंदरचा असलेले व्यापारी त्यांच्या व्यवसायाचा पत्ता मुंबईचा देवून गोदामाची सुविधा घेतात. अशा व्यावसायिकांना देय कराच्या 10% रक्कम भरण्याची परवानगी दिलेली प्रकरणे लेखापरीक्षणास दाखविली नाहीत. लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेखे उपलब्ध न केल्यामुळे मनपाकडून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, 1930 चे कलम 6 चे उल्लंघन झाले आहे.

5) सोने-चांदी व्यापा-यांकडून वार्षिक विवरणपत्र सादर केल्याचे दिसून आले नाही. अशा व्यावसायिकांवर महानगरपालिकेने कोणती कारवाई केली ते लेखापरीक्षणास अवगत केले नाही.

6) 2014-15 वित्तीय वर्षात एकुण 23189 नोंदणी झालेल्या व्यावसायिकांपैकी केवळ 626 व्यावसायिकांनी वार्षिक विवरणपत्र सादर केले. हे प्रमाण अत्यल्प आहे. विवरणपत्र सादर न केलेल्या व्यावसायिकांना विभागाने नोटीसा निर्गमीत केल्याचे दिसून येते. परंतु नोटीसा देवूनही विवरणपत्रे सादर केली नाहीत अशा व्यावसायिकांवर महानगरपालिकने ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियमातील (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम 48 (6) नुसार विवरणपत्रे विहीत मुदतीत म्हणजेच 90 दिवसांचे कालावधीत सादर न केल्यास व संबंधीताला त्याचे म्हणणे ऐकुन घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर रु.5000 इतकी शास्ती लावता येते. तशी कार्यवाही विभागाने केली नाही.

2014-15 मध्ये एकुण 12384 व्यावसायिकांनी वार्षिक विवरणपत्र सादर केली नाहीत. त्यामुळे प्रत्येकी रु.5000 या दराने रक्कम रु.61920000 शास्तीची वसुली न केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

7) महानगरपालिकेने वार्षिक विवरणपत्र तपासण्यासाठी काही वाणिज्य पदवीधारक कर्मचा-यांची तात्पुरती नियुक्ती केली आहे. 2014-15 मध्ये एकुण 626 व्यावसायिकांनी वार्षिक विवरणपत्रे विभागास प्राप्त झाली आहेत. त्यापैकी केवळ 300 विवरणपत्रांचे निर्धारण केले आहे. प्राप्त झालेल्या सर्व विवरणपत्रांचे निर्धारण न केल्याने तसेच मोठया उलाढालीच्या व्यावसायिकांचे निर्धारण प्रलंबित ठेवल्यामुळे प्रलंबित असलेल्या कराची रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झाली नाही व त्यातुन महापालिकेच्या महसुलात मोठी घट/अपेक्षीत वाढ झाली नाही.

8) स्थानिक संस्था कर विभागाचे काम 21 गटामार्फत केले जाते. महानगरपालिकेने आकारणी करुन दिलेल्या कराचा भरणा खातेदार महानगरपालिकेने प्राधिकृत केलेल्या एकुण 15 बँकेत परस्पर करतात. बँका प्राप्त होणा-या तीन चलनांच्या प्रतीपैकी एक प्रत स्वत: कडे ठेवून एक प्रत व्यापा-यास व एक प्रत स्थानिक संस्था कर विभागास पाठवितात. विभागाला प्राप्त झालेल्या चलनाच्या प्रतीनुसार वसुलीची नोंद विभागाच्या संगणकात व संबंधीत नोंदवही, P रजिस्टरमध्ये केली जाते. दिवसभरात प्राधिकृत बँकानी वसुल केलेल्या रकमेचे विवरणपत्र विभागास पाठविले जाते. विवरणपत्र प्राप्त झाल्यानंतर विभाग प्रत्येक तारखेस प्राधिकृत बँकेने वसुल केलेल्या रकमेची नोंद एका नोंदवहीत घेवून एकत्रिकरण केले जाते. म्हणजेच दिवसभरात वसुल केलेल्या रकमेची नोंद केली जाते. अशी कार्यवाही माहे ऑक्टोबर, 2013 पर्यंत केली आहे. त्यानंतरच्या पुढील काळात विभागाने रोजच्या वसुलीच्या नोंदी संबंधीत नोंदवहीत घेतल्या नाहीत. त्यामुळे स्थानिक संस्था कराची तारखेनिहाय वसुली किती याचा तपशील विभागाने ठेवलेला नाही.

विभागाने प्राधिकृत बँकेमार्फत केलेल्या वसुलीचे एकत्रित चलन करुन लेखा विभागास पाठविलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या लेख्यात रोजच्या वसुलीची नोंद झाली नाही.

स्थानिक संस्था कर विभागाने प्राधिकृत केलेल्या 15 बँकेच्या खाती जमा असलेली रक्कम लेखा शाखेकडून ओरिएंटल बँकेत वर्ग केली जाते आणि ओरिएंटल बँकेत जमा झालेल्या रकमेची नोंद रोखवहीत वसुलीची रक्कम म्हणून दाखविली जाते.याबाबत काही मार्गदर्शक सुचना/आदेश/ठराव असल्याचे लेखापरीक्षणास दाखविले नाही. लेखापरीक्षणाचे वेळी विभागाने मासिक विवरणपत्रानुसार दाखविलेली या कराच्या वसुलीची एकुण रक्कम आणि महानगरपालिकेच्या रोखवहीत घेतलेली एकुण वसुलीची रक्कम यात तफावत असल्याचे दिसून आले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | स्थानिक संस्था कर विभागाने दाखविलेली वसुलीची रक्कम रु. | लेखा विभागाने दाखविलेली वसुलीची रक्कम रु. | तफावत रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | 1101160549 | 943219169 | 157941380 |

एकुण तफावतीची रक्कम रु. 157941380 आहे. ही रक्कम महानगरपालिकेच्या निधीमध्ये कमी असल्याचे दिसून येते. स्थानिक संस्था कर विभाग वसुलीचे चलन लेखा विभागास पाठवत नाही. तसेच माहे मार्च अखेर लेखा विभागाने प्राधिकृत बँकेकडील रक्कम ओरिएंटल बँकेकडे वर्ग केल्यानंतर, प्राधिकृत बँकेकडे किती शिल्लक रक्कम राहिली याचा ताळमेळ (Reconciliation) स्थानिक संस्था कर विभागाने, लेखा विभागाने घेतलेला नाही.

9) स्थानिक संस्था कर विभागास प्राप्त झालेल्या वार्षिक विवरणपत्रांची तपासणी/निर्धारण अनेक

वर्षापासुन केलेले नाही. अशी प्रकरणे मोठा महसुल देणा-या व्यावसायिकांची आहेत. उदा.

अ) मे. अंबुजा सिमेंट लि. व्यवसाय सिमेंट तयार करणे, नोंदणी क्रमांक 21/001/2010-11

| वित्तीय वर्ष | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 |
|---|---|---|---|---|---|
| प्राप्त कराची रक्कम रु. | 23326935 | 20886674 | 9846526 | 9381099 | 8125125 |

या नोंदी P रजिस्टर मधुन घेण्यांत आल्या आहेत. 2010-11 मध्ये नोंदणी झालेल्या व्यावसायिकाने प्रतिवर्ष विवरणपत्र सादर केले आहे. परंतु महानगरपालिकेने एकाही वर्षाचे करनिर्धारण/तपासणी केलेली नाही. या व्यावसायिकाच्या कराची रक्कम पाहता ती प्रतिवर्षी कमी झालेली आहे. महापालिका क्षेत्रात लोकसंख्या, इमारती, नागरीकरण वाढत आहे. असे असतांना कराची रक्कम कमी झाल्याची कारणे लेखापरीक्षणाच्या वेळी विचारली असता सिमेंटचा स्थानिक संस्था कराचा दर शासन निर्णय दि. 06/09/2013 पासुन 4% ऐवजी 2% झाल्याचे सांगण्यांत आले. शासन निर्णय दाखविण्यांत आला. हा दर माहे सप्टेंबर, 2013 पासुन म्हणजे 2013-14 पासुन कमी झाला आहे. परंतु 2010-11 ते 2012-13 पर्यंत दर 4% कायम असतांनासुध्दा कराची रक्कम कमी होत गेल्याचे दिसून आले. अशी बाब का निर्माण झाली याचा विचार महानगरपालिकेच्या वतीने केला गेला नाही. निर्धारण केले नाही. त्यामुळे आर्थिक नुकसान झाले आहे.

ब) मे. जय ट्रेडींग कंपनी. एस.एस. पटटी - नोंदणी क्रमांक 21/035/2010-11

| वित्तीय वर्ष | 2010-11 | 2011-12 |
|---|---|---|
| प्राप्त कराची रक्कम रु. | 2117344 | 197360 |

ही कंपनी माहे ऑक्टोबर, 2011 पासुन बंद करण्यात आली अशी पेन्सीलने नोंद P रजिस्टरमध्ये केली आहे. कंपनी का बंद करण्यांत आली, खरोखर कंपनी बंद झाल्याची पडताळणी विभागाच्या कोणत्या अधिका-याने आणि कधी केली, याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविली नाहीत. व्यावसायिकाचे प्राप्त विवरणपत्राचे निर्धारण/तपासणी केली नाही.

क) मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन - डीझेल/पेट्रोल व्यवसाय, नोंदणी क्रमांक 21/411/2012-13

| वित्तीय वर्ष | 2012-13 | 2013-14 | 2014-15 |
|---|---|---|---|
| प्राप्त कराची रक्कम रु. | 8331349 | 41648568 | 19634494 |

नोंदणी 2012-13 मधील असुन 2013-14 पेक्षा 2014-15 मधील कराच्या वसुलीचे प्रमाण लक्षणीय कमी झाल्याचे दिसून येते. व्यावसायिकाने विवरणपत्र सादर केले असुन त्याचे निर्धारण/तपासणी विभागाने केलेली नाही. महानगरपालिका क्षेत्रामधील वाहनांची संख्या वाढलेली

असुनही करापासुन मिळणारे उत्पन्न कमी-कमी झाल्याचे दिसून येते.

10) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 27(4) नुसार महानगरपालिकेच्या हददीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा व्यवसायीकाने/कंत्राटदाराने स्थानिक संस्था कराची नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच त्याने आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय असेल किंवा या कराचे ठोक प्रदान करण्याचा पर्याय स्वीकारता येईल. त्यानुसार चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम असणा-या इमारतीवर रु.100/- प्रति चौ. मीटर, सातव्या मजल्यापर्यंतचे बांधकाम असणा-या इमारतीवर रु.150/- प्रति चौ. मीटर, उत्तुंग इमारतीचे बांधकाम असणा-या इमारतीवर रु.200/- प्रति चौ. मीटर या दराने कर भरावा लागणार आहे. 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने किती इमारतींना परवानगी दिली याची माहिती घेवून स्थानिक संस्था कर विभागाने एकुण किती व्यावसायिक/ कंत्राटदारांची नोंदणी केली आणि त्यांचे कडून एकुण किती कराची वसुली केली, याची माहिती लेखापरीक्षणास सादर केली नाही.

तसेच उपरोक्त नियम 27(5) नुसार महानगरपालिकेच्या हददीमध्ये काम (विकास कामे/दुरुस्ती कामे) हाती घेतलेल्या कंत्राटदाराचे कडून एकुण किती कामांची या कराची रक्कम वसुल केली याचेही अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत.

11) महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमातील कलम 105, 106 व महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 चे नियम 194, 195 नुसार कार्यवाही झाली नाही. स्थानिक संस्था कर हा उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत असलेल्या विभागाची अंतर्गत तपासणी झालेली दिसून येत नाही. एकंदरीत स्थानिक संस्था कराच्या वसुलीबाबत अंतर्गत तपासणी (Internal Checks), अंतर्गत लेखापरीक्षण (Internal Audit), अंतर्गत नियंत्रण (Internal Control) चा अभाव असल्याचे दिसून येते.

वसुलपात्र रक्कम

विवरणपत्र मुदतीत सादर न केल्याने शास्तीची वसुलपात्र रक्कम

2014-15 रु.61920000

आक्षेपाधीन रक्कम

विभागाने दाखविलेली वसुलीची रक्कम आणि प्रत्यक्षात लेखा शाखेने लेख्यात दाखविलेली या कराच्या रक्कमेची वसुली यातील तफावत रु.157941380

(गुंतलेली रक्कम = वसुलपात्र रक्कम + आक्षेपाधीन रक्कम + अंदाजपत्रकीय रक्कम व वसुलपात्र रकमेतील तफावतीची रक्कम)

## 25 आर्थिक वर्ष 2014-2015 च्या वार्षिक लेख्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

*लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता (National Muncipal Accounting Mannual) IIप्रकरण 31 मधील तरतुदीनुसार महापालिकेने तयार केलेला 2014-2015 या आर्थिक वर्षाचा परिपूर्ण वार्षिक आवश्यक सहपत्रे पूरक अभिलेख्यासह लेखापरीक्षणास उपलबध् झाली नाहीत. त्याअभावी वार्षिक लेख्याबाबत लेखापरीक्षण पथकाकडून अभिप्राय नोंदविता आले नाहीत.*** |

वर्ष 2014-15 या वित्तीय वर्षाचे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे लेखा विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 मधील कलम 94 नुसार विहीत वार्षिक लेखा विवरणपत्र व वार्षिक प्रशासन अहवाल लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करणेबाबत अर्धसमास पत्र क्रं.95 दिनांक 07/11/2016 अन्वये निर्गमित केले असून लेखा विभागाकडून संदर्भित अभिलेख उपलब्ध् न केल्यामुळे स्मरण पत्र 1 दि. 19.12.2016 (अर्धसमास ज्ञापन क्रं.132 दि.19.12.2016.) अन्वये पुन्हा मागणी करण्यात आले असता वार्षिक लेख्यासंदर्भात उपलबध् न केलेले अभिलेख्यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता ( National Muncipal Accounting Mannual) Iप्रकरण 31 मधील तरतुदीनुसार महापालिकेने तयार केलेला 2014-15 या आर्थिक वर्षाचा परिपूर्ण वार्षिक लेखा आवश्यक सहपत्रे (उदा.जमा खर्चाचे विववरण पत्र ,उत्पन्न खर्च विवरणपत्र , ताळेबंद पत्रक,Statement of Cash Flow, Financial Performance Indicators,व महत्वाची वित्तीय ध्येय धोरणे इ.) व आवश्यक पूरक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलबध झाले नाही.त्याअभावी वार्षिक लेख्याबाबत लेखापरीक्षण पथकाकडून अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

DATVGSM7291 (Ref No : 70, Hami No : 95)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

26 *पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेकरिता वापरलेल्या वाहनाबाबत व खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 03

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : ९ब*

गुंतलेली रक्कम रु. 270000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 34650.00/-

| |
|---|
| ***महानगरपालिकेनेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांनी त्यांचे लसीकरण मोहिमेकरिता किती वाहने, कोणत्या ठिकाणी आवश्यक आहेत याची मागणी केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणात उपलब्ध झाले नाहीत. महानगरपालिकेने मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांची वाहने मासिक दराने भाड्याने ठेका मंजुरीद्वारे घेतली असताना व त्याव्यतिरिक्त महानगरपालिकेची देखील स्वतंत्र वाहने उपलब्ध असताना वैद्यकीय आरोग्य विभागाने रविवार या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी राबविलेल्या लसीकरण मोहिमेकरिता मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांची स्वतंत्रपणे भाड्याची वाहने घेऊन लसीकरण मोहीम राबविल्याने महानगरपालिकेस रक्कम रु.२,७०,०००/- इतका जादा खर्चामुळे महानगरपालिकेचे नुकसान झाले असून भाड्याने घेतलेली वाहने पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेकरिता स्वतंत्र घेऊन त्यांचे भाड्यापोटी रक्कम रु.१६६५० इतक्या रक्कमेचे दुबार प्रदान झाले आहे.*** |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वाहन विभागाचे वर्ष २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात असे दिसून आले की वैद्यकीय आरोग्य विभागाने प्रमाणकासोबत पल्स पोलिओ लसीकरण मोहिम दिनांक १६/०६/२०१३, २२/०९/२०१३, २४/११/२०१३, १९/०१/२०१४, २३/०२/२०१४ व ०६/०४/२०१४ या दिवशी वापरलेल्या वाहनांची कागदपत्रे जोडली आहेत तथापि नमुना न. मधील प्रमाणकावर दिनांक ०६/०४/२०१४ ची मोहीम वगळून आरोग्य विभागाने भाड्याची ३० वाहने मोहिमेच्या प्रत्येक दिवशी वापरल्याचे दर्शवून प्रमाणक क्रमांक १०११ दिनांक ०९/०३/२०१५ अन्वये रक्कम रु.२,७०,०००/- खर्च केला आहे याबाबत आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.१६० दिनांक १०/०१/२०१७ अन्वये कळविले असता वाहन विभागाने पत्र क्र. मनपा/वाहन/१६२/१६-१७ दिनांक ३१/०१/२०१७ अन्वये सदरचा आक्षेप हा वैद्यकीय आरोग्य विभागाशी निगडीत असल्याने संबंधित विभागास याबाबत पत्र क्र.१६१ दिनांक ३०/०१/२०१७ अन्वये कळविण्यात आले आहे. सबब याबाबत लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

(१) मिरा-भाईंदर मनपाचे सर्वसाधारणपणे २० चौ.कि.मी क्षेत्रफळ आहे. सदर क्षेत्रात वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत एकूण ९ प्राथमिक आरोग्य केंद्रे असल्याचे देयकावरून दिसून आले आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे

१ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत सरासरी २ ते ३ कि.मी. क्षेत्र येते. सबब संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांनी त्यांचे लसीकरण मोहिमेकरिता किती वाहने, कोणत्या ठिकाणी आवश्यक आहेत याची मागणी केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणात उपलब्ध झाले नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रांनी खालीलप्रमाणे २८ वापरलेल्या वाहन संख्यांची आवश्यकता होती याबाबत लेखा परीक्षणाची खात्री पटवावी.

१) प्रा.आ.केंद्र उत्तन - ०४ वाहने

२) प्रा.आ.केंद्र भाईंदर - ०२ वाहने

३) प्रा.आ.केंद्र विनायक नगर - ०१ वाहन

४) प्रा.आ.केंद्र गणेश देवल नगर - ०१ वाहन

५) प्रा.आ.केंद्र बंदरवाडी - ०४ वाहने

६) प्रा.आ.केंद्र नवघर - ०६ वाहने

७) मिरा रोड - ०६ वाहने

८) काशी गांव - ०२ वाहने

९) पेणकर पाडा - ०२

वरीलप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंदानी प्रत्यक्षात २८ वाहनेच वापरलेली असल्याचे प्रमाणकासोबतच्या कागदपत्रावरून दिसून येत असल्याने २ जादा वाहनांपोटी झालेले जादा प्रदान रक्कम रु.१८,०००/- ची वसुली करणे आवश्यक आहे.

(२) महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांची वाहने मासिक दराने भाडयाने ठेका मंजुरीद्वारे घेतली असताना व त्याव्यतिरिक्त महानगरपालिकेची देखील स्वतंत्र वाहने उपलब्ध असताना वैद्यकीय आरोग्य विभागाने रविवार या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी राबविलेल्या लसीकरण मोहिमेकरिता मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांची स्वतंत्रपणे भाड्याची वाहने घेऊन लसीकरण मोहीम राबविल्याने महानगरपालिकेस रक्कम रु.२,७०,०००/- इतका जादा खर्च सोसावा लागल्याने तेवढ्या रक्कमेचे आर्थिकदृष्ट्या महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे.

(३) मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांची मासिक दराने विविध विभागांसाठी भाडयाने वाहनांचे मंजूर भाडे दर हे मासिक सुट्टयांसह असल्याने सदरची वाहने सुट्टीच्या दिवशी देखील वापरल्याचे दिसून आले आहे. सदर प्रकरणी उदाहरणार्थ लेखा परीक्षणात प्राप्त झालेल्या माहे एप्रिल १४ या महिन्याचे प्राप्त प्रमाणकाचा मेळ लसीकरण मोहीम रविवार दिनांक ०६/०४/२०१४ सोबत घेतला असता खालीलप्रमाणे विभागासाठी मासिक भाडयाने घेतलेले वाहन सदर मोहीमेच्या दिनांकास देखील वापरून त्याचे वेगळे भाडे प्रदान केल्याचे दिसून आले आहे.

| अ.क्र. | माहे एप्रिल १४ मध्ये वापरलेले वाहन क्रमांक | विभागाचे नांव | वाहन वापरलेले अधिकारी / कर्मचारी | मासिक भाडे रक्कम | दि.०६/०४/२०१४ रोजी वापरलेले वाहन | प्रा.आ.केंद्र | प्रदान भाडे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | MH04DE4956 | सार्व.आरोग्य | श्री.संदीप शिंदे | २९००० | MH04DE4956 | नवघर | १८५० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | MH04CE9375 | स्था.सं.कर | श्री.भोपतराव | २९००० | MH04CE9375 | मिरा रोड | १८५० |
| ०३ | MH04DE648 | स्था.सं.कर | श्रीम.मंजिरी डिमेलो | २९००० | MH04DE648 | काशी गांव | १८५० |
| ०४ | MH04E9133 | स्था.सं.कर | श्री.अरुण धर्माधिकारी | २४५०० | MH04E9133 | भाईंदर(प) | १८५० |
| ०५ | MH04CE7873 | अतिक्रमण | श्री.कुंदन पाटील | २९००० | MH04CE7873 | बंदरवाडी | १८५० |
| ०६ | MH04CE8310 | अतिक्रमण | श्री.कुंदन पाटील | २९००० | MH04CE8310 | पेणकरपाडा | १८५० |
| ०७ | MH06J4631 | अतिक्रमण | श्री.विकास परब | २९००० | MH06J4631 | पेणकरपाडा | १८५० |
| ०८ | MH13N700 | जाहिरात | श्रीम.चारुशीला खरपडे | २९००० | MH13N700 | नवघर | १८५० |
| ०९ | MH04CE9600 | जाहिरात | श्रीम.चारुशीला खरपडे | २९००० | MH04CE9600 | काशी गांव | १८५० |
| | | | | | | एकूण | १६६५० |

वरीलप्रमाणे झालेल्या दुबार प्रदान रक्कम रु.16650/- ची वसुली करावी व तसेच माहे एप्रिल 14 व्यतिरिक्त वर्ष 2013-14 व 2014-15 मधील इतर लसीकरण मोहीम दिनांक व वापरलेल्या वाहनांचा मेळ घेवून दुबार प्रदानाची वसुली वाहन विभागाने करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास करावे.

DGPVTTM7001 (Ref No : 16, Hmm No : 160)

## *27 पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेकरिता वापरलेल्या वाहनाबाबत व खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : वाहन वैद्यकीय आरोग्य मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 187723.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 187723.00/-

*महानगरपालिकेनेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांनी त्यांचे लसीकरण मोहिमेकरिता किती वाहने, कोणत्या*

*ठिकाणी आवश्यक आहेत याची मागणी केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणात उपलब्ध झाले नाहीत. महानगरपालिकेने मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांची वाहने मासिक दराने भाडयाने ठेका मंजुरीद्वारे घेतली असताना व त्याव्यतिरिक्त महानगरपालिकेची देखील स्वतंत्र वाहने उपलब्ध असताना वैद्यकीय आरोग्य विभागाने रविवार या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी राबविलेल्या लसीकरण मोहिमेकरिता मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांची* ***स्वतंत्रपणे भाड्याची वाहने घेऊन लसीकरण मोहीम राबविल्याने महानगरपालिकेस रक्कम रु.२,७०,०००/- इतका जादा खर्चामुळे महानगरपालिकेचे नुकसान झाले असून भाडयाने घेतलेली वाहने पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेकरिता स्वतंत्र घेऊन त्यांचे भाड्यापोटी रक्कम रु.३४२००/- इतक्या रक्कमेचे दुबार प्रदान झाले आहे.***

अ) मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या वाहन विभागाचे वर्ष २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात असे दिसून आले की वैद्यकीय आरोग्य विभागाने प्रमाणकासोबत पल्स पोलिओ लसीकरण मोहिम दिनांक १६/०६/२०१३, २२/०९/२०१३, २४/११/२०१३, १९/०१/२०१४, २३/०२/२०१४ व ०६/०४/२०१४ या दिवशी आरोग्य विभागाने भाडयाची ३० वाहने मोहिमेच्या प्रत्येक दिवशी वापरल्याचे दर्शवून प्रमाणक क्रमांक १०११ दिनांक ०९/०३/२०१५ अन्वये रक्कम रु.२,७०,०००/- खर्च केला आहे. याबाबत आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.१६० दिनांक १०/०१/२०१७ अन्वये कळविले असता वाहन विभागाने पत्र क्र. मनपा/वाहन/१६२/१६-१७ दिनांक ३१/०१/२०१७ अन्वये सदरचा आक्षेप हा वैद्यकीय आरोग्य विभागाशी निगडीत असल्याने संबंधित विभागास याबाबत पत्र क्र.१६१ दिनांक ३०/०१/२०१७ अन्वये कळविण्यात आले आहे असा खुलासा केला आहे. सबब याबाबत लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांची मासिक दराने विविध विभागांसाठी भाडयाने वाहनांचे मंजूर भाडे दर हे मासिक सुट्टयांसह असल्याने सदरची वाहने सुट्टीच्या दिवशी देखील वापरल्याचे दिसून आले आहे. सदर प्रकरणी उदाहरणार्थ लेखा परीक्षणात प्राप्त झालेल्या माहे जून-२०१३, सप्टेंबर-२०१३, नोव्हेंबर-२०१३ व फेब्रुवारी-२०१४ या महिन्यात वापरलेल्या वाहनाचा प्राप्त प्रमाणकातील मेळ लसीकरण मोहीम रविवार दिनांक १६/०६/२०१३, २२/०९/२०१३, २४/११/२०१३, २३/०२/२०१४ सोबत घेतला असता खालीलप्रमाणे विभागासाठी मासिक भाडयाने घेतलेले वाहन सदर मोहीमेच्या दिनांकास देखील वापरून त्याचे वेगळे भाडे प्रदान केल्याचे दिसून आले आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | भाडे प्रदान महिना | वाहन वापर विभाग | वाहन वापर अधिकारी / कर्मचारी व विभाग | मासिक भाडे रक्कम | पल्सपोलिओ मोहिम वाहन वापर दिनांक | वापरलेले वाहन | प्रा.आ.केंद्र | प्रदान भाडे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | MH04E9133 | जून-२०१३ | स्था.सं.कर | श्री.गायकवाड | ३१९०० | १६ /०६ /२०१३ | MH04E9133 | भाईदर | १८०० |
| ०२ | MH04BN678 | जून-२०१३ | स्था.सं.कर | श्री.भोपतराव | ३१९०० | १६ /०६ /२०१३ | MH04BN678 | गणेशदेवल नगर | १८०० |
| ०३ | MH04CE7873 | जून-२०१३ | अतिक्रमण प्र.क्र.२ | श्री.साळवी | ३१९०० | १६ /०६ /२०१३ | MH04CE7873 | बंदरवाडी | १८०० |
| ०४ | MH04DB689 | जून-२०१३ | स्था.सं.कर | नांव नाही, विभाग क्र.१७,१८,१९,२० | ३१९०० | १६ /०६ /२०१३ | MH04DB689 | नवघर | १८०० |
| ०५ | MH04EX2359 | जून-२०१३ | सार्व.आरोग्य | श्री.पवार | ३१९०० | १६ /०६ /२०१३ | MH04EX2359 | नवघर | १८०० |
| ०६ | MH04CE9375 | जून-२०१३ | आपत्कालीन | श्री.उदावंत | २२३२३ | १६ /०६ /२०१३ | MH04CE9375 | मिरारोड | १८०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | MH12YA8696 | जून-२०१३ | आपत्कालीन | श्री.शाम टेंपरी | २९००० | १८/०८/२०१३ | MH12YA8696 | मिरारोड | १८०० |
| ०८ | MH04FF2577 | सप्टेंबर-१३ | पाणीपुरवठा | श्री.किरण राठोड | ३१९०० | २२/०९/२०१३ | MH04FF2577 | विनायकनगर | १८०० |
| ०९ | MH04AY5637 | सप्टेंबर-१३ | अतिक्रमण | नांव नाही प्र.स.क्र.५ | ३१९०० | २२/०९/२०१३ | MH04AY5637 | नवघर | १८०० |
| १० | MH04CE8310 | सप्टेंबर-१३ | अतिक्रमण | नांव नाही प्र.स.क्र.४ | ३१९०० | २२/०९/२०१३ | MH04CE8310 | पेणकरपाडा | १८०० |
| ११ | MH04J4631 | सप्टेंबर-१३ | अतिक्रमण | श्री.शैलेश शिंदे प्र.स.क्र.४ | ३१९०० | २२/०९/२०१३ | MH04J4631 | पेणकरपाडा | १८०० |
| १२ | MH04BN678 | नोव्हेंबर-१३ | प्रभाग समिती | नांव नाही | ३१९०० | २४/११/२०१३ | MH04BN678 | गणेशदेवल नगर | १८०० |
| १३ | MH43D2455 | नोव्हेंबर १३ | अतिक्रमण | श्री.शिरीष ) पवार प्र.स.क्र.२ | ३१९०० | २४/११/२०१३ | MH43D2455 | बंदरवाडी | १८०० |
| १४ | MH04FF2577 | नोव्हेंबर १३ | स्था.सं.कर | श्री.अविनाश जाधव | २४००० | २४/११/२०१३ | MH04FF2577 | नवघर | १८०० |
| १५ | MH04AS1733 | नोव्हेंबर १३ | विद्युत | श्री.सचिन पवार | ३१९०० | २४/११/२०१३ | MH04AS1733 | मिरारोड | १८०० |
| १६ | MH06J4631 | नोव्हेंबर १३ | अतिक्रमण | श्री.शैलेश शिंदे प्र.स.क्र.६ | ३१९०० | २४/११/२०१३ | MH06J4631 | पेणकरपाडा | १८०० |
| १७ | MH04CE4665 | फेब्रुवारी-१४ | मालमत्ता कर | श्री.भार्गव पाटील | ३१९०० | २३/०२/२०१४ | MH04CE4665 | भाईंदर | १८०० |
| १८ | MH04AX6931 | फेब्रुवारी १४ | मालमत्ता कर | श्रीमती शिंदे | २४००० | २३/०२/२०१४ | MH04AX6931 | भाईंदर | १८०० |
| १९ | MH04ES1399 | फेब्रुवारी १४ | मालमत्ता कर | प्रभाकर म्हात्रे | ३१९०० | २३/०२/२०१४ | MH04ES1399 | गणेशदेवल नगर | १८०० |
| २० | MH04AR7683 | फेब्रुवारी १४ | | | | | MH04AR7683 | | |
| | | | | | | | | एकूण वसुली | ३४२०० |

वरीलप्रमाणे झालेल्या रक्कम रु.३४२००/- च्या दुबार प्रदानाव्यतिरिक्त वर्ष २०१३-१४ मधील इतर लसीकरण मोहीम दिनांक व वापरलेल्या वाहनांचा मेळ घेऊन दुबार प्रदानाची वसुली वाहन विभागाने करून तसे अनुपालन लेखा परीक्षणास सादर केले नाही.

२) वाहन क्रमांक एमएच०४ सीई-३६९७ व एमएच०४ जे-४६३१ ही वाहने प्रा.आ.केंद्र बंदरवाडी व प्रा.आ.केंद्र पेणकरपाडा येथे दिनांक २३/०२/२०१४ रोजी वापरल्याचे दर्शवून दुबार प्रदान केले आहे त्यामुळे रक्कम रु.१८००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.३६००/- चे जादा प्रदान झाले आहे. तरी सदर दुबार प्रदानाची वसुली करून अनुपालन करावे.

ब) खालीलप्रमाणे एकच वाहन एकाच महिन्यात दोन वेगवेगळ्या विभागांतर्गत वेगवेगळे अधिकारी यांनी वापरल्याचे दर्शवून खालील प्रमाणकान्वये रक्कम रु. १४९९२३ चे दुबार प्रदान झालेचे दिसून येत आहे तरी याबाबत खुलासा करून उचित कार्यवाही करावी.

| अ.क्र | वाहन क्रमांक | भाडे प्रदान महिना | प्रमाणक क्र.दिनांक | वाहन -वापर अधिकारी /कर्मचारी व विभाग | प्रदान भाडे रक्कम | वाहन क्रमांक | भाडे प्रदान महिना | प्रमाणक क्र.दिनांक | वाहन वापर अधिकारी / कर्मचारी व विभाग | प्रदान भाडे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MH04CE7873 | ६ /२०१३ | १०७३/२८.१०.१३ रु.३४८०५० | श्री.साळवी, अतिक्रमण प्र.क्र.२ | ३१९०० | MH04CE7873 | ६ /२०१३ | १२६४/२९.११.१३ रु.२२३२३० | अभय सोनावणे आपत्कालीन | २२३२३ |
| | MH04CE7873 | ७ /२०१३ | १६४९/१५.२.१४ रु.७४४८४० | नाव नाही. अतिक्रमण विभाग | ३१९०० | MH04CE7873 | ७ /२०१३ | १९१०/२९.3.१४ रु.६3८००० | अभय सोनावणे आपत्कालीन | ३१९०० |
| | MH04BN678 | ८/२०१३ | १२६४/२९.११.१३ रु.६3८००० | श्री.उदावंत, आपत्कालीन | ३१९०० | MH04BN678 | ८/२०१३ | १९१०/२९.3.१४ रु.६3८००० | श्री.भोपतराव/कुलकर्णी, स्था.सं.कर | ३१९०० |
| | MH04CE7873 | ८ /२०१३ | १२६४/२९.११.१३ रु.६3८००० | अभय सोनावणे. आपत्कालीन | ३१९०० | MH04CE7873 | ८ /२०१३ | १४१०/२६.१२.१३ रु.६3८००० | श्री.साळवी, अतिक्रमण प्र.क्र.२ | ३१९०० |
| | MH04BN678 | ९/२०१३ | १६४९/१५.२.१४ रु.७४४८४० | नाव नाही. प्रभाग क्र.४ | ३१९०० | MH04BN678 | ९/२०१३ | १९१०/२९.3.१४ रु.६3८००० | श्री.उदावंत, आपत्कालीन | ३१९०० |
| | | | | | | | | | एकूण वसुली | १४९९२3 |

एकूण वसुलपात्र रक्कम रु.१४९९२3+3६००+3४२०० = १८७७२3

DGPVTTM7001 (Ref No : 18, Hmm No : 166)

## 28 वाहन इंधन बिलावर अकाउंट ऑपरेटिंग चार्जेस (परिचलन शुल्क) अदा केलेबाबत

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015

**अनियमितता संख्या** : 2

*लेखा शीर्ष : वाहन इंधन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 51054.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 51054.00/-

| |
|---|
| ***मे. साई सर्व्हिस सेंटर यांचेकडून पेट्रोल/डीझेल/ऑईल खरेदी/पुरवठा केले असून पेट्रोल/डीझेल दर नियंत्रित असताना सदर इंधन पुरवठ्याच्या बिलाच्या रक्कमेवर १ टक्के अकाउंट ऑपरेटिंग चार्जेस (परिचलन शुल्क) अदा केले असल्याने सदरची रक्कम रु.४८७३४ ची वसुली करणे आवश्यक आहे.*** |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे वर्ष २०१४-१५ या वर्षाचे लेखा परीक्षणात वाहन विभागाकडील वाहन इंधन खरेदीची प्रमाणके तपासता असे दिसून आले कि मे.साई सर्व्हिस सेंटर यांचेकडून पेट्रोल/डीझेल/ऑईल खरेदी/पुरवठा केले असून सदर पुरवठ्याच्या बिलाच्या रक्कमेवर १% अकाउंट ऑपरेटिंग चार्जेस (परिचलन शुल्क) अदा केले असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १६७ दिनांक --- अन्वये कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र. मनपा/वाहन/१६२/१६-१७ दिनांक ३१/०१/२०१७ अन्वये केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

१)पेट्रोल/डीझेल या अत्यावश्यक वस्तू सेवा असल्याने व त्यावर केंद्र शासनाचे नियंत्रण असून पेट्रोल/डीझेल चे दर केंद्र शासनाने नियंत्रित केले आहेत. त्यामुळे सदर इंधन खरेदी शासनाने निश्चित केलेल्या दराप्रमाणेच खरेदी करणे आवश्यक आहे. तथापि वर्ष २०१४-१५ मध्ये मे. साई सर्व्हिस सेंटर यांना १% परिचलन शुल्क अदा केल्याने सदर प्रकरणी पेट्रोल/डीझेल ची खरेदी जादा दराने झाली आहे. वाहन विभागाकडील लेखाशीर्ष खर्च तरतूद नोंदवहीनुसार वर्ष २०१४-१५ मध्ये रक्कम रु.५१०५३६० इतका इंधन खरेदीवर खर्च झाला आहे. सदर इंधन खरेदीवर परिचलन शुल्क म्हणून रक्कम रु.५१०५४/- प्रदान केली असल्याने सदरची रक्कम वसुलपात्र आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 19, Hmm No : 167)

## *29 लेखा विभागातील लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015.**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3749627.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3749627.00/-

*शासन निर्णय क्र.जीईएल1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि.03/11/2003 अन्वये शासनाची विमा धोरणाची अंमलबजावणी झालेली नाही. देयकातून कामगार कल्याण उपकर कमी वसुल केला आहे.*

सन 2014-2015 या वित्तिय वर्षातील रस्ता निधी रोखवहीचे रेखांकन करीत असताना ठेकेदारांना अदा केलेल्या देयकातून शासकिय विमा कपात करुन विमा संचालनयास भरणा न करता महापालिकेच्या फंडातच जमा असल्याचे दिसून येते, तसेच काही प्रकरणात ठेकेदारांना प्रदान केलेल्या देयकातुन शासकिय विमा कपात केल्याचे दिसून आले नाही. याबावत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.07 दि.17/05/2016 निर्गमित केले असता दि.14/07/2016 रोजी विभागाने अनुपालन सादर केले असून सदरचा खुलासा मुळ आक्षेपाशी विसंगत आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)शासन निर्णय क्र.जीईएल1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि.03/11/2003 अन्वये शासनाची विमा धोरणाची अंमलबजावणी परिणामकारकपणे होऊन राज्यातील महानगरपालिकांना विमा पत्रावरील अतिरिक्त आर्थिक सुरक्षिततेचा फायदा मिळण्यासाठी प्रत्येक कंत्राटी कामाचा विमा वित्तीय शिस्तीची बाब म्हणुन शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयातील अट क्र.01 नुसार प्रत्येत प्रकारच्या कंत्राटी कामाचे स्विकारपत्र व कार्यादेश कंत्राटदाराला निर्गमित करतांना त्याची एक प्रत शासकीय विमा निधी या कार्यालयास अग्रेषित करणे तसेच अट क्र.02 नुसार कंत्राटी कामापोटी कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा योग्य प्रकारे शासकीय विमा निधीकडे उतरवुन त्यासंबंधिचा पुरावा सादर केलेला आहे. त्याची खात्री करावी तदनंतरच कंत्राटी कामापोटीची देय रक्कम प्रदान करावी, असे असतांना विभागाने सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी केली नाही.

**रस्ता निधी रोखवही 2014-15**

| अ.क्र. | प्रमाणक क्र.व दिनांक | एकूण रक्कम | शासकिय विमा कपात करावयाची रक्कम | लेखा विभागांनी कपात केलेली रक्कम | उर्वरीत कपात करावशची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/15.05.2014 | 1558885 | 15589 | 0 | 15589 |
| 2 | 2/22.05.2014 | 1572293 | 15723 | 11063 | 4660 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 3/30.05.2014 | 11489702 | 114897 | 0 | 114897 |
| 4 | 4/01.06.2014 | 2748671 | 27487 | 0 | 27487 |
| 5 | 5/01.06.2014 | 1008711 | 10087 | 0 | 10087 |
| 6 | 6/01.06.2014 | 13028424 | 130284 | 0 | 130284 |
| 7 | 7/08.07.2014 | 1265377 | 12654 | 0 | 12654 |
| 8 | 8/08.07.2014 | 2440113 | 24401 | 0 | 24401 |
| 9 | 9/24.07.2014 | 251701 | 2517 | 0 | 2517 |
| 10 | 10/02.08.2014 | 4049407 | 40494 | 0 | 40494 |
| 11 | 12/22.08.2014 | 29721758 | 297218 | 0 | 297218 |
| 12 | 13/02.09.2014 | 8685199 | 86852 | 0 | 86852 |
| 13 | 14/12.09.2014 | 6202306 | 62023 | 0 | 62023 |
| 14 | 15/16.09.2014 | 8280128 | 82801 | 0 | 82801 |
| 15 | 16/16.10.2014 | 6896588 | 68966 | 0 | 68966 |
| 16 | 17/27.10.2014 | 3919474 | 39195 | 5485 | 33710 |
| 17 | 18/03.11.2014 | 13073908 | 130739 | 0 | 130739 |
| 18 | 19/13.11.2014 | 14195341 | 141953 | 2864 | 139089 |
| 19 | 20/18.11.2014 | 10138013 | 101380 | 0 | 101380 |
| 20 | 21/28.11.2014 | 2023330 | 20233 | 20233 | 0 |
| 21 | 22/05.12.2014 | 6067472 | 60675 | 0 | 60675 |
| 22 | 23/12.12.2014 | 2364609 | 23646 | 8636 | 15011 |
| 23 | 24/17.12.2014 | 1894747 | 18947 | 0 | 18947 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 24 | 25/20.12.2014 | 3472190 | 34722 | 10046 | 24676 |
| 25 | 26/22.12.2014 | 18969677 | 189697 | 0 | 189697 |
| 26 | 27/05.01.2015 | 16083508 | 160835 | 17343 | 143492 |
| 27 | 28/12.01.2015 | 1688276 | 16883 | 0 | 16883 |
| 28 | 29/22.01.2015 | 4449634 | 44496 | 3451 | 41045 |
| 29 | 30/30.01.2015 | 20291267 | 202913 | 0 | 202913 |
| 30 | 31.20.02.2015 | 47267366 | 472674 | 0 | 472674 |
| 31 | 32/20.02.2015 | 3341838 | 33418 | 712 | 32706 |
| 32 | 33/20.02.2015 | 4665150 | 46652 | 17379 | 29173 |
| 33 | 34/11.03.2015 | 14772779 | 147728 | 0 | 147728 |
| 34 | 35/16.03.2015 | 12498355 | 124984 | 0 | 124984 |
| 35 | 36/24.03.2015 | 7990492 | 79905 | 497 | 79408 |
| 36 | 37/31.03.2015 | 11334688 | 113347 | 10567 | 102781 |
| 37 | 38/31.03.2015 | 7151764 | 71518 | 24107 | 47411 |
| 38 | 39/31.03.2015 | 15538828 | 155388 | 0 | 155388 |
| 39 | 40/31.03.2015 | 9597686 | 95977 | 0 | 95977 |
| 40 | 41/31.03.2015 | 22982718 | 229827 | 29175 | 200652 |
| | एकूण:- | 374972373 | 3749725 | 161558 | 3588069 |

वर नमुद केलेल्या तक्त्यातील शासकीय विमा पोटी लेखा विभागाने देयकातून कपात केलेली रक्कम रू.161558 व वसूलपात्र कपात करावयाची रक्कम रू.3588069 अशी एकूण रक्कम रू.3749627 नमूद शासन शिर्षाखाली भरणा केली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम रु. 3749627



## 30 लेखा विभागातील लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या त्रुटीबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा नि ी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1585781.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 938274.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 647507.00/-

***शासन निर्णय क्रं.जीईएल.1098/1357/प्र.क्रं.166/98/नवि-24 दिनांक 03/11/2003 अन्वये शासनाची विमा धोरणाची अंमलबजावणी झालेली नाही. मे.सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. या ठेकेदारास करारनाम्यातील मुदत संपल्यानंतर माहे जानेवारी व फेब्रुवारी 2015 या कालावधीतील हाऊसकिपिंग कामापोटी सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय प्रदान केलेले आहे.***

सन 2014-2015 या वित्तिय वर्षातील खर्चाचे रेखांकन करीत असताना खालील त्रुटी आढळून आल्या.याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रं.09 दिनांक 20/05/2016 निर्गमित केले असता दिनांक 14/07/2016 रोजी विभागाने अनुपालन सादर केले असून सदरचा खुलासा मूळ आक्षेपांशी विसंगत आहे.त्यानुसार खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) शासन निर्णय क्रं.जीईएल 1098/1357/प्र.क्रं.166/98/नवि-24 दिनांक 03/11/2003 अन्वये शासनाची विमा धोरणाची अंमलबजावणी परिणामकारकपणे होऊन राज्यातील महापालिकाना विमा पत्रावरील अतिरीक्त आर्थिक सुरक्षिततेचा फायदा मिळण्यासाठी प्रत्येक कंत्राटी कामाचा विमा वित्तिय शिस्तीची बाब म्हणून शासकिय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयातील अट क्रं.01 नुसार प्रत्येक प्रकारच्या कंत्राटी कामाचे स्विकारपत्र व कार्यादेश कंत्राटदाराला निर्गमित करताना त्याची एक प्रत शासकिय विमा निधी या कार्यालयास अग्रेषित करणे तसेच अट क्रं. 02 नुसार कंत्राटी कामापोटी कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा योग्य प्रकारे शासकिय विमानिधीकडे उतरवून त्या संबधीचा पुरावा सादर केलेला आहे, त्याची खात्री करावी. तदनंतरच कंत्राटी कामापोटीची देय रक्कम प्रदान करावी, असे असताना विभागाने सदर शासन निर्णयाचे उल्लंघन केले आहे.

विकास निधी रोखवही 2014-15

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | एकूण रक्कम | अनुज्ञेय रक्कम | लेखा विभागांनी कपात केलेली रक्कम | वसूलपात्र शासकिय विमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2/08.07.2014 | 3941554 | 39416 | 39416 | 0 |
| 2 | 6/21.11.2014 | 2225149 | 22251 | 10114 | 12137 |
| 3 | 7/03.01.2015 | 11333285 | 113333 | 27682 | 85651 |
| 4 | 8/12.01.2015 | 3634313 | 36343 | 11062 | 25281 |
| 5 | 9/08.02.2015 | 13633992 | 136340 | 68711 | 67629 |
| 6 | 12/20.02.2015 | 19257573 | 192576 | 57722 | 134854 |
| 7 | 15/27.03.2015 | 3610570 | 36106 | 36106 | 0 |
| 8 | 16/31.03.2015 | 7124249 | 71242 | 24519 | 46723 |
| | | | 647607 | 275332 | 372275 |

वर नमूद केलेल्या तक्त्यातील शासकिय विम्यापोटीची रक्कम

लेखा विभागाने कपात केलेले रक्कम रु.275332

वसूल पात्र शासकिय विमा रक्कम रु.372275

एकूण रक्कम रु.647507 शासन निर्णयान्वये नमूद शासन लेखाशिर्षाखाली भरणा केली नाही.

2. प्रमाणक क्र.1134 दिनांक 31.03.2015 अन्वये माहे डिसेंबर 2014 व जानेवारी 2015 या कालावधीचे हाऊसकिपींग कामाचे रक्कम रु.938274 चे प्रदान झाले आहे. सदर रक्कमेपैकी रु.469137 माहे जानेवारी 2015 चे बिजक क्र.73 दिनांक 02.02.2015 वर ठेकेदाराची स्वाक्षरी नसतांना विभागाने देयकाचे प्रदान केले आहे याबाबत विभागाकडून लेखापरीक्षणास स्पष्टता झाली नाही.

3. मे.सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. या ठेकेदाराचे करारनाम्याची मुदत दिनांक 25.12.2014 रोजी संपली असताना माहे जानेवारी 2015 व फेब्रुवारी 20105 या कालावधीचे हाऊसकिपींग कामापोटी रक्कम (रु.469137 प्रती महाप्रमाणे ) रु.938274 चे ठेकेदारस सक्षम प्राधिका-यांच्या मंजूरीशिवाय केले आहे.याबाबत विभागाकडून लेखापरीक्षणास स्पष्टता झाली नाही.सबब सदर रक्कम लेखापरीक्षणास आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

## 31 *मोकळया जागेवरील कर वसुलीमधील तफावतीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 02

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

**गुंतलेली रक्कम** रु. 518370752.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 518370752.00/-

***सन 2014-2015 अखेर असलेली थकीत रक्कम रु.518370752 ही वसूल झाली नाही. महापालिकेच्या आर्थिक वर्ष 2014-2015 च्या अखेरची मोकळया जागेवरील कर निर्धारण नोंदवहीत शिल्लक व आरंभीची शिल्लकीतील तफावतीबाबतचा मेळ घेऊन लेखापरीखणास साधार स्पष्टता झाली नाही.***

सन 2014-2015 या महानगरपालिकेच्या भाईंदर मिरा वर्षातील वित्तीय या 15- हद्दीतीलमोकळयाजागेवरील कर आकारणीचे नोंदवही देयक तपासले असता खालील अनियमितता आढळून आल्या. अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.97 दि.16/11/2016 अन्वये विचारणा केली असता अनुपालन दि.23/12/2016 रोजी प्राप्त झाले असून दिलेला खुलासा व अनुपालन संयुक्तीक नाही, याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांचे कडील आदेश दि.22/12/2008 चे आदेशातील अ.क्र.07 नुसार मोकळया जागेवरील कराची वसूली परिणामकारक करण्याच्या दृष्टीने नगररचना विभागाने आवश्यक ती उपाययोजना करावयाची आहे.परंतु नगररचना विभागाच्या मोकळया जागेवरील कर मागणी पुढीलप्रमाणे मोठ्या प्रमाणात थकबाकी असल्याचे दिसून आले.

<u>नोंदवही सन 2014-2015</u>

| कराचे नांव | मागणी | | | वसूली | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागिल | चालु | एकूण | मागिल | चालु | एकूण | मागिल | चालु | एकूण |
| घर पट्टी | 327086821 | 130205667 | 457292488 | 87532890 | 25597251 | 113130141 | 239553931 | 104608416 | 344162347 |
| वृक्षकर | 11897474 | 4660555 | 16558029 | 3084190 | 906374 | 36990564 | 8813284 | 3754182 | 12567465 |
| मनपा शिक्षण | 13159856 | 4616651 | 17776507 | 3122464 | 906374 | 4028838 | 10037392 | 3710277 | 13747669 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मनपा अग्निशमन | 11887443 | 4605406 | 16492049 | 3084193 | 906374 | 3990566 | 8803250 | 3699033 | 12502282 |
| नोटिस फी | 1134636 | 0 | 1134636 | 122506 | 0 | 122506 | 1012130 | 0 | 1012130 |
| व्याज | 67809784 | 70641476 | 138451261 | 3175678 | 895420 | 4071098 | 646534106 | 69746056 | 134380163 |
| चेक रिटर्न | 200 | 100 | 300 | 100 | 0 | 100 | 100 | 100 | 200 |
| इतर | 0 | 0 | 0 | 917 | 588 | 1505 | -917 | -588 | -1505 |
| एकूण | 432976214 | 214729855 | 647706069 | 100122938 | 29212379 | 129335317 | 332853276 | 185517476 | 518370752 |

1) सन 2014-2015 अखेर असलेली थकीत रक्कम रु.518370752 ही वेळीच वसूल झाली नाही. त्यामुळे सदर प्रलंबित कर रक्कमेचा महानगरपालिकेच्या विकास कामासाठी वापर करता आला नाही.

2) महापालिकेच्या वरील 2014-2015 च्या मोकळया जागेवरील कर निर्धारण नोंदवहीत खालीलप्रमाणे तफावत आढळून आली.

| अ.क्र. | कराचे नांव | सन 2013-2014 ची अखेरची शिल्लक | सन 2014-2015 ची आरंभीची शिल्लक | तफावत |
|---|---|---|---|---|
| 1 | घरपट्टी | 291126855 | 327086821 | 35959966 |
| 2 | वृक्षकर | 10492015 | 11897474 | 1405459 |
| 3 | मनपा शिक्षण | 11786432 | 13159856 | 1373424 |
| 4 | मनपा अग्निशमन | 10492013 | 11887443 | 1395430 |
| 5 | नोटिस फी | 1250751 | 1134636 | 116115 |
| 6 | व्याज | 80274481 | 67809784 | 12464697 |
| 7 | चेकरिटर्न | 0 | 200 | 200 |
| 8 | इतर | 7088 | 0 | 7088 |

सदर तफावतीबाबतचा ताळमेळ विभागाकडे उपलब्ध् नाही.यावरुन विभागाचे मोकळया जागेवरील कर निर्धारण नोंदवहींतील नोंदी या अचूक नसल्याचे स्पष्ट होते.

32 *निष्काषीत कामाकरीता वापरलेल्या साधनसामुग्रीचे देयक वसुली प्रलंबित ठेवलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1365020.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1365020.00/-

***निष्काषीत कामाकरीता मनुष्यबळ व यंत्र सामुग्री वापरापोटीच्या वसुलीबाबतचे देयक संबधित संस्था/ व्यक्तींना पाठविण्यात आले नाही. त्यामुळे वसूलपात्र रक्कमेची वसूली मनपा लेख्यात जमा झाली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील प्रभाग क्रं. 3,4,5 व 6 कार्यालयाच्या अतिक्रमण विभागाची सन 2014-2015 चे लेखापरीक्षण करीत असताना निष्काषित नोंदवही तपासली असता निष्काषित कामाकरीता मनुष्यबळ व यंत्र सामुग्री वापरापोटीच्या वसुलीबाबतचे देयक संबधित संस्था / व्यक्तीना पाठविण्यात आले नाही अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.134 दि.21/12/2016 अन्वये विचारणा केली असता अनुपालन अप्राप्त आहे. सदरचा तपशिल खालीलप्रमाणे

सन 2014-15 मधील कार्यवाही

| अ. क्र. | प्रभाग क्र. | कार्यवाहीची दिनांक | कार्यवाहीसाठी वापरलेली अधिकारी / कर्मचारी संख्या (प्रती दिवस) | | दर | वसुल करावयाची रक्कम (दर X दिवस) | जे.सी.बी. वापरलेल्यांची संख्या | वसूल करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 03 | दि.23/05/13 ते 10/03/14 (13 दिवस) | अधिकारी | 13 | 1100 | 14300 | 13.25X1800 | 23850 |
| | | | कर्मचारी | 156 | 700 | 109200 | | |
| | | | पोलीस | -- | 700 | -- | | |
| 2 | 04 | दि.03/04/14 ते 14/01/15 (16 दिवस) | अधिकारी | 16 | 1100 | 17600 | 42.05X1800 | 75690 |
| | | | कर्मचारी | 75 | 700 | 52500 | | |
| | | | पोलीस | -- | 700 | -- | | |
| 3 | 05 | दि.06/05/14 ते 22/02/15 | अधिकारी | 15 | 1100 | 16500 | 24.40X1800 | 43920 |
| | | | कर्मचारी | 80 | 700 | 56000 | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (15 दिवस) | पोलीस | -- | 700 | -- | | |
| 4 | 06 | दि.01/04/14 ते 24/03/15<br>(66 दिवस) | अधिकारी<br>कर्मचारी<br>पोलीस | 66<br>902<br>-- | 1100<br>700<br>700 | 72600<br>631400<br>-- | 139.70X1800 | 251460 |
| | | एकूण | | | | 970100 | | 394920 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे केलेल्या निष्काशीत वापरण्यात आलेल्या मनुष्यबळ व यंत्र सामुग्री वापरापोटी सन 2014-15 साठी एकूण रक्कम रू.1365020 सत्वर संबंधिताकडून वसुल करावी व तोपर्यंत सदरची रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.970100 + 394920 = 1365020

DDDTKSM6801 (Ref No : 33, Hnun No : 134)

***33 निष्काषीत कामी पाठविण्यात आलेल्या बिलांच्या वसूलीची रक्कम प्राप्त न झाल्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 299300.00 /-
**वसूलपात्र रक्कम रु. 299300.00/-**

| |
|---|
| ***निष्काषीत कामाकरीता संस्थेकडून/ व्यक्तीकडून निष्काषित केलेल्या कामापोटी बिल नोटीस पाठविण्यात आले परंतु अद्याप सदर बिलाची रक्कम महानगरपालिकेच्या फंडात जमा झालेले नाही.*** |

सन 2014-15 मध्ये अतिक्रमण विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना निष्काषीत नोंदवही तपासली असता खालील नमुद संस्थेकडून / व्यक्तीकडून निष्काषित केलेल्या कामापोटी बिल नोटीस पाठविण्यात आले परंतु अद्याप सदर बिलाची रक्कम महानगरपालिकेच्या फंडात जमा

झालेले नाही. याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.137 दि.21/12/2016 अन्वये विचारणा केली असता अनुपालन अप्राप्त आहे.

<u>प्रभाग कार्यालय क्र.3</u>

1) सन 2014-15 मधील बिल नोटिस.

| अ.क्रं. | जावक क्रं. व दिनांक | कारवाईची तारीख | नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मनपा/प्रक्र3/3664/14-15 दि.16.03.15 | 10.03.15 | श्री.संतोष चौरसिया | 14500 |
| 2 | मनपा/प्रक्र3/3663/14-15 दि.16.03.15 | 12.03.15 | श्री. ओमप्रकाश यादव | 14300 |
| 3 | मनपा/प्रक्र3/3665/14-15 दि.16.03.15 | 10.03.16 | श्री. अजय श्रीवास्तव | 13800 |
| 4 | मनपा/प्रक्र3/3666/14-15 दि.16.03.15 | 10.03.16 | श्री.विनोदपाल दुलगर्ज | 13800 |
| 5 | मनपा/प्रक्र3/3454/14-15 दि.02.02.15 | 27.11.14 | मे.संदिप किरण इस्टेट | 13500 |
| 6 | मनपा/प्रक्र3/3662/14-15 दि.03.02.15 | 03.02.15 | श्री.कल्पेश जैन | 13500 |
| 7 | मनपा/प्रक्र3/429/14-15 दि.29.05.14 | 23.05.14 | श्री.सुंदर देवडिगा | 19800 |
| 8 | मनपा/प्रक्र3/2028/14-15 दि.26.11.14 | 26.11.14 | श्री.अब्दुल मंडळ | 10200 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | मनपा/प्रक्र3/2029/14-15 दि.26.11.14 | 20.11.14 | श्री.मनिष जोशी | 10200 |
| 10 | मनपा/प्रक्र3/2030/14-15 दि.26.11.14 | 20.11.14 | श्री.केश्सी. घोष | 10200 |
| 11 | मनपा/प्रक्र3/1970/14-15 दि.20.11.14 | 19.11.14 | श्री.ओम निधी को. ऑ. हौ.सो.लि. | 8200 |
| 12 | मनपा/प्रक्र3/1969/14-15 दि.20.11.14 | 05.07.14 | श्री.लक्ष्मण मंगल मौर्य | 8200 |
| एंकूण रु. | | | | 150200 |

वर तक्त्यात नमूद केलेल्या बिलाची रक्कम रु.150200 वसूल केल्याबाबतचे चलने लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाहीत.

प्रभाग कार्यालय क्र.4.

2) सन 2014-2015 मधील बिल नोटीस.

| अ.क्र. | जावक क्रं. व दिनांक | कारवाईची तारीख | नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मनपा/प्रक्र4/अवि/377/14-15 दि.17.06.14 | 17.06.14 | श्री.निहाल खान | 3500 |
| 2 | मनपा/प्रक्र4/अवि/379/14-15 दि.15.11.14 | 12.11.14 | श्री.रंगबहादूर यादव | 10400 |
| 3 | मनपा/प्रक्र4/अवि/380/14-15 दि.17.11.14 | 13.011.14 | श्री.बाबुभाई अग्रवाल | 8800 |
| 4 | मनपा/प्रक्र4/अवि/381/14-15 दि.17.11.14 | 13.11.14 | श्री.असर अंझर अली शेख | 8800 |
| 5 | मनपा/प्रक्र4/अवि/480/14-15 दि.30.12.14 | 20.11.14 | विष्णू अंनत पाटील | 44100 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | मनपा/प्रक्र4/अवि/554/14-15 दि.27.01.15 | 26.11.14 | श्री.राजेश सिंग | 8500 |
| 7 | मनपा/प्रक्र4/अवि/552/14-15 दि.27.01.15 | निरंक | श्री.चंपकलाल जैन | 5000 |
| 8 | मनपा/प्रक्र4/अवि/553/14-15 दि.27.01.15 | 27.11.14 | श्री.प्रविणभाई | 10000 |
| 9 | मनपा/प्रक्र4/अवि/551/14-15 दि.24.01.15 | 01.01.15 | मे.महावीर इंड.इस्टेट | 16500 |
| 10 | मनपा/प्रक्र4/अवि/555/14-15 दि.27.01.15 | 27.11.14 | श्री.मोहनलाल बटवाल | 13500 |
| 11 | मनपा/प्रक्र4/अवि/556/14-15 दि.27.01.15 | 27.11.14 | श्री.प्रकाश पाल | 10000 |
| 12 | मनपा/प्रक्र4/अवि/555/14-15 दि.27.01.15 | 27.11.14 | श्री.मोहनलाल बटवाल | 10000 |
| | | | एकूण रु. | 149100 |

वर तक्त्यात नमूद केलेल्या बिलाची रक्कम रु.149100 वसूल केल्याबाबतचे चलने लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाहीत.

एकूण वसूलपात्र रक्कम रु.150200+149100=299300

DDDTKSM6801 (Ref No : 36, Hmm No : 137)

## *34 मालमत्ता कराची कमी आकारणी केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 166703.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 166703.00/-

***कर निर्धारण व संकलक यांनी मालमत्ता कराची आकारणी अनुज्ञेय दराने न करणे, देय कालावधीपेक्षा कमी कालावधीसाठी आकारणी करणे, शिक्षण कराची कमी आकारणी व बिगर निवासीसाठी निवासी दराने आकारणी केल्यामुळे रक्कम रु 166703 वसुलपात्र ठरते.***

कर निर्धारण व संकलक या विभागांतर्गत विविध प्रभागांचे सन 2014-15 या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर आकारणी संदर्भात प्रकरणांची तपासणी केली असता त्यामध्ये देय आकारणीपेक्षा कमी आकारणी केल्याचे आढळून आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.90 दि.25/10/2016 निर्गमित करण्यांत आला असून विभागाकडून अनुपालन अप्राप्त आहे.

1) अ) मे.लिबर्टी डेव्हलपर्स, पेणकरपाडा मिरारोड मालमत्ता क्र.L0200425350100

मालमत्ता धारकांचा कर आकारणीबाबतचा दि.07/04/2014 चा अर्ज.

भोगवटा दाखला क्र.6247/1997-98 दि.17/10/1997

मालमत्ता कर आकारणी नोटीस क्र.422/2014-15 दि.12/06/2014

3724चौ.फुट क्षेत्रफळासाठी करयोग्य मुल्य रू.120658.

दि.01/04/2009 ते 31/03/2015 या कालावधीसाठी एकूण आकारणीची रक्कम रु.338807 अशी आहे.

प्रस्तुत इमारतीमध्ये पुढील दर्शविल्याप्रमाणे एकूण 05 दुकानांसाठी वार्षिक आकारणी करणे आवश्यक आहे.

| अक्र | दुकान क्रमांक | क्षेत्रफळ (चौ.मी.) | कर योग्य मुल्य रू. | घरपट्टी | वृक्षकर | शिक्षण कर | रोजगार हमी कर | मनपा शिक्षण कर | अग्निशमन कर | मलप्रवाह कर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 201 | 486 | 15746 | 4724 | 157 | 1890 | 472 | 315 | 157 | 1260 | 8975 |
| 2 | 202 | 486 | 15746 | 4724 | 157 | 1890 | 472 | 315 | 157 | 1260 | 8975 |
| 3 | 203 | 486 | 15746 | 4724 | 157 | 1890 | 472 | 315 | 157 | 1260 | 8975 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 204 | 486 | 15746 | 4724 | 157 | 1890 | 472 | 315 | 157 | 1260 | 8975 |
| 5 | 303 | 1786 | 57672 | 17302 | 577 | 6921 | 1730 | 1153 | 577 | 4614 | 32874 |
| 6 | 304 | 1786 | 57672 | 17302 | 577 | 6921 | 1730 | 1153 | 577 | 4614 | 32874 |
| 7 | 305 | 1786 | 57672 | 17302 | 577 | 6921 | 1730 | 1153 | 577 | 4614 | 32874 |
| | एकूण | 7302 | 236000 | 70802 | 2359 | 28323 | 7078 | 4719 | 2359 | 18882 | 134522 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे दि.01/04/2009 ते 31/03/2015 या 72 महिन्यांसाठी कर विभागाने केलेली आकारणी कमी दर्शविली आहे. याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | दुकान क्रमांक | केलेली आकारणी | | | अनुज्ञेय कर आकारणी | | | कमी आकारणी रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | घरपट्टी रूपये | मनपा शिक्षण कर रूपये | मलप्रवाह कर रूपये | घरपट्टी रूपये | मनपा शिक्षण कर रूपये | मलप्रवाह कर रूपये | |
| 1 | 201 | 21541 | 1575 | 5039 | 28344 | 1890 | 7560 | 9639 |
| 2 | 202 | 21541 | 1575 | 5039 | 28344 | 1890 | 7560 | 9639 |
| 3 | 203 | 21541 | 1575 | 5039 | 28344 | 1890 | 7560 | 9639 |
| 4 | 204 | 21541 | 1575 | 5039 | 28344 | 1890 | 7560 | 9639 |
| 5 | 303 | 78895 | 5767 | 18455 | 103812 | 6918 | 27684 | 35297 |
| 6 | 304 | 78895 | 5767 | 18455 | 103812 | 6918 | 27684 | 35297 |
| 7 | 305 | 78895 | 5767 | 18455 | 103812 | 6918 | 27684 | 35297 |
| | एकूण | 322849 | 23601 | 75521 | 424812 | 28314 | 113292 | 144447 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे घरपट्टी, मनपा शिक्षण कर व मलप्रवाह कर यापोटी कमी आकारणीची रक्कम रू.144447 वसुलपात्र ठरते.

ब) प्रस्तुत इमारतीचा भोगवटा दाखला दि.17/10/1997 रोजी निर्गमित करण्यात आला आहे. याबाबत कार्यालयीन टिप्पणीचे अवलोकन करता कर निरीक्षक यांनी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम

प्रकरण 11 नियम 150(क) नुसार कर निर्धारण करण्यात न आल्यामुळे सदर मालमत्तेचे सहा वर्षाच्या आत म्हणजेच दि.01/04/2009 पासून कर आकारणी शिफारस केली आहे. वास्तविक भोगवटा दि.17/10/1997 पासून असतांना कर निर्धारण दि.01/04/2009 पासून कसे, याबाबतची साधार स्पष्टता विभागाकडून झाली नाही त्यामुळे सदर मालमत्तेस दि.01/11/1997 पासून आकारणीची परिगणना करुन येणारी कराची थकबाकी वसूलात आणावी.

2) मे.सिध्दीविनायक डेव्हलपर्स, पुनम गार्डन, मिरारोड मालमत्ता क्र.F050037154000

भोगवटा दाखला क्र.4565/2009-10 दि.26/03/2010

मालमत्ता कर आकारणी नोटीस क्र.298 दि.02/08/2014

953.50चौ.फुट क्षेत्रफळासाठी करयोग्य मुल्य रू.30899

प्रस्तुत मालमत्तेसाठी कर विभागाने दि.01/04/2010 ते दि.31/03/2015 या कालावधीकरीता रक्कम रू.84083 ची आकारणी केलेली आहे. प्रत्यक्षात ती रक्कम रू.87480 करणे आवश्यक आहे. सबब कमी आकारणीची रक्कम रू.3397 वसुलपात्र ठरते. याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | कराचा तपशिल | आकारावयाचा कर | आकारणी केलेला कर | कमी आकारणीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1) | मालमत्ता कर | 46340 | 45722 | 618 |
| 2) | वृक्ष कर | 1545 | 1545 | -- |
| 3) | शिक्षण कर | 18084 | 18084 | -- |
| 4) | रोजगार हमी कर | 4521 | 4521 | -- |
| 5) | मनपा शिक्षण कर | 3090 | 2780 | 310 |
| 6) | मनपा अग्निशमन कर | 1545 | 1545 | --- |
| 7) | मलप्रवाह कर | 12355 | 9886 | 2469 |
| | | | एकूण | 3397 |

3) मे.इशा इंटरप्रायझेस, गणेश लिला, सी विंग, भाईंदर (पूर्व) मालमत्ता क्र.F040039391000

मिरा -भाईंदर महानगरपालिका

मालमत्ता धारकाचा कर आकारणीबाबतचा दि.29/04/2014 चा अर्ज

मालमत्ता कर आकारणी नोटीस क्र.06/08/94/2014-15 दि.02/05/2014

प्रस्तुत मालमत्तेचा वापर बिगर निवासी करण्यात आल्यामुळे पुढीलप्रमाणे सुधारीत आकारणी करण्यात आली आहे.

| अ.क्र. | दुकान क्रमांक | क्षेत्रफळ | करयोग्य मुल्य | पुर्वीची आकारणी | सुधारीत आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जी/04 | 398 | 12895 | 4126 | 7351 |
| 2 | जी/05 | 599 | 19408 | 6211 | 11062 |
| एकूण | | | | 10337 | 18413 |

कर विभागाने सुधारीत कर आकारणीच रक्कम रु. 18413 ची नोटीस बजावली आहे. (दि.01/04/2013 ते 31/04/2013) मात्र सन 2014-15 या आर्थिक वर्षासाठी जुन्या दराने देयक पुढीलप्रमाणे निर्गमित केले आहे.

| अ.क्र. | दुकान क्रमांक | क्षेत्रफळ | वापरचा प्रकार | बिल क्रमांक व दिनांक | बिलाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जी/04 | 398 | निवासी | 3710231<br>23/07/2014 | 4124 |
| 2 | जी/05 | 599 | निवासी | 3710233<br>23/07/2014 | 6208 |
| | | | | एकूण | 10332 |

सुधारीत दराने बिल निर्गमित न केल्यामुळे रक्कम रु.8081 संबंधिताकडून त्वरीत वसुल करून महानगरपालिका फंडात जमा करावी.

4) श्वेता रेसीडेन्सी, बिल्डींग क्र.01, रामदेव पार्क, मिरारोड (पूर्व) मालमत्ता क्र.F040042565000

मालमत्ता धारकाचा कर आकारणीबाबतचा दि.07/07/2014 चा अर्ज

भोगवटा दाखला क्र.1292/2013-14 दि.12/07/2013

मालमत्ता कर आकारणी नोटीस क्र.231/2014-15 दि.16/07/2014

39493 चौ.फुट क्षेत्रफळासाठी करयोग्य मुल्य रू.744749.

कर विभागाने दि.01/07/2013 ते 31/03/2015 या कालावधीसाठी वार्षिक करयोग्य मुल्य रू.744749 वर रक्कम रू.642403 ची आकारणी केली आहे. याबाबत नस्तीचे अवलोकन करता दुकानावर आकारण्यात आलेला शिक्षण कर हा कमी आकारण्यात आला आहे. याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | दुकान क्रमांक | क्षेत्रफळ | करयोग्य मुल्य | आकारवयाचा शिक्षण कर | आकारलेला शिक्षण कर | कमी आकारणीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ए/01 | 324 | 10498 | 1260 | 630 | 630 |
| 2 | ए/2 | 157 | 5087 | 508 | 305 | 203 |
| 3 | ए/3 | 139 | 4504 | 450 | 270 | 180 |
| 4 | ए/4 | 188 | 6091 | 730 | 365 | 365 |
| 5 | ए/5 | 178 | 5767 | 576 | 346 | 230 |
| 6 | ए/6 | 149 | 4828 | 482 | 290 | 192 |
| 7 | ए/7 | 178 | 5767 | 576 | 346 | 230 |
| 8 | बी/8 | 178 | 5767 | 576 | 346 | 230 |
| 9 | बी/9 | 149 | 4828 | 482 | 290 | 192 |
| 10 | बी/10 | 178 | 5767 | 576 | 346 | 230 |
| 11 | बी/11 | 188 | 6091 | 730 | 365 | 365 |
| 12 | बी/12 | 131 | 4244 | 424 | 255 | 169 |
| 13 | बी/13 | 145 | 4698 | 469 | 282 | 187 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | बी/14 | 171 | 5540 | 554 | 332 | 222 |
| 15 | बी/15 | 129 | 4180 | 418 | 251 | 167 |
| 16 | बी/16 | 118 | 3823 | 382 | 229 | 153 |
| 17 | बी/17 | 175 | 5670 | 567 | 340 | 227 |
| 18 | बी/18 | 175 | 5670 | 567 | 340 | 227 |
| 19 | बी/19 | 147 | 4763 | 476 | 286 | 190 |
| 2' | बी/20 | 175 | 5670 | 567 | 340 | 227 |
| 21 | सी/21 | 192 | 6221 | 746 | 373 | 373 |
| 22 | सी/22 | 192 | 6221 | 746 | 373 | 373 |
| 23 | सी/23 | 192 | 6221 | 746 | 373 | 373 |
| 24 | सी/24 | 173 | 5605 | 560 | 336 | 224 |
| एकूण रूपये | | | | | | 6159 |

कमी आकारणी रक्कम रू.6159 ही वार्षिक असून दि.01/07/2013 ते 31/03/2015 या 21 महिन्यासाठी कमी आकारलेली रक्कम रू.10778 वसुलपात्र ठरते.

वसुलपात्र रक्कम 1) रू.144447, 2) रू.3397, 3) 8081, 4) 10778 एकूण रक्कम रू.166703

DATPGDM5901 (Ref No : 47, Hmm No : 90)

*35 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभीयान (JNNURM) अंतर्गत मिरा भाईंदर शहराचे भुयारी गटार योजना प्रकल्पावरील खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष : भुयारी गटार योजना JNNURM निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1145281834.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1144916819.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 365015.00/-

| |
|---|
| ***सन 2013-14 मध्ये केंद्र/राज्य शासनाकडून प्राप्त अनुदान रक्कम रु.757550000 चा पुर्णपणे विनियोग केला नाही. सन 2014-15 मध्ये केंद्र/राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त नसताना सदर योजनेवर रक्कम रु.3152.50 लाख खर्च झाला आहे. सन 2014-15 मध्ये MMRDA कडुन प्राप्त कर्जापेक्षा जादा रक्कम रु.84.03 लाख कोणत्या निधीतून खर्च केली याबाबतची स्पष्टता झाली नाही.. लेखापरीक्षणास सन 2013-14 व 2014-15 मध्ये खर्च झालेल्या एकूण अनुदान रक्कम रु. 10344.07 लाखाबाबतचे विनियोग प्रमाणपत्र उपलब्ध् झाले नाही. धावते देयक क्र.35 (प्र.क्र.1/07/06/2013) ठेकेदारास सदर कामापोटी एकूण रक्कम रु.2993585225/-चे प्रदान करण्यात आले आहे. मात्र धावते देयक क्र.36 मध्ये मागील प्रदानाची रक्कम कमी दार्शविल्याने ठेकेदारास रक्कम रू.365015/- चे जादा प्रदान झाले आहे. याकामी वापरण्यात आलेल्या मोजमाप पुस्तकाबाबतची साठा नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.*** |

अ) कामाचे नांव : ज.ने.रा.ना.पु. अभियान अंतर्गत मिरा भाईंदर शहरासाठी भुयारी गटार योजना संकल्पात बांधणे व चालविणे (निगा, देखभाल व दुरूस्तीसह)

| | रक्कम | खर्च (लाखात) |
|---|---|---|
| सन 2013-14 आर्थिक वर्षासाठी तरतूद | रू.10775.50 | 7829.15 |
| सन 2014-15 आर्थिक वर्षासाठी तरतूद | रु.9800.00 | 5529.83 |

कामाचे प्राकलन : रू.331.46 कोटी

कामाचा अपेक्षीत खर्च रक्कम : रु.491.96 कोटी

प्रशासकीय मंजुरी : महासभा ठराव क्र.59, दि.18/12/2004

तांत्रिक मंजुरी : महाराष्ट्र जीवन प्राधीकरण दि.02/07/2007

निविदा : क्र.83/2008-09 दि.03/10/2008

ठेकेदार : मे.सुभाष प्रोजेक्ट ॲन्ड मार्केटींग लि.(SPML)

निविदा मंजुरी : किंमत 91.61% जादा दराने (सन2005-06 च्या म.जी.प्राच्या दरसुचीप्रमाणे)

निविदा मंजुरी : स्थायी समिती ठराव क्र.116 दि.17/02/2009

कार्यादेश : 915/2008-09 दि.27/02/2009 कामाची मुदत 30महिने (दि.26/08/2011 पर्यंत)

मुदतवाढ : मार्च 2014 पर्यंत

मुळ प्रकल्प : रू.331.46 कोटी, निविदा : रू.256.74 कोटी

प्रस्तुत कामाचा प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय सुकाणु समितीच्या मान्यतेने केंद्र शासनाच्या अंतिम मंजुरीसाठी नोडल एजन्सी MMRDA यांच्यामार्फत सादर करण्यात आला असून त्यास केंद्र शासनाच्या केंद्रीय मंजुरी समितीने (Central Committee) 331.46 कोटीला मंजुरी दिली आहे. याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे

आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (कोटी) |
|---|---|---|
| 1 | केंद्र हिस्सा 35% | 116.01 |
| 2 | राज्य हिस्सा 15% | 49.72 |
| एकण | | रु.165.73 |

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (कोटी) |
|---|---|---|
| मनपा हिस्सा 50% | | |
| 1 | कर्ज 90% | 149.16 |
| 2 | मनपा निधी 10% | 16.57 |
| एकण | | रु.165.73 |

मे. सुभाष प्रोजेक्ट ॲन्ड मार्केटींग लि. (SPML) यांची रक्कम रु.4919852509/- ची निविदा स्थायी समिती ठराव क्र.116 दि.27/02/2009 अन्वये मंजूर करण्यात आली आहे.

वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मधील वार्षिक जमा खर्चानुसार JNNURM योजनेवर झालेल्या जमा खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

| अ.क्र. | | 2013-2014 | | 2014-2015 | |
|---|---|---|---|---|---|
| | | जमा | खर्च | जमा | खर्च |
| 1 | केंद्र/राज्य अनुदान | 7575.50 | 7191.57 | - | 3152.50 |
| 2 | मनपा हिस्सा | - | 637.58 | - | 791.35 |
| 3 | MMRDA कर्ज | - | - | 1501.95 | 1585.98 |
| | | 7575.50 | 7829.15 | 1501.95 | 5529.83 |

प्रस्तुत कामासाठी लेखापरीक्षण काळात ठेकेदारास पुढीलप्रमाणे प्रदान करण्यात आले आहे.

| | 2013-14 | 2014-15 |
|---|---|---|
| धावते देयक | क्र.35 ते 42 | क्र.43 ते 47 |
| रक्कम | रु.739439230/- | रु.405842604/- |

सदर योजनेवर मार्च-2015 अखेर पर्यंत एकूण रक्कम रु.3991030490/- एवढा खर्च करण्यात आला आहे.याबाबात अर्धसमास ज्ञापन क्रमांक 40 दिनांक 20.08.2016 निर्गमित करण्यात आला असून त्यास विभागाने दिनांक 19.09.2016 रोजी अनुपालन सादर केले आहे.सदर अनुपालन विचारात घेऊन पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) सन 2013-14 मध्ये केंद्र/राज्य शासनाकडून प्राप्त अनुदान रक्कम रु.757550000 असताना पाणी पुरवठा

विभागाने त्यापैकी रक्कम रु. 719157000 खर्च केली आहे. उर्वरीत अखर्चित रक्कम रु 38393000 बाबतच्या विनियोगाबाबत लेखापरीक्षणास स्पष्टता झाली नाही.

2) सन 2014-15 मध्ये केंद्र/राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त नसताना सदर योजनेवर अनुदानापोटी रक्कम रु.3152.50 लाख खर्च कोणत्या निधीतून केला याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3) सन 2014-15 मध्ये MMRDA कडुन रक्कम रु.1501.95 लाख कर्ज प्राप्त झाले असताना प्रस्तुत योजनेवर रक्कम रु.1585.98 लाख खर्च करण्यात आली आहे. प्राप्त कर्जापेक्षा जादा रक्कम रु.84.03 लाख कोणत्या निधीतून खर्च केली याबाबतची स्पष्टता झाली नाही.

4) पाणीपुरवठा विभागाने सादर केलेले विनियोग प्रमाणपत्र 1246 दिनांक 31.08.2012 हे सन 2010-11 व 2011-12 या वर्षासाठी मंजूर झालेल्या रक्कम रु.10771.21 लाखाचे आहे. लेखापरीक्षणास सन 2013-14 व 2014-15 मध्ये खर्च झालेल्या एकूण अनुदान रक्कम रु. 10344.07 लाखाबाबतचे विनियोग प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

5) धावते देयक क्र.37 अन्वये ठेकेदारास एकूण रक्कम रू.121856783/- चे प्रदान करण्यात आले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 नियम 180(4) अन्वये मोजमापात पुस्तकातील नोंदीची तपासणी केल्याबद्दल प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी आवश्यक आहे. याबाबत मोजमाप पुस्तिका क्र.782 पुस्तकातील पृ.क्र.18 तपासता गोषवाऱ्यावर कनिष्ठ अभियंता, उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या कामाचा नोंदणी तपासणी व मंजुरी बाबतच्या स्वाक्षऱ्या नमुद नाहीत. तसेच ठेकेदाराची सदर कामाची मापे कबुल असल्याबाबतची स्वाक्षरी नमुद नाही. याबाबतची साधार स्पष्टता झाली नाही.

6) धावते देयक क्र.43 बाबत मोजमाप पुस्तक क्र.912 पृ.क्र.67 वरील गोषवाऱ्यावर केवळ उपअभियंता यांची स्वाक्षरी आहे. कनिष्ठ अभियंता, कार्यकारी अभियंता व ठेकेदाराची स्वाक्षरी नमुद नाही.

7) धावते देयक क्र.35 (प्र.क्र.1/07/06/2013) ठेकेदारास सदर कामापोटी एकूण रक्कम रू.2993585225/- चे प्रदान करण्यात आले आहे. मात्र धावते देयक क्र.36 मध्ये मागील प्रदानाची रक्कम रू.2993585225/- ऐवजी रक्कम रू.2993220210/- दर्शविल्यामुळे ठेकेदारास रक्कम रू.365015/- चे जादा प्रदान झाले आहे.

8) याकामी वापरण्यात आलेल्या मोजमाप पुस्तकाबाबतची साठा नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

9) पुढील मोजमाप पुस्तका अखेर मोजमाप पुस्तकातील पृष्ठांकनाबाबत शेरा, स्वाक्षरी नमुद नाही.

मोजमाप पुस्तक क्र.899,903,905,912,915,916 व 919 तसेच मोजमाप पुस्तकावरील, मोजमाप पुस्तकाचा क्रमांक मुद्रीत नसून तो हस्तलिखित आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 1144916819

वसुलपात्र रक्कम रु. 365015

*36 उदयान व वृक्ष प्राधिकारण विभागाकरीता ठेका पध्दतीने मजूर पुरवठा करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : मजुर पुरवठा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 2483010.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2483010.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 357022.00/-

*या कामासाठीचे प्राकलन,अंदाजपत्रक व निविदेतील खालील आवश्यक दस्तऐवज लेखापरीक्षणास अप्राप्त आहे. कर्मचाऱ्यांची परिपुर्ण हजेरी अहवाल, वेतन वितरण पुस्तिका, कर्मचाऱ्यांचे बँक पासबुक इ. तसेच किमान वेतन कायदयानुसार आवश्यक ती सर्व अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही. 2014-15 या वित्तीय वर्षासाठीचे रु.6522 मुद्रांक शुल्क वसुल होणे आवश्यक होते. निवड देयकांच्या तपासणीमध्ये सेवा कर रु.306900 व व्यवसाय करापोटी रु.43600 वसुलपात्र आहे.*

कामाचे नाव : उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने मजूर पुरवठा करणे (2014-15)
मंजुरी : स्थायी समिती प्रकरण 09 ठराव क्र.10, दि.25/07/2013 .
वृत्तपत्र : दै.नवभारत व दै.मिड डे दि.25/07/2013
निविदाकार : 1) मे.स्ट्रार कंन्स्ट्रक्शन 2) मे.जय श्रीकृष्ण 3) मे.सैनिक इंटेलिजन्स अॅड सेक्युरीटी प्रा.लि.
पुरवठादार : 1) मे.स्ट्रार कंन्स्ट्रक्शन
वार्षिक कार्यादेश : जा.क्र.मनपा/वृप्रा/63/2014-15, दि.31/05/2014
मुदत : दि.07/07/2012 ते 06/07/2013 (210 मजुरांसाठी)
वार्षिक मुदतवाढ : जा.क्र.मनपा/वृप्रा/148/2013-14, दि.04/07/2013

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | विभाग | मजूर संख्याxदर=रक्कम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1035, दि.16/03/2015 | मिरा रोड | 2935x423=1241505 | माहे फेब्रु-2015 |
| 1035, दि.16/03/2015 | भाईंदर | 2935x423=1241505 | माहे फेब्रु-2015 |

मिरा भाईंदर महापालिकेतील उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागांतर्गत उदयाने, स्मशाने,चौपाटया,मैदाने व डिव्हायडर येथे विविध कामासाठी कंत्राटी पध्दतीने मजुर पुरवठा करणेकामी मे.स्टार कंस्ट्रक्शन यांना कंत्राट देण्यात आले होते. लेखापरीक्षण वर्षातील निवडक प्रदान रक्कमेच्या लेखापरीक्षणाअंती पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1). या कामासाठीचे प्राकलन व अंदाजपत्रक लेखापरीक्षणास अप्राप्त आहे. प्रस्तुत निविदेत कुठेही आवश्यक मजुरांची संख्या नमुद नाही. अंदाजपत्रकीय रक्कम कोणत्या मुलभूत बाबींचा विचार करुन निश्चित करण्यात आली याची साधार स्पष्टता नाही. विभागास असणा-या आवश्यकतेनुसार मजुरांच्या संख्येचे निश्चितीकरण करुन खर्चाची गणनेनंतर निविदा रक्कम निश्चित करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली आढळून आली नाही.

2) करारनाम्यातील अट क्र.4 प्रस्तुत कंत्राटदारास प्रती दिन प्रती मजूर रु.290.5 प्रमाणे घाटाघाटीनंतरचे दर निश्चित करण्यात आलेले होते. लेखापरीक्षण कालावधीतील कामगार विभागाकडील अकुशल कामगारासाठीचे किमान वेतनाचे दर रु.293.15 इतके होते. करारनाम्यातील अटीनुसार किमान वेतनापोटी येणा-या फरकाची जबाबदारी कंत्राटदाराची असेल अशाप्रकारची अट करारनाम्यात नमूद करण्यात आलेली आहे. कंत्राटदारास प्रति मजूर प्रती दिन रु.2.65 फरकाची रक्कम अदा करणे असा होतो. तसेच कंत्राटदारास एकूण रक्कमेवर 2.25% रक्कम अदा करणे असा होतो. तसेच कंत्राटदारास देयकाच्या एकूण रक्कमेवर 2.25% आयकर वसुल केलेला आहे. एकूण पुरवठादराला फरक रु.2.65+आयकर, रु.6.53+सेवाकर, रु.36.31 असे एकूण रु.45.49 महापालिका प्रदाना व्यतिरिक्त प्रती मजुर कंत्राटदरास जास्त अदा करावे लागणार आहेत. सदर बाब संयुक्तिक वाटत नाही. सदर बाबींची सत्यता पडताळण्यास आवश्यक अभिलेख उदा. कर्मचाऱ्यांची परिपुर्ण हजेरी अहवाल, वेतन वितरण पुस्तिका, कर्मचाऱ्यांचे बँक पासबुक इ. लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

3) निविदा अट क्र.26 निविदाकारांनी कंत्राटी कामागार किमान वेतन कायदयानुसार आवश्यक ती सर्व अभिलेखे (हजेरी नोंदी, वेतन वाटप नोंदी, दैनंदिन कामाच्या नोंदी, आवश्यक नोंद रजिस्टर) ठेवणे व सदरची नोंद रजिस्टर संबंधित अधिकारी यांच्याकडून तपासून येणे बंधनकारक आहे. तसेच करारनाम्यातील अट क्र.5 कॉन्ट्रक्टर लेबर ॲट 1970 व 71 अन्वये मजुरांचा गट विमा, प्रोव्हिडंड फंड, मेडीक्लेम बोनस इत्यादी भत्ते कामगारांना देणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक महिन्यात कंत्राटी कामगारांचे पी.एफ.ची रक्कम कामगारांच्या वैयक्तिक खात्यावर जमा करणे शासकीय नियमानुसार कंत्राटदारास बंधनकारक असून मागिल महिन्याच्या इष्टांकात नमूद केलेल्या सर्व कामगारांची मागील महिन्याची पी.एफ.भरल्याची प्रत देयकासोबत जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा कंत्राटदारास देयक अदा केले जाणार नाही अशा स्पष्ट नोंदी असताना देयकासोबत ही पत्रे आढळून न येताच प्रदान करण्यात आले आहे. सबब सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) या कामासाठी 2014-15 या वित्तीय वर्षासाठी कार्यादेशानुसार 76650 मजुरांसाठी कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार मजूर संख्या 76650Xमंजूर दर रु.423=रु.32422950 या रकमेसाठी आवश्यक करारनामा रु.31522 च्या मुद्रांक शुल्कावर आवश्यक असताना करारनामा रु.25000 च्या मुद्रांक शुल्कावर केल्यामुळे मुद्रांक शुल्क फरकाची रक्कम रु.31522-25000=रु.6522 वसुल होणे आवश्यक आहे.

5) देयकात प्रदान करण्यात आलेल्या रकमेच्या अनुषंगाने किती मजूर किती ठिकाणी कोणते काम करीत होते याबाबतचा उल्लेख देयकात नाही व कोणत्या ठिकाणी आवश्यकता आहे, या उल्लेख असणारे सहपत्रे लेखापरीक्षणास अप्राप्त आहेत.

6) निविदेतील खालील आवश्यक दस्तऐवज लेखापरीक्षणास अप्राप्त आहेत. कंत्राटदारांचे नोंदणी प्रमाणपत्र,

बॅंक गॅरंटी, कंत्राटी कामगार नोंदणी क्रमांक, अदयावत नुतनीकरण प्रमाणपत्र, मागील 3 वर्षाचा टर्नओव्हर, अनुभव दाखला, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये नोंदणी प्रमाणपत्र,सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र.

7) निवड देयकांच्या तपासणी अंती खालीलप्रमाणे वसुली करण्यात आल्याचे आढळून आली नाही.

| देयक क्रमांक व दिनांक | रक्कम रु. | आवश्यक वसुली | तपशिल |
|---|---|---|---|
| 1035, दि.13.03.2015 भाईंदर विभाग | 1241505 | 153450 | 12.36% प्रमाणे सेवा कर |
| | | 21800 | 109 मजुरांचे रु.200प्रमाणे व्यवसाय कर कपात करण्यात आलेला नाही. (हजेरी पत्रक अप्राप्त असल्यामुळे रु.200 प्रमाणे गणना) |
| 1035, दि.13.03.2015 मिरा रोड विभाग | 1241505 | 153450 | 12.36% प्रमाणे सेवा कर |
| | | 21800 | 109 मजुरांचे रु.200प्रमाणे व्यवसाय कर कपात करण्यात आलेला नाही. (हजेरी पत्रक अप्राप्त असल्यामुळे रु.200 प्रमाणे गणना) |

8) किमान वेतनानुसार प्रदान उपरोक्त देयकाच्या फरकाची रक्कम वितरीत झाल्याचे दस्तऐवज लेखापरीक्षणास सादर झाले नाहीत.

एकूण वसुलपात्र रक्कम

1. मुद्रांक शुल्क रु.6522
2. सेवा कर रु.306900
3. व्यवसाय कर रु.43600

एकूण वसुलपात्र रु.357022

एकूण देयकांची आक्षेपाधिन रक्कम रु.2483010

वरील अभिप्रायाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.81 दि.19.10.2016 नुसार विभागास कळविण्यात आले होते. परंतू अनुपालन प्राप्त नाही.

DVESMBM7301 (Ref No : 58, Unan No : 81)

*37 उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता लालमाती, शेणखत व सफेद रेतीचा पुरवठा करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

अनियमितता संख्या : 05

*लेखा शीर्ष : माती व शेणखत मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6552.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 6552.00/-

***या कामासाठीचे प्राकलन,अंदाजपत्रक तसेच उद्यान विभागाने ज्या ठिकाणी महानगरपालिका निधी खर्च केला आहे, अश्या सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या / उद्यानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज लेखा परीक्षणास अप्राप्त आहे. लालमाती, शेणखत व सफेद रेती पुरवठा वाहनांचे लॉगबुक लेखा परीक्षण सादर करण्यात आलेले नाही. मोजमाप पुस्तिकेत विस्तृत आवश्यक त्या नोंदी नसल्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त परिणामाचे लेखा परीक्षण करता आले नाही. MH 04 DS 4575 या गाडीच्या चुकीच्या मोजमापामुळे जादा प्रदान झालेले रु.6552 वसुलपात्र आहेत.***

1) कामाचे नाव : उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता लालमाती, शेणखत व सफेद रेतीचा पुरवठा करणे (सन2014-15)

मंजुरी : मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.137 दि.28/01/2015

निविदाकार : (प्रती ब्रास रक्कम) (वाटाघाटीनंतरचे दर)

| नाव | लालमाती | शेणखत | सफेद रेती |
|---|---|---|---|
| मे.आर.एस. कंस्ट्रक्शन | 2100 (2223) | 2223 | 4200 (4500) |
| मे.भुषण ट्रान्सपोर्ट | 2790 | 1900 (2080) | 9875 |

कार्यादेश : 1) जा.क्र.मनपा/वृ.प्रा./567/2014-15 दि.02/02/2015

2) जा.क्र.मनपा/वृ.प्रा./568/2014-15 दि.02/02/2015

मिरा भाईंदर महानगरपालिकेत 2014-15 या वर्षात उद्याने, स्मशाने, चौपाटया, मैदाने, डिवायडर येथील शोभिवंत फुलझाडांना व इतर झाडांना लालमाती, शेणखत व सफेद रेती पुरविण्यासाठी प्रदान करण्यात आलेले देयकाचे लेखा परीक्षण केले असता सदर प्रदानाच्या नस्तीचे व देयकाच्या लेखा परीक्षण अंती खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) या कामासाठीचे प्राकलन व अंदाजपत्रक लेखा परीक्षणास अप्राप्त आहे. प्रस्तुत निविदेमध्ये कुठेही आवश्यक बाबीचे परिमाण नमुद नस्ताना अंदाजपत्रक रक्कम कोणत्या आधारे निश्चित करण्यात आले, याची साधार स्पष्टता झाली नाही.. विभागास असणाऱ्या आवश्यकतेनुसार सदर आवश्यक परिमाण निश्चित करून त्यानुसार खर्चाची गणना करून निविदा रक्कम निश्चिती करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली

आढळून आले नाही.

2) अंतीम करण्यात आलेल्या तुलनात्मक तक्ता विनास्वाक्षरीत आहे. त्यामुळे या तक्त्यातील दरांच्या वैधतेचे लेखा परीक्षण करता आलेले नाही.

3) प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेच्या कार्यादेशात लालमाती, सफेद रेती व शेणखत पुरविण्याबाबत कार्यादेशात जसा मजकुर आहे तसाच मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेला आहे. सफेद रेती व लालमाती प्राप्त झाल्यानंतर जमिनीवर अंथरल्यानंतरचे तीचे व्याप्त क्षेत्रफळ नोंदविण्यात आलेले नाही. तसेच लालमाती, शेणखत व सफेद रेती पुरवठा वाहनांचे लॉगबुक लेखा परीक्षण सादर करण्यात आलेले नाही. केवळ कार्यादेशातील ज्या संख्या दर्शविण्यात आलेला आहे. विस्तृत आवश्यक त्या नोंदी नसल्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त परिणामाचे लेखा परीक्षण करता आले नाही.

4) MH 04 DS 4575 या गाडीचे घ. जमाप 3.61 चौ.मी. असे कार्यकारी अभियंता (सा.बां.) मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी प्रमाणित केलेले आहे. परंतु प्रमाणक क्र.16 दि.31/03/2015 रक्कम रु.543396 (ठिकाण- नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे लालमाती पुरवठा करणे) यामध्ये सदर क्रमांकाच्या गाडीने 4.00 ब्रास अशा एकूण 8 फेऱ्यांचे 3.12 ब्रास जादा म्हणजे 3.12 ब्रास X 2100 प्रती ब्रास प्रमाणे रु.6552 वसुलपात्र आहे.

5) विभागाने ज्या उद्यान बांधकामे इ. ठिकाणी महानगरपालिका निधी खर्च केला आहे, अश्या सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या / उद्यानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज जसे 7/12 / 8 अ वा इतर अनुषंगीक दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध केले नाही. त्यामुळे मनपा निधीचा झालेला खर्च हा स्वतःच्या मालमत्तावर झाल्याची लेखा परीक्षणाची खात्री घेता आली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम रु.6552.

वरील अभिप्रायाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.84 दि.19.10.2016 नुसार विभागास कळविण्यात आले होते. परंतू अनुपालन प्राप्त नाही.

DVESMBM7301 (Ref No : 59, Hmm No : 84)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

------------------- निरंक -------------------

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## 38 जंतुनाशके, किटकनाशके व इतर साहित्य खरेदीतील अनियमितताबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 518700.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3500.00/-

***करारनाम्यातील अट क्र.९ नुसार विहित मुदतीत पुरवठा न झाल्यास प्रतिदिन रु.५००/- प्रमाणे ७ दिवस विलंबाने पुरवठा केल्याबाबत दंड रक्कम रु.३५००/- वसुली केली नाही***

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य (घनकचरा) विभागाचे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात जंतुनाशके, किटकनाशके व इतर साहित्य खरेदीची प्रमाणके तपासता आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.६८ दिनांक २७/०९/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने सादर केलेले खुलासा/अनुपालन तपासून लेखा परीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) प्रमाणक क्र. ११३८ दिनांक ३१.०३.२०१५ अन्वये रक्कम रु.५१८७००- मे.जिनाओ बायोटेक यांचेकडून जंतुनाशके व इतर साफसफाई साहित्य एकूण ९ बाबी खरेदी केल्या आहेत. सदरचे साहित्य पुरवठा आदेश क्र.मनपा/आरोग्य/२०६/२०१४-१५ दिनांक २२/०१/२०१५ अन्वये ५ दिवसात पुरवठा करणेचे होते. करारनाम्यातील अट क्र.९ नुसार विहित मुदतीत पुरवठा न झाल्यास प्रतिदिन रु.५००/- दंड आकारणेचे आहे. प्रस्तुत प्रकरणी साहित्य चलन क्र.३१ दिनांक २२/०२/२०१५ व चलन क्र.३२ दिनांक ०३/०२/२०१५ रोजी पुरवठा केले आहे परंतु ७ दिवस विलंबाने पुरवठा केल्याबाबत दंड रक्कम रु.३५००/- वसुली केली नाही.

DGPVTTM7601 (Ref No : 3, Hmm No : 68)

## 39 घनकचरा प्रकल्पासाठी पुरवठा केलेल्या मातीच्या फोटोबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1543552.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1543552.00/-

| |
|---|
| *करारनाम्यातील अट क्र.२४ नुसार मातीने भरलेले ट्रक खाली करतेवेळी छायाचित्र फोटो काढून मुख्यालयात सादर करणे बंधनकारक असताना असे फोटो छायाचित्रे काढलेले लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.* |

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उत्तन पाली येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी दैनंदिन टाकण्यात येणाऱ्या कचरामुळे दुर्गंधी निर्माण होऊ नये यासाठी कचऱ्यावर माती पसरविणे यासाठी खालीलप्रमाणे माती पुरवठा करणेवर वर्ष २०१४-१५ मध्ये खर्च केला आहे.

प्रमाणक क्र.११३८ दिनांक ३१/०३/२०१५ रु.९९८९५२ मे.गणेश अर्थमुव्हिंग कं. १२८४ ब्रास माती दर रु.७७८ प्रती ब्रास दिनांक ०१/०१/२०१५ ते २८/०२/२०१५ प्रमाणक क्र.११३८ दिनांक ३१/०३/२०१५ रु.५४४६०० मे.गणेश अर्थमुव्हिंग कं. ७०० ब्रास माती दर रु.७७८ प्रती ब्रास दिनांक ०१/०३/२०१५ ते २२/०३/२०१५

उपरोक्त प्रमाणकाद्वारे केलेल्या खर्चाबाबत आढळून आलेल्या अनियमिततावाबत अर्धसमास पत्र क्र.६९ दिनांक २७/०९/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने सादर केलेले खुलासा/अनुपालन तपासून लेखा परीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) करारनाम्यातील अट क्र.२४ नुसार मातीने भरलेले ट्रक खाली करतेवेळी छायाचित्र फोटो काढून मुख्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. तथापि असे फोटो छायाचित्रे काढलेले लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे करारनाम्यातील वरील अटीचे पालन प्रदानापुर्वी झाले नसल्याचे दिसून आले.

DGPVTM7001 (Ref No : 4, Hmn No : 69)

## *40 कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात रजा, वेतनवाढी नोंदी स्वाक्षरी करुन प्रमाणित केल्या नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनि यमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : आस्थापना मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| *राजकुमार घरत, सिस्टीम अनालिस्ट, श्रीमती सई हेमंत वडके, विधी अधिकारी व श्रीमती मनस्वी मंगेश म्हात्रे, संगणक प्रोग्रामर यांच्या सेवापुस्तकातील वेतनवाढी व रजा नोंदी सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी करुन मंजूर केलेल्या नाहीत.* |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वर्ष 2014-15 या वर्षाच्या लेखा परीक्षणात महापालिकेच्या अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके तपासता कर्मचाऱ्यांच्या, वेतन निश्चिती, सहावा वेतन आयोग वेतन निश्चिती, वेतनवाढ मंजुरी, रजा नोंदी इत्यादी महत्वाच्या नोंदी सेवापुस्तकात संबंधित आस्थापना/प्रशासन अधिकारी यांनी स्वाक्षरी करून प्रमाणित केलेल्या नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१५१ दिनांक २९/१२/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. अशा अनियमितता उदाहरणदाखल खालीलप्रमाणे आहेत

अ) **राजकुमार घरत, सिस्टीम अनालिस्ट**:- सेवापुस्तकात सहावा वेतन आयोग निश्चितीबाबत संबंधित सक्षम आस्थापना अधिकारी/सहाय्यक आयुक्त यांनी स्वाक्षरी करून वेतन निश्चिती नोंद बरोबर असल्याचे प्रमाणित केलेले नाही. सेवापुस्तकात दिनांक ०१/०७/२००९, ०१/०७/२०१०, ०१/०७/२०११, ०१/०७/२०१२, ०१/०७/२०१३, ०१/०७/२०१४, ०१/०७/२०१६ च्या वेतनवाढी मंजुरीबाबत सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. सेवाण्स्तकात खालील दिनांकाच्या रजा नोंदी मंजुरीबाबत सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

दिनांक ०४/११/२००८ ते ०७/११/२००८ – ०४ दिवस

दिनांक १५/१२/२००८ ते १९/१२/२००८ – ०५ दिवस

दिनांक ०२/०५/२००९ ते ०५/०५/२००९ – ०४ दिवस

दिनांक २२/०५/२००९ ते २५/०५/२००९ – ०५ दिवस

दिनांक ३१/०८/२००९ ते ११/०९/२००९ – १२ दिवस

दिनांक २९/०९/२००९ – ०१ दिवस

दिनांक २०/११/२००९ – ०१ दिवस

दिनांक ३१/११/२००९ ०४/१२/२००९ – ०५ दिवस

दिनांक ०७/०५/२०१२ ते ०८/०५/२०१२ – ०२ दिवस

दिनांक २१/०६/२०१२ ते २२/०६/२०१२ – ०२ दिवस

दिनांक २०/०९/२०१२ ते २१/०९/२०१२ – ०२ दिवस

दिनांक २२/०४/२०१३ ते २६/०४/२०१३ – ०५ दिवस

दिनांक २९/०४/२०१४ ते ०३/०५/२०१४ – ०५ दिवस

दिनांक १९/०५/२०१४ ते २०/०५/२०१४ – ०२ दिवस

दिनांक ०२/०६/२०१४ ते ०६/०६/२०१४ – ०५ दिवस

दिनांक ०५/०५/२०१५ ते ०८/०५/२०१५ – ०४ दिवस .

उपरोक्त वेतनवाढ मंजुरी व रजा मंजुरीबाबतचे आदेश लेखा परीक्षणास उपलब्ध करावेत.

ब) **श्रीमती सई हेमंत वडके, विधी अधिकारी**:- दिनांक २० ते २८/०८/२००९- ०९ दिवस वैद्यकीय रजा मंजुरीबाबत स्वाक्षरी नाही. दिनांक २६/०४/२०१० ते २२/१०/२०१० या १८० दिवस कालावधीत प्रसूती रजा (दुसरे अपत्य) या रजेवर असताना त्यांच्या रजा लेख्यात अनुपस्थिती कालावधीची पूर्ण अर्जित रजा जमेस दर्शविली आहे. दिनांक १३ ते १६/०४/२०१२- ४ दिवस व दिनांक १० ते १२/०९/२०१३- ३ दिवस या अर्जित रजा रजालेख्यात

खर्ची दर्शविलेल्या नाहीत. तसेच दिनांक १/०६/२००८, ०१/०७/२०११ व ०१/०७/२०१२ या दिनांकाच्या वेतनवाढी सेवापुस्तकात मंजुरीबाबत सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदरच्या वेतनवाढी मंजुरी नसताना वेतन देयकात वेतन कसे काय प्रदान केले आहे याबाबत खुलासा झाला नाहा. श्रीमती वडके यांचे सेवापुस्तकात दिनांक ०१/०७/२०१४ रोजी वेतन रु.१५,०२०/- असताना वेतन देयकात वेतन १५,०००/- दर्शविले आहे तफावतीबाबत खुलासा झाला नाही. उपरोक्त वेतनवाढ मंजुरी व रजा मंजुरीबाबतचे आदेश लेखा परीक्षणास उपलब्ध केले नाहींत.

क) **श्रीमती मनस्वी मंगेश म्हात्रे, संगणक प्रोग्रामर:-** सेवापुस्तकात सहावा वेतन आयोग निश्चितीबाबत संबंधित सक्षम आस्थापना अधिकारी/सहाय्यक आयुक्त यांनी स्वाक्षरी करून वेतन निश्चिती नोंद बरोबर असल्याचे प्रमाणित केलेले नाही. सेवापुस्तकात दिनांक ०१/०७/२०१६ वेतनवाढ मंजुरीबाबत सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. सेवापुस्तकात खालील दिनांकाच्या रजा नोंदी मंजुरीबाबत सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

दिनांक ३०/०३/२००९ ते ०२/०४/२००९ – ४ दिवस
दिनांक १५/०४/२००९ ते २३/०४/२००९ – ०९ दिवस
दिनांक २७/०४/२००९ ते २९/०४/२००९ – ०३ दिवस
दिनांक ०१/०६/२००९ ते ०५/०६/२००९ – ०५ दिवस
दिनांक ०३/१२/२००९ – ०१ दिवस
दिनांक २१/१२/२०१० ते ३१/१२/२०१० – ११ दिवस
दिनांक ३१/०५/२०११ ०४/०६/२०११ – ०५ दिवस
दिनांक १७/१२/२०११ – ०१ दिवस
दिनांक २८/१२/२०१२ ते ०५/०१/२०१२ – ०९ दिवस
दिनांक २१/०३/२०१३ ते २२/०३/२०१३ – ०२ दिवस

उपरोक्त वेतनवाढ मंजुरी व रजा मंजुरीबाबतचे आदेश लेखा परीक्षणास उपलब्ध करावेत.

ड) बहुतांशी कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात आस्थापना विषयक नोंदी वेतन निश्चिती, रजा, पदोन्नती, निलंबन, इत्यादी परिपूर्ण, अद्यावत केल्या नसल्याचे आर आर कन्सल्टन्सी यांनी महानगरपालिकेस सादर केलेल्या त्यांचे अहवालात सविस्तरपणे नमूद केलेले असून मागील दोन वर्षात याबाबत काहीही पूर्तता केलेली नसल्याचे आढळून आले आहे तरी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात नोंदी अद्यावत, परीपूर्ण करून जादा प्रदान झालेल्या कर्मचाऱ्यांच्याकडून अतिप्रदान रक्कम वसुली करावी व कमी प्रदान झालेल्या कर्मचाऱ्यांना फरक रक्कम प्रदान करून तसे अनुपालन लेखा परीक्षणास करावे.

## 41 सरळ सेवा भरती व पदोन्नती प्रकरणात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 05

*लेखा शीर्ष : आस्थापना मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***अनुकंपा तत्वावर नियुक्ती देतेवेळी शासन निर्णय क्र.अकंपा-1004/प्र.क्र.51/2004/08, दि.22/08/2005 नुसार मुद्दा क्र.1 इ नुसार गट "क" व गट "ड" करीता स्वबतंत्र प्रतीक्षा सुची ठेवलेली नाही. सरळसेवेने निवड झालेल्याह कर्मचा-यांच्या बाबतीत अदयाप सदर शासन निर्णया क्र.बीसीसी-2011/पत्र क्र.1064/2011/16 व दि.12/12/2011 नुसार विहित केलेल्या मुदतीत निवड झालेल्या उमेदवारांकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले नाहीत. शासन परिपत्रक क्र.बीसीसी2012/प्र.क्र.332/12/16 व दि.18/05/2013 नुसार मिरा भाईंर महानगरपालिकेत पदोन्नत झालेल्या कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी झाली नसल्याकचे निदर्शनास आले आहे.***

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागाकडील सरळ सेवा भरती व पदोन्नती प्रकरणाची सन 2013-14 व 2014-15 या आर्थिक वर्षात तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटीबाबत अर्धासमास पत्र क्र. 139 दि.22/12/2016 अन्वये कळविले होते परंतु विभागाने सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन सादर केले नाही त्यामुळे यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) शासन परिपत्रक क्र.बीसीसी2012/प्र.क्र.332/12/16ब दि.18/05/2013 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी जात प्रमाणपत्राची वैधता संबधित जात पडताळणी समितीकडून तपासून घ्यावी, असे नमूद केलेले आहे. तथापि आपल्या विभागातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षणा दरम्यान नमुद तक्त्यातील संवर्ग निहाय कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव नमुद निर्णयाचे पालन झालेले नाही, असे स्पष्ट होते.

| अ.क्रं. | संवर्ग | मंजुर पदे | कार्यरत पदे | जात पडताळणी न झालेले |
|---|---|---|---|---|
| 1 | कनिषठ अभियंता | 24 | 19 | 02 |
| 2 | लिपीक | 199 | 172 | 05 |
| 3 | अधिपरिचारिका | 72 | 31 | 04 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | प्रसविका | 48 | 48 | 04 |
| 5 | वाहन चालक | 48 | 42 | 01 |
| 6 | शिपाई | 154 | 125 | 48 |
| 7 | प्लंबर | 05 | 02 | 01 |

2) शासन निर्णय क्र.बीसीसी-1097/प्र.क्र.63/97/16ब दि.16/10/1997 बिंदु नामावली अदयायावत व परिपुर्ण नाहीत. तसेच दर 03 वर्षांनी नोंदवहया अदयायावत करणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) शासन निर्णय क्र.बीसीसी-2011/पत्र क्र.1064/2011/16ब दि.12/12/2011 नुसार नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील, असे नमुद केलेले आहे.

सरळसेवेने भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय (टेंबा हॉस्पीटल) तसेच वैदयकीय आरोग्य विभागामध्ये कार्यरत स्थायी अधिकारी / कर्मचारी यांची सन 2014-15 भरती केली आहे. या भरती प्रक्रियेतुन सरळसेवेने निवड झालेल्या खालील कर्मचा-यांच्या बाबतीत अदयाप सदर शासन निर्णयानुसार जात पडताळणी विषयक कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | संवर्ग | सेवेतील मुळ कायम नेमणुक दिनांक | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती निता सानम | प्रसविका (ANM) | वर्ग3- | दि2015/07/22. | भज(ड) |
| 2 | श्री.रामकृष्ण बी.वन | अधिपरिचारिका | वर्ग-3 | दि.07/12/2015 | भज(ब) |
| 3 | श्रीमती मिराताई डी.नागरगोजे | अधिपरिचारिका | वर्ग-3 | दि.07/12/2015 | भज(ड) |

4) मिरा भाईंदर महानगरपालिकेमधील सन 2014-15 मधील अनुकंपा तत्तावर खालील 03 कर्मचा-यांची भरती केलेली आहे.

I) श्री.प्रकाश नामदेव पिसे

II) श्री.महेबुब रियाझा बावु खाजीया

III) श्रीमती मनिषा सोमा आवटे

सदर नियुक्तीच्या अनुषंगाने खालील अभिप्राय आहे.

अ) अनुकंपा तत्तवार नियुक्ती देतेवेळी शासन निर्णय क्र.अकंपा-1004/प्र.क्र.51/2004/08, दि.22/08/2005 नुसार मुद्दा क्र.1इ नुसार जिल्हाधिका-याकडून यादया प्राप्त झाल्यावर गट "क" व गट "ड" नवीन पदावरील अनुकंपा नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी ( कार्यालय किंवा विभागप्रमुख) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट "क" व गट "ड" च्या रिक्त पदावर पदासाठी विहीत अटी व शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांना यादीतील क्रमानुसारच नियुक्त करु शकतील, असे नमुद केलेले आहे.

ब) सदर शासन निर्णयाप्रमाणे गट "क" व गट "ड" करीता स्वतंत्र प्रतीक्षा सुची ठेवलेली नाही.

क) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 मधील कलम 54 नुसार कर्मचा-यांची नियुक्ती ही निवड समितीद्वारे होणे अपेक्षित होते. परंतु अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या संदर्भात नियुक्ती प्राधिकारी /आसथापना अधिकारी यांच्याकडून शासनाच्या अधिनियमातील वर नमुद तरतुदीचे पालन झाले नाही.

ड) श्री. प्रकाश नामदेव पिसे यांची अनुकंपावरील नियुक्ती करतेवेळी मुख्यलेखापरीक्षक यांनी संदर्भीय प्रकरणा संदर्भात शासनाकडून अभिप्राय मागविण्याचे नमुद केलेले होते. परंतु अभिप्राय न मागविता अनुकंपावर भरती करण्यात आलेली आहे.

5) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैदयकीय सेवा व इतर तांत्रिक संवर्गातील रिक्त जागा तसेच ठोक मानधनावरील भरती करण्यासाठी थेट मुलाखती घेण्यात आल्या. ही पदे भरतेवेळी इयत्ता 12 गुणांना 70% ते 80% गुणांकन प्राप्त विचारात घेण्यात आली व ज्या पदासाठी निवड करावयाची आहे. त्या पदाच्या पदवी व पदवीकेसाठी मिळालेल्या गुणांच्या 10% गुणांकन निवड प्रक्रियेसाठी गृहीत धरले गेले.

उदा.संवर्ग – औषध निर्माता

| अक्र. | नाव | बारावी विज्ञान परीक्षा | डी फार्म परीक्षा | पदवी | अनुभवाचे 10% पैकी गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

| | | टक्केवारी | प्राप्त गुणानुसार 70% पैकी | टक्केवारी | प्राप्त गुणानुसार 10% पैकी | टक्केवारी | प्राप्त गुणानुसार 10% पैकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.प्रवीण आदे | 83 | 58.68 | 75.60 | 7.56 | 61.29 | 6.13 | 05 | 77.37 |
| 2 | श्री.कादीर अब्दुल | 72.33 | 50.63 | 86.70 | 8.67 | 67.25 | 6.73 | 06 | 72.03 |

उदा.संवर्ग – अधिपरिचारिका

| अ.क्र | नाव | बारावी विज्ञान परीक्षा | | जी.एन.एम.पदवी | | अनुभवाचे 10% पैकी गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | टक्केवारी | प्राप्त गुणानुसार 70% पैकी | टक्केवारी | प्राप्त गुणानुसार 10% पैकी | | |
| 1 | श्रीमती कल्पना जाधव | 84.50 | 80.33 | 73.83 | 7.38 | 05 | 79.98 |
| 2 | श्री. अन्वर हुसेन शेख | 80.33 | 64.27 | 77.67 | 7.77 | 05 | 77.03 |

उदा.संवर्ग – प्रयोगशाळा तंत्रज्ञ.

| अक्र. | नाव | बारावी विज्ञान परीक्षा | | डीपदविका टी.एल.एम. | | अनुभवाचे 10% पैकी गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | टक्केवारी | प्राप्त गुणानुसार 80% पैकी | टक्केवारी | प्राप्त गुणानुसार 10% पैकी | | |
| 1 | श्रीमती पल्लवी व्ही शेलार | 76.64 | 61.31 | 80 | 8 | 09 | 78.31 |
| 2 | श्री. वसंत एच. घुले | 76.67 | 61.33 | 53 | 5.30 | 10 | 76.63 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | श्रीमती योगिता लोंढे | 75.56 | 60.44 | 72.50 | 7.25 | 8 | 75.69 |

वरील उदाहरणाचे तौलनिक विश्लेषण केले असता, असे दिसून येते की विभागाने गुणवत्ता ठरविताना बारावीच्या सर्वसाधारण परीक्षेतील गुणांना तांत्रिक पदविका / पदवीच्या तुलनेने म्हणजेच 70:10 एवढे वाढीव प्राधान्य दिल्यामुळे महापालिकेच्या नियुक्ती प्रक्रियेत जे उमेदवार तांत्रिक गुणवत्ता पदवी किंवा पदविका परिक्षेत उत्तम गुणवत्ता प्राप्त आहे. अशा उमेदवारांना इयत्ता बारावीच्या गुणांच्या आधारे दुय्यम गुणानुक्रम मिळाला आहे व बारावीच्या परिक्षेतील गुण धारक हे तांत्रिक कौशल्याशिवाय केवळ मुल्यांकनामध्ये प्राधान्य दिल्यामुळे गुणवत्ता यादीत सरस ठरले आहेत. अशाप्रकारे गुणांकनासाठी चुकीचे निकष ठरविले गेले असल्यामुळे झालेली निवड प्रक्रिया सदोष असल्याचे दिसून येते. विभागाने अशाप्रकारे निकष ठरविणेबाबतच्या प्राधिकारासह अनुपालन सादर केले नाही.

DATVRKM8002 (Ref No : 71, Para. No : 139)

## *42 देयकातुन कपात केलेली कामाच्या विम्याची रक्कम शासकिय विमा निधीकडे भरणा करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 73956.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 73956.00/-

***महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे परिपत्रक क्रं. जीईएन/1098/1357/प्रं. क्रं.166 /98-24 दिनांक 03.11.2013 अन्वये ठेकेदाराचा देयकातून कपात केलेली 1% विमा रक्कम शासकिय विमा निधीकडे जमा करण्यात आलेली नाही.***

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागाचे लेखापरीक्षण करता देयकातुन कपात केलेली कामाच्या विम्याचे रक्कम शासकिय विमा निधीकडे भरणा करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे.याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे

मिरा -भाईदर महानगरपालिका

| अ.क्र | कामाचे नाव | प्रमाणक कं ./दिनांक | कामाची रक्कम | 1% प्रमाणे विमा रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | भाईदर (प.) पभाग क्र.27 मधील आंबेडकर नगर येथे सी.सी.गटार व पदपथाचे बांधकाम करणे (दलित वस्ती) | 19/31.03.2015 | 2446249/- | 24462/- |
| 2 | उत्तन लुझरवाडी येथे गटार बांधून स्लॅब टाकणे.(आमदार निधी) | 04/06.09.2014 | 1483910/- | 14839/- |
| 3 | मिरारोड (पूर्व) उद्यानात आवश्यक काम करणे. (आमदार निधी) | 24/24.03.2015 | 1468585/- | 14686/- |
| 4 | भाईदर (प.) जय अंबे मोतीनगर येथे सी.सी.रस्ते व गटार बांधणे.(आमदार निधी) | 22/09/03/2015 | 998647/- | 9986/- |
| 5 | भाईदर (प.) स्मशानभूमीचे बांधकाम करणे. | 24/24.03.2015 | 998341/- | 9983/- |
| | | | एकूण रु. | 73956/- |

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे परिपत्रक क्र.जीइंएन/1098/1357/प्र.क्र.166 /98-24 दिनांक 03.11.2013 अन्वये ठेकेदाराचा देयकातून कपात केलेली 1% विमा रक्कम शासकिय विमा निधीकडे जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे रक्कम रु.73956/- शासकिय विमा निधीकडे सत्वर जमा करावी.

## 43 अग्निशमन निरीक्षण शुल्क, कपिटेशन फी रक्कमेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : अग्निशमन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 5651056.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 5651056.00/-

***उंच इमारतीमधील कायमस्वरूपी आग विझविण्याच्या उंच इमारतीमधील कायमस्वरूपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपिटेशन फी च्या निवासी १/१० व बिगरनिवासी १/४ पट रक्कमेनुसार वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या संबंधित वर्षाच्या कपिटेशन फी नुसार वर्ष २०१४-१५ अखेर एकूण रक्कम रु.५६,५१,०५६/- इतकी अग्निशमन शुल्क फी वसुली होणे प्रलंबित आहे. महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. ९३ दिनांक १७/०३/२००७ अन्वये १०% दरवाढीनुसार वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये कॅपिटेशन फी वसुली केली आहे. सदरच्या दरवाढीस अधिनियमातील कलम १२(ब) नुसार शासनाची पूर्वमंजुरी घेऊन दरवाढीनुसार कॅपिटेशन फी वसुली करणे आवश्यक असता अशी मंजुरी प्राप्त केली नाही.***

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे वर्ष २०१४-१५ या वित्तील वर्षाचे लेखा परीक्षणात असे दिसून आले की, महासभा ठराव क्रमांक ९९ दिनांक २०/०३/२००६, ठराव क्र.९३ दिनांक १७/०३/२००७ अन्वये उंच इमारतीमधील कायमस्वरूपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपिटेशन फी च्या निवासी १/१० व बिगरनिवासी १/४ पट इतकी घेण्यात येते. लेखा परीक्षणात याबाबतचे अभिलेखे मागणी केले असता वर्षनिहाय कॅपिटेशन फी मागणी व वसुलीचे अभिलेखे ठेवलेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. विभागाने सादर केलेल्या खुलाशात कार्यालयात उपलब्ध असलेल्या वर्ष २०१३ ते २०१५ या कालावधीचे अभिलेख्यानुसार वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या संबंधित वर्षाच्या कपिटेशन फी नुसार वर्ष २०१४-१५ अखेर एकूण रक्कम रु.५६,५१,०५६/- इतकी अग्निशमन शुल्क फी वसुली होणे प्रलंबित आहे. तरी सदरची रक्कम वसुली करून उर्वरित वर्षातील अभिलेख्यांचा शोध घेऊन त्याआधारे निरीक्षण शुल्क मागणी रक्कम अंतिम निर्धारण करून वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक

उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम १३ व १४ मधील तरतुदीनुसार विकासधारकाकडून विहित केलेल्या दरानुसार कॅपिटेशन फी वसुली केली आहे. महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. ९३ दिनांक १७/०३/२००७ अन्वये १०% वाढ केली असून त्याप्रमाणे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये दरवाढीनुसार कॅपिटेशन फी वसुली केली आहे. सदरच्या दरवाढीस अधिनियमातील कलम १२(ब) नुसार शासनाची पूर्वमंजुरी घेऊन दरवाढीनुसार कॅपिटेशन फी वसुली करणे आवश्यक असता अशी मंजुरी प्राप्त न करता कॅपिटेशन फी वसुली नियमबाह्य वसुली केली आहे. विभागाने अर्धसमास पत्र क्र. ४३ दिनांक २२/०८/२०१६ च्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात शासनाचे मंजुरीसाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्यात येईल असे कळविले आहे तथापि प्रत्यक्षात कार्यवाही अपूर्ण असल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

वसुलपात्र रक्कम रु.५६५१०५६/-

DGPVTTM7001 (Ref No : 21. Hmm No : 43)

## 44 आरोग्य केंद्रांना वितरित पावती पुस्तकांनुसार जमा रकमेचा कमी भरणा झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 03

*लेखा शीर्ष : आरोग्य विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 67500.00/-

*मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून आरोग्य केंद्रांमार्फत तसेच रुग्णालयामार्फत रुग्णांना अल्प दरात आरोग्य सुविधा देण्यात येत असून जे शुल्क/ फी आकारण्यात येते ते महापालिका निधीमध्ये जमा करण्यात येते. भांडार शाखेकडून शुल्क/ फी आकारण्यासाठी पावती पुस्तके वैद्यकीय आरोग्य विभागास वितरीत करण्यात येतात. वितरित केलेल्या मूळ पावत्या लेखापरीक्षणास दाखविल्या नसल्यामुळे एकूण रक्कम रु.67,500/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.*

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण वर्ष 2014-15 या वित्तीय वर्षाच्या आरोग्य विभागाकडे जमा झालेल्या रकमांचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 24 दिनांक 20/07/2016 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. सदर अर्धसमास पत्रासंदर्भात महापालिकेने कोणताही खुलासा केलेला नसून त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) आरोग्य केंद्रांकडे बाहयरुग्ण शुल्क, श्वानदंश, गर्भ चिकीत्सा, हॉस्पिटल/ क्लीनिक फॉर्म फी,

हॉस्पिटल/ क्लीनिक नोंदणी/ नुतनीकरण फी, शवागृह, प्रयोगशाळा, सोनोग्राफी, डायलिसीस, ईसीजी, सोनोग्राफी फॉर्म फी, सोनोग्राफी नोंदणी फी व इतर शुल्क/ फी जमा पावती नुसार जमा करुन घेतली जाते. सदर जमा पावत्या भांडार शाखेकडून वैद्यकीय आरोग्य विभागास वितरीत करण्यात येतात व वैद्यकीय आरोग्य विभागाकडून संबंधित आरोग्य केंद्रांना पावती पुस्तकांचे वाटप करण्यात येते. वापरलेल्या पावत्यानुसार जमा रकमेचा भरणा आरोग्य केंद्रांकडून मुख्यालयात करण्यात येतो. सदर पावती पुस्तकांची नोंद आरोग्य केंद्रांनी साठा नोंदवहीत करणे आवश्यक आहे. आरोग्य केंद्रांना मिळालेली पावती पुस्तके, वापरलेली पावती पुस्तके व शिल्लक पावती पुस्तके असा पावती पुस्तकांचा लेखा आरोग्य केंद्र स्तरावर ठेवणे आवश्यक आहे. तसेच वापरात न आलेल्या पावती पुस्तके रद्द करुन पावती पुस्तक साठा नोंदवहीमध्ये नोंद घेऊन सदरची पावती पुस्तेके मुख्यालयास परत करणे आवश्यक आहे. वापर केलेल्या पावती पुस्तकाच्या शेवटच्या पानावर व पोटकिर्दीला वैदयकीय अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. याप्रमाणे आरोग्य केंद्रांनी पावती पुस्तकांचे साठा नोंदवही ठेवलेली नाही. तसेच वापरात न आलेली पावती पुस्तके लेखापरीक्षणास दाखविली नाहीत. त्यामुळे भांडार शाखेकडून वितरीत केलेल्या पावती पुस्तकांनुसार योग्य प्रमाणात रकमा जमा झाल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

खालील आरोग्य केंद्रांनी पावती पुस्तकांचा लेखा ठेवलेला नाही. आरोग्य केंद्रांना मुख्यालयांकडून वाटप झालेली परंतू वापरात न आलेली खालील पावती पुस्तके लेखापरीक्षणास दर्शविली नाहीत.

रुपये 5/- ची पावती पुस्तके

| आरोग्य केंद्राचे नाव | महिना/ वर्ष | रु.5/- ची 100 पावत्यांची पावती पुस्तके | पावत्यांची एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| भाईंदर (प) | मार्च 2015 | पा.पु.क्र.32 ते पा.पु.क्र.40= एकूण 09 | 4500 |
| पेनकरपाडा | मार्च 2015 | पा.पु.क्र.671 ते पा.पु.क्र.710= एकूण 40 | 20000 |
| उत्तन | मार्च 2015 | पा.पु.क्र.966 ते पा.पु.क्र.970= एकूण 05 | 2500 |
| गणेशदेवल नगर,जयअंबेनगर | मार्च 2015 | पा.पु.क्र.753 ते पा.पु.क्र.760 व पा.पु.क्र.828 ते पा.पु.क्र.840 = एकूण 21 | 10500 |
| एकूण | | | 37500 |

रुपये 50/- ची पावती पुस्तके

| आरोग्य केंद्राचे नाव | महिना/ वर्ष | रु.50/- ची 100 पावत्यांची पावती पुस्तके | पावत्यांची एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| भाईंदर (प) | मार्च 2015 | पा.पु.क्र.264= एकूण 01 | 5000 |
| उत्तन | मार्च 2015 | पा.पु.क्र.270= एकूण 01 | 5000 |
| गणेशदेवल नगर,जयअंबेनगर | मार्च 2015 | पा.पु.क्र.167,168 व पा.पु.क्र.215,216= एकूण 04 | 20000 |

| | |
|---|---|
| एकूण | 30000 |

वरील प्रमाणे रु.5/- च्या पावती पुस्तकांनुसार रु.37,500/- व रु.50/-च्या पावती पुस्तकांनुसार रु.30,000/- अशी एकूण रक्कम रु.67,500/- च्या मूळ पावत्या लेखापरीक्षणास सादर करून त्यांचा विनियोग न झाल्याचे सिध्द करावे. तसेच वापर केलेल्या पावती पुस्तकाच्या शेवटच्या पानावर व पोटकिर्दीला वैदयकीय अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक असता तसे प्रमाणित केलेले नाही.

2) लेखापरीक्षण कालावधीमध्ये टेंबा आरोग्य केंद्र, उत्तन आरोग्य केंद्र व काशीगाव आरोग्य केंद्र यांच्या पोटकिर्दी व जमा पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

3) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून आरोग्य केंद्रांमार्फत तसेच रुग्णालयामार्फत रुग्णांना अल्प दरात आरोग्य सुविधा देण्यात येत असून जे शुल्क/ फी आकारण्यात येते ते महापालिका निधीमध्ये जमा करण्यात येते. आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये आरोग्य केंद्रांमार्फत व रुग्ण्यालयांमार्फत महिनानिहाय एकूण जमा रक्कम लेखा शाखेत रोख भरणा केल्याचे (मासिक जमा गोषवारा) रोख शाखेकडून प्रमाणित करून अभिलेख/ विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

वितरित केलेल्या मूळ पावत्या लेखापरीक्षणास दाखविल्या नसल्यामुळे एकूण रक्कम रु.67,500/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATAMSM0101 (Ref No : 23, Item No : 24)

***45 आरोग्य विभागासाठी खरेदी केलेल्या मालाचा पुरवठा विहित मुदतीत न केल्यामुळे विलंब शुल्काची कमी आकारणी केल्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 01

*लेखा शीर्ष : आरोग्य विभाग मनपा निधी*
*अनियमितता कलम : 95*

वसूलपात्र रक्कम रु. 6784.00/-

*मिरा भाईंदर महानगरपालिका वैद्यकीय विभागाकरीता औषधे, लॅब मटेरीअल, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेसाठी दिलेल्या कार्यादेशामध्ये पुरवठा करण्यासाठी 15 दिवसांची विहित मुदतीची अट घातलेली असून विहित मुदतीत पुरवठा न केल्यास मालाच्या किमंतीवर प्रती आठवडा 0.5% दंड आकारण्याची तरतूद आहे. विहित मुदतीत सर्जिकल मटेरिअलचा पुरवठा न केलेल्या पुरवठादारांकडून विलंब शुल्क कमी आकारले आहे. आरोग्य विभागासाठी खरेदी केलेल्या मालाचा पुरवठा विहित मुदतीत न केल्यामुळे मालाच्या किमंतीवर प्रती*



[redacted]

*आठवडा 0.5% प्रमाणे दंड आकारणी न केल्यामुळे पुरवठादाराकडून एकूण रक्कम रु.6,784/- दंडाची वसूली करण्यात यावी.*

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वैद्यकीय विभागाकरीता औषधे, लॅब मटेरीअल, सर्जिकल मटेरिअल खरेदीच्या खर्चाचे वित्तीय वर्ष 2014-15 चे लेखापरीक्षणामध्ये आरोग्य विभागासाठी खरेदी केलेल्या मालाचा पुरवठा विहित मुदतीत न केल्यामुळे विलंब शुल्काची कमी आकारणी केल्याबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 36 दिनांक 4/08/2016 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. सदर अर्धसमास पत्रासंदर्भात महापालिकेने त्यांच्या पत्र क्रमांक 903, दिनांक 12/08/2016 अन्वये केलेला खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) वैद्यकीय विभागाकरीता औषधे, लॅब मटेरीअल, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेसाठी निविदा मागवून खरेदी करण्यात आली आहे. निविदाधारकांना औषधे, मटेरिअल पुरवठा करणेसाठी कार्यादेश देण्यात आले आहेत व त्यानुसार पुरवठा करणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. कार्यादेशामध्ये दिलेल्या विहित मुदतीत पुरवठादाराने पुरवठा करणे आवश्यक आहे. सर्जिकल मटेरिअल खरेदी करण्यासाठी दिलेल्या कार्यादेशामध्ये पुरवठा करण्यासाठी 15 दिवसांची विहित मुदतीची अट घातलेली असून विहित मुदतीत पुरवठा न केल्यास मालाच्या किमंतीवर प्रती आठवडा 0.5% दंड आकारण्याची तरतूद आहे.

विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या खालील पुरवठादारांना विलंब शुल्क कमी आकारले/आकारले नाही.

तक्ता - 35

| पुरवठाधारकाचे नाव | कार्यादेश क्रमांक व दिनांक | पुरवठा केलेचा दिनांक | विलंबाने पुरवठा केलेले आठवडे | विलंबाने पुरवठा केलेल्या मालाची रक्कम (रु.) | विलंब शुल्क/ दंड (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| मे.जेनेवा बायोटेक | 877 / 20-10-2014 | 11-11-2014 | 1 | 89264 | 446 |
| | | 13-11-2014 | 1 | 187806 | 939 |
| | | 20-11-2014 | 2 | 330010 | 3300 |
| मे.सरिता डिस्ट्रीब्युटर्स | 878 / 20-10-2014 | 10-11-2014 | 1 | 8505 | 43 |
| | | 17-11- | 2 | 6410 | 64 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2014 | | | |
| | | 25-11-2014 | 3 | 92975 | 1394 |
| | | 11-12-2014 | 5 | 23950 | 598 |
| एकूण | | | | | 6784 |

विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या पुरवठादारांना वसुलपात्र विलंब शुल्क/ दंड खालील प्रमाणे-

| अ.क्र. | पुरवठादाराचे नाव | अनुज्ञेय दंड | वसूल दंड | वसूलपात्र दंड |
|---|---|---|---|---|
| 1 | मे.जेनेवा बायोटेक | 4685 | -- | 4685 |
| 2 | मे.सरिता डिस्ट्रीब्युटर्स | 2099 | -- | 2099 |
| | | | एकूण | 6784 |

मॅन्युअल ऑफ ऑफिस प्रोसीजर फॉर परचेस ऑफ स्टोअर मधील CHAPTER 1 मधील (G) नुसार विहित मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास विलंब शुल्काची दंडनीय रक्कम प्रति आठवडा 0.5% आकारणे आवश्यक आहे. तसेच सर्जिकल मटेरिअल खरेदी करण्यासाठी दिलेल्या कार्यादेशामध्ये पुरवठा करण्यासाठी 15 दिवसांची विहित मुदत असून विहित मुदतीत पुरवठा न केल्यास मालाच्या किमंतीवर प्रती आठवडा 0.5% दंड आकारण्याची अट घातलेली आहे. आरोग्य विभागासाठी खरेदी केलेल्या मालाचा पुरवठा विहित मुदतीत न केल्यामुळे मालाच्या किमंतीवर प्रती आठवडा 0.5% प्रमाणे दंड आकारणी न केल्यामुळे संबंधितांकडून उपरोक्त प्रमाणे दंडाची वसूली करण्यात यावी.
वसूलपात्र रक्कम रु.6,784/-

DATAMSM6461 (Ref No : 24, Hmm No : 36)

### 46 प्रभाग क्रं.6 मधील मालमत्ता हस्तांतरणामधील अनियमिततेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 93*

*प्रभागाने मालमत्ताधारकाकडून हस्तांतरण शुल्क भरणा करण्यापूर्वीच मालमत्ता हस्तांतरण आदेश निर्गमित*

*केले आहेत. मालमत्ता हस्तांतरणासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर करदात्याकडून चालूवर्षाची मालमत्ता कर वसूल न करता मालमत्ता हस्तांतरण आदेश प्रदान केले आहेत. प्रभागातील झोपडयांची संख्या व त्यावर कर* ***निर्धारण केल्याबाबतच्या नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. त्याअभावी करनिर्धारणाची प्रक्रिया अचूक व 100% झाल्याबाबतची लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.***

मा.महासभेचा ठराव क्र.38 दि.01/04/2006 पासून विशेष हस्तांतरण शुल्क निवासीसाठी रु.100/- व बिगर निवासीसाठी रु.1500 आकारण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.89 दि.25/10/2016 निर्गमित केले असता अनुपालन अप्राप्त आहे.सन 2014-2015 या कालावधीतील प्रभाग क्र 6. मधील मालमत्ता हस्तांतरणा बाबतच्या काही निवडक नस्ती तपासल्या असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1) सन 2014-2015 मध्ये हस्तांतरण शुल्क भरणा करण्यापूर्वीच मालमत्ता हस्तांतरण आदेश प्रदान केल्याचे निदर्शनास आले. याबाबतची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | मालमत्ता क्र. व मालमत्ता धारकांचे नांव | हस्तांतरण शुल्क स्विकारल्याची पावती क्र. व दिनांक | हस्तांतरण आदेश | हस्तांतरण शुल्काची रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | K030032085001<br>चंद्रभागासी मशालकर | 734387/06.12.2014 | मनपा/प्रक्र-6/ 1956/234/ 13-14 दि.09.05.2014 | 1500.00 |
| 2 | K03008542025<br>अजय सिमाराम शिंदे | 734445/20.12.2014 | मनपा/प्रक्र-6/ 1511/1867/ 14-15 दि.09.05.2014 | 1000.00 |
| 3 | Q020025431045<br>पंकज ब्रिज बिहारी लाडीवाल | 734435/17.12.2014 | मनपा/प्रक्र-6/281/813/14-15 दि.10.07.2014 | 1000.00 |
| 4 | L04001663008<br>अनिता अनिल सावंत | 730265/13.10.2014 | मनपा/प्रक्र-6/1343/243/ 13-14 दि.02.05.2014 | 1000.00 |
| 5 | L040035910000<br>विकास ओ खन्ना | 734388/24.11.2014 | मनपा/प्रक्र-6/1244/1500 14-2015 दि.24..09..2014 | 1000.00 |

2) सन 2014-2015 मध्ये मालमत्ता हस्तांतरणासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर करदात्याकडून चालूवर्षाची मालमत्ता कर वसूल करून मालमत्ता हस्तांतरण आदेश प्रदान करणे आवश्यक असताना विभागाने तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नसल्याचे निदर्शनास आले. याबाबतची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | मालमत्ता क्र. व मालमत्ता धारकांचे नांव | हस्तांतरण शुल्क स्विकारल्याचे पावती क्र व दिनांक | हस्तांतरण आदेश | हस्तांतरण शुल्काची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | L03002040200<br>विलीयन कैतान फर्नांडिस | वारस हक्काने | मनपा/प्रक्र-3/ 4574/1856/14-15 दि.10.07.2014 | ----- | हस्तांतरणाच्या आदेशा पर्यंतचे कराचा भरणा केल्याचे कर पावती उपलब्ध झाले नाही. |
| 2 | K04003356007<br>किशोर सुनिल दत्त | 734361/<br>29.11.2012 | मनपा/प्रक्र-6/ 1076/1876/1869/14-15 दि.21.11.2014 | 1000.00 | टिप्पणीमध्ये 2014-15 चा कराचा भरणा केल्याचे नमूद आहे परंतु प्रत्यक्षात 2013-14 चा कर भरणा केला आहे. |
| 3 | L030016885000<br>शुभांगी सुरेश गुरव | वारस हक्काने | मनपा/प्रक्र-6/ 257/1501/1856/14-15 दि.24.09.2014 | ----- | हस्तांतरणाच्या आदेशा पर्यंतचे कराचा भरणा केल्याचे कर पावती उपलब्ध झाले नाही. |
| 4 | K03008542029<br>हरेश मनोहर देसाई | 686114/<br>31.10.2013 | मनपा/प्रक्र-6/ 669/525/13-14 दि.22.10.2014 | 1000.00 | नस्तीमध्ये 2013-14 चा कराचा भरणा केल्याची पावती उपलब्ध झाली नाही. |
| 5 | L040017204024<br>मंदार सिताराम कोंदे | 730270/<br>27.102014 | मनपा/प्रक्र-6/ 3300/1305/14-15 दि.28.08.2014 | 1000.00 | नस्तीमध्ये 2014-2015 चा कराचा भरणा केल्याची पावती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | उपलब्ध झाली नाही. |

3 प्रभागातील सन 2014-15 मधील झोपडयांची संख्या व त्यावर कर निर्धारण केल्याची नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत त्याअभावी करनिर्धारणाची प्रक्रिया अचूक व 100% झाल्याबाबतची लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

BODTKSMo891 (Ref No : 26, Hom No : 89)

## *47 प्रभाग क्र.05 मधील मोबाईल टॉवर्सच्या करातील वसूलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1184755.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1184755.00/-

***मागणी नोंदवही विभागाकडून उपलब्ध् नद झाल्याने थकबाकीबाबतची सत्यता पडताळता आली नाही.***

प्रभाग क्र. 05 मधील मोबाईल टॉवर्सच्या करातील वसूलीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.89 दि.25/10/2016 निर्गमित केले असता अनुपालन अप्राप्त् आहे.याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

2) प्रभाग क्र.5 अंतर्गत असलेल्या मोबाईल टॉवर्सच्या सन 2014-15 मधील विभागाकडील उपलब्ध अभिलेख्यानुसार सन 2014-15 मध्ये मागणी रु.6465090 (-) वसुली रु.5797829 थकबाकी रु.737673 दर्शविले आहे.प्रत्यक्षात मागणी नोंदवही विभागाकडून उपलब्ध न झाल्याने सत्यता पडताळता आली नाही.

2)संगणक प्रणालीमध्ये कराचा भरणा तपासले असता पुढीलप्रमाणे मागणीपेक्षा अतिरीक्त् वसूली केल्याचे आढळून आले आहेत.सदर प्रकरणे उदाहरणादाखल नमूद केली आहेत.

सन सन 2014-15.

| अ.क्र | मालमत्ता क्रमांक | मोबाईल कंपनीचे नांव | मागणी | वसुली | थकबाकी | मागणी पेक्षा अतिरिक्त वसुली |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MT010041887000 | वोडाफोन इंडस | 97256 | 166724 | -- | 69468 |
| 2 | MT010041943000 | वोडाफोन | 115862 | 125659 | -- | 9797 |
| 3 | MT010041924000 | वोडाफोन इंडस | 229358 | 231408 | -- | 2050 |
| 4 | MT010041935000 | वोडाफोन | 52319 | 54209 | -- | 1890 |

1) संगणक प्रणालीमध्ये कराचा भरणा तपासले असता पुढीलप्रमाणे मागणी,वसुली व थकबाकी दर्शविली आहे. मात्र प्रभाग कार्यालयाने सादर केलेल्या विवरणपत्रानुसार खाली नमूद मालमत्ता धारकांची वसुली/थकबाकीच्या रक्कमेबाबत तफावत आढळून येते.

सन सन 2014-15.

| अ.क्र | मालमत्ता क्रमांक | मोबाईल कंपनीचे नांव | मागणी | वसुली | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MT010041769000 | एअरटेल इंडस | 76950 | 00 | 76950 |
| 2 | MT010041986000 | आयडिया सेल्युलर | 147357 | 102600 | 44757 |
| 3 | MT010042067000 | एटीसी मोबाईल | 391469 | 00 | 391469 |
| 4 | MT010041906000 | इंडस टॉवर | 252944 | 51944 | 201000 |
| 5 | MT010041957000 | वोडाफोन इन्फ्रा. | 574401 | 107730 | 466671 |
| 6 | MT010041889000 | इंडस टॉवर | 252712 | 248804 | 3908 |
| | | | | एकूण रु. | 1184755 |

वरील तक्त्यातील प्रकरणे ही उदाहरणादाखल दिलेली आहेत. सन 2014-15 मधील एकूण थकबाकी विचारात घेता प्रभाग कार्यालयाने मागणी/वसुली /थकबाकी यांचे लेखे अचूक ठेवले नाहीत. तसेच मागणी नसतांना मोबाईल टॉवर्स धारकाकडून अतिरिक्त वसुली करण्याबाबतचे निकष स्पष्ट झाले नाहीत. त्यामुळे सदर वर्षातील मागणी / वसुली / थकबाकी अचुकपणे घेतल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

मिरा -भाईंदर महानगरपालिका

वसुलपात्र रक्कम रु.1184755

## 48 मालमत्ता करापोटी प्राप्त झालेले धनादेश न वटल्याबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 8340076.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 8340076.00/-

***प्रभागामधील वर्ष 2014-15 मध्ये न वटलेल्या धनादेशाच्या एकूण रक्कम रु.8340076 पैकी मालमत्ताधारकानी रोखेने अथवा धनाकर्षाव्दारे भरणा केलेल्या रक्कमेबाबतचा तपशिलवार अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. मालमत्ता करापोटी दिलेले धनादेश बँकेतून अनादर घसल्यामुळे संबधित मालमत्ताधारकाविरुध्द परक्राम्यपत्र (Negotiable Instrument Act) कायद्यानुसार कलम 138 अन्वये केलेल्या कारवाईबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.***

प्रभाग कार्यालयातील कर निर्धारण व संकलन विभागाची मालमत्ता कराच्या जमा रक्कमाबाबतच्या उपलब्ध नोंदवहीचे पडताळणी केले असताता सन 2014-15 मध्ये प्रभाग कार्यालयाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यानुसार मालमत्ता करापोटी भरणा केलेले धनादेश न वटता बँकेकडून परत आल्याचे दिसते. सदर न वटलेलल्या धनादेशाचा तपशिल प्रभाग निहाय खालील तक्त्यात दर्शविले आहे.

| अ. क्र | प्रभाग कार्यालय क्रमांक | वॉर्ड | सन 2014-15 मधील | |
|---|---|---|---|---|
| | | | न वटलेल्या धनादेशांची संख्या | रक्कम |
| 1 | प्रभाग क्र.03 | एच-वॉर्ड | 130 | 1043449 |
| | | एफ-1,2,3 वॉर्ड | अभिलेख उपलब्ध केले नाही. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | प्रभाग क्र.05 | मिरा रोड | 399 | 2897014 |
| 3 | प्रभाग क्र.06 | एफ-4 | 133 | 875958 |
| | | एफ-5 | 60 | 712370 |
| | | एफ-6 | 131 | 969960 |
| | | एल,के,क्यू | 128 | 1841325 |
| | | **एकूण** | | **8340076** |

1) वरील तक्त्यातील प्रभागामधील वर्ष 2014-15 मध्ये न वटलेल्या धनादेशाच्या एकूण रक्कम **रु.8340076** पैकी किती मालमत्ताधारकांनी सदर रक्कमेची रोखीने अथवा धनाकर्षाव्दारे भरणा केली याचा तपशिलवार अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्याअभावी सदरची रक्कम वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

2) मालमत्ताधारकांनी मालमत्ता करापोटी दिलेले धनादेश बँकेत न वटल्यामूळे बँकेतून परत आल्यानंतर संबधित मालमत्ताधारकाविरुध्द परक्राम्यपत्र (Negotiable Instrument Act) कायद्यानुसार कलम 138 अन्वये केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

DDDTKSM6801 (Ref No : 37, Hmm No : 146)

## 49 मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराच्या वसुलीबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015

**अनियमितता संख्या** : 02

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : ९इ*

गुंतलेली रक्कम रु. 18275621.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 18275621.00/-

***प्रभाग कार्यालयाकडील मागणी, वसुली व थकबाकीबाबत संगणकप्रणालीमध्ये तपासणी केली असता वसुलीच्या***

*नोंदी चुकीच्या घेतल्याचे निदर्शनास आली. प्रभाग क्रं.6 अंतर्गत कनकिया वार्डाकडील मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराच्या वसुलीबाबतचे अभिलेख उपलब्ध झाले नाही. मोबाईल टॉवर्सच्या थकित कराबाबतच्या वसुलीसंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतचे अभिलेख उनलब्ध झाले नाहीत.*

वेगवेगळया प्रभाग कार्यालयातील कर निर्धारण व संकलन विभागाची मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराच्या रक्कमाबाबतच्या उपलब्ध नोंदवहीचे पडताळणी केले असताना सन 2014-15 मध्ये प्रभाग कार्यालयाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यानुसार मोबाईल टॉवर्सच्या करापोटी भरणा केलेले निहाय खालील तक्त्यात दर्शविले आहे.याबाबत अधर्ससमास ज्ञापन क्रं.145 दिनांक 28/12/2016 अन्वये विचारणा केली असता अनुपालन अप्राप्त् आहे.

| अ.क्रं. | प्रभाग कार्यालय क्रमांक | वॉर्ड | सन 2014-15 मधील | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मागणी | वसुली | थकबाकी |
| 1 | प्रभाग क्र.03 | एम.टी.झोन मधील मोबाईल टॉवर्स | 13906703 | 0 | 13906703 |
| 2 | प्रभाग क्र.05 | वॉर्ड- क्रं.5 एम.टी.झोन मधील मोबाईल टॉवर्स | 6465090 | 5794829 | 737673 |
| 3 | प्रभाग क्र.06 | वॉर्ड- एल,के,क्यू. एम.टी.झोन व्यतिरीक्त मोबाईल टॉवर्स | 3109486 | 510224 | 2599262 |
| 4 | | वॉर्ड- एल,के,क्यू. एम.टी.झोन मधील मोबाईल टॉवर्स | 2074732 | 1042749 | 1031983 |
| 5 | | कनकिया वसुली वॉर्ड | अभिलेख उपलब्ध केले नाहीत | | |
| | रु. | एकूण | 18275621 | | |

1) वर नमूद केलेल्या तक्त्यातील मोबाईल टॉवर्सच्या कराबाबतची वसूली विचारात घेता थकबाकी मोठयाप्रमाणात आहे. सदर थकबाकीदारांना नोटीसा पाठविले किंवा कसे याबाबतची खात्री पटविणारे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2)मागणी, वसूली व थकबाकीबाबत संगणक प्रणालीमध्ये तपासणी केली असता वसूलीच्या नोंदी चुकीच्या घेतल्याचे निदर्शनास आले उदा. खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्रं. | मोबाईल टॉवर मालमत्ता क्रं. | विभागाने दर्शविलेली वसुल रक्कम | संगणक प्रणालीत दर्शविलेली वसुल रक्कम | तफावत |
|---|---|---|---|---|
| 1 | एमटी/010041943000 | 115862 | 125659 | 9797 |
| 2 | एमटी/010041769000 | 763950 | 0 | 763950 |
| 3 | एमटी/010041986000 | 786987 | 102600 | 684387 |
| 4 | एमटी/010041957000 | 574401 | 107730 | 466671 |
| 5 | एमटी/010041889000 | 252712 | 248804 | 3908 |

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, विभागाचे लेखे व मुख्यालय संगणक प्रणालीतील लेखे यामध्ये तफावत आहेत. सदर तफावतीचा ताळमेळ मालमत्ता कर व संकलक विभागाने घेतलेला नाही. तसेच तफावत स्पष्ट करणारे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.

वसुलपात्र थकबाकी रक्कम रु. 18275621

DDDTKSM686, Ref No : 38, (Inc. No: 145)

## *50 मालमत्ता कराच्या जमा रक्कमेच्या तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 1

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 215450000.00 /-

*मालमत्ता कर विभागाचे लेखे व नलेखा विभागाचे लेखे यामध्ये कराचे / शुल्काचे जमा रक्कमेत आर्थिक वर्ष सन 2014-2015 मध्ये करनिहाय तफावतीच्या रक्कमेबाबत ताळमेळ घेण्यात आलेला नाही.*

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील कर निर्धारक व संकलन विभागाचे सन 2014-15 चे

लेखापरीक्षण करीत असतांना विभागाने सादर केलेल्या जमा रक्कम व वार्षिक लेख्यामध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे तफावत आढळून आली आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्र.140 दिनांक 28/12/2016 अन्वये निर्गमित केले असता अनुपालन अप्राप्त आहे.

(रु.लाखात)

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन 2014-15 | | |
|---|---|---|---|---|
| | | विभागाने दर्शविलेली जमा रक्कम | वार्षिक लेख्यानुसार जमा रक्कम | तफावत |
| 1 | मालमत्ता कर | 4851.47 | 3869.76 | 981.71 |
| 2 | वृक्ष कर | 162.68 | 166.21 | 3.53 |
| 3 | शिक्षण कर | 1153.46 | 1602.96 | 449.50 |
| 4 | रोजगार हमी कर | 123.99 | 93.51 | 30.48 |
| 5 | विशेष स्वच्छता / मलप्रवाह सुविधा लाभ | 1294.40 | 929.77 | 364.63 |
| 6 | अनधिकृत बांधकाम 267(अ) नुसार शास्ती | 260.20 | 190.44 | 69.76 |
| 7 | पाणीपुरवठा सुविधा लाभ कर | 13.63 | 35.27 | 21.64 |
| 8 | मनपा मालमत्ता करावरील व्याज | 759.01 | 677.81 | 81.2 |
| 9 | नोटीस फी | 2.75 | 8.17 | 5.42 |
| 10 | इतर किरकोळ जमा | 2.19 | 63.14 | 60.95 |
| 11 | दंडनिय शुल्क | 2.29 | 78.18 | 75.89 |
| 12 | वॉरंट फी | 0.27 | 10.06 | 9.79 |
| 13 | जप्ती | 0.19 | 0.19 | 0.00 |
| | | | एकूण रु. | 2154.50 |

वरीलप्रमाणे मालमत्ता कर विभागाचे लेखे व लेखा विभागाचे लेखे यामध्ये वरील कराचे / शुल्काचे जमा रक्कमेत आर्थिक वर्ष सन 2014-15 मध्ये कर निहाय तफावतीच्या

रक्कमेबाबत ताळमेळासह अनुपालन सादर केले नाही.

D:\DDTKSMMB\ (Ref No: 40, Para No: 143)

## 51 प्रभाग क्र.5 करनिर्धारण विभागाच्या अनियमिततेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 06

*लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 96094.00 /- :

वसूलपात्र रक्कम रु. 96094.00/-

***निवड लेखापरीक्षणात विविध मालमत्ताधारकाकडून रु.96094 वसुलापात्र आहेत.***

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या विविध प्रभागाच्या करनिर्धारण लेखापरीक्षणानंतर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

चेना विभाग

1) मिळकत कर आकारणी नोटीस मनपा/प्र.क्र.06/337/190/2014-15, दि.14.07.14

मालमत्ताधारकाचे नाव- प्रतिमा नरेश म्हात्रे / अनिता ह.म्हात्रे

कालावधी- दि.01.04.2014 ते दि.31.03.2015

करयोग्य मुल्य={(क्षेत्रफळचौ.फूट.Xदरप्रतीचौ.फूटx12)}-10%

=(4000x2.4x12)-10%=रु.103680

वार्षिक मालमत्ता कर=103680x117%=रु.121306

सदर मालमत्तेचे करनिर्धारण वरील प्रमाणे निवासी दराने करनिर्धारण करण्यात आलेले आहे.

परंतू सदर निर्धारणाचा सर्वेक्षण अहवाल,करनिर्धारण क्षेत्र 4000 दर्शविणारे दस्तऐवज व करनिर्धारण गणना दर लेखापरीक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे करनिर्धारण क्षेत्र,करनिर्धारणाचा दिनांक व दर याबाबतचे परिपूर्ण लेखापरीक्षण करता आले नाही.

सदर मालमत्ता ही बिगर निवासी असल्यामुळे तीचे रु2.4 या दराने करनिर्धारण करण्यात आलेले आहे. परंतू या विभागातील इतर मालमत्तांचे बिगर निवासी दर रु.3 ने करनिर्धारण करण्यात आल्यामुळे या मालमत्तेचे करनिलर्धारण रु.3 या दराने केले असता पुढील प्रमाणे रक्कम वसुलपात्र ठरते. तसेच उपरोक्त मिळकतदाराच्यादि.03.07.12 (मिळकत आकारणी नोटीस मधील संदर्भ क्र.1) केलेला आहे. सदर करनिर्धारण

या दिनांकापासून न करता दि.01.04.14 ते दि. 31.03.15 या कालावधीचे केल्यामुळे फरकाची रक्कम वसुल आणावी.

करयोग्य मुल्य={(क्षेत्रफळचौ.फूट.Xदरप्रतीचौ.फूटx12)}-10%

=(4000x3x12)-10%=144000-14400=रु.129600

वार्षिक मालमत्ता कर=(129600X117%कर)=रु.151632

वसुलपात्र फरक रक्कम = आवश्यक वसुलपात्र रक्कम -विभागाने करनिर्धारण केलेली रक्कम

(151632/12)33-121306=रु.45261

त्याचप्रमाणे मालमत्ताधारकाच्या अर्जाच्या दिनांकापासून करनिर्धारण न केल्यामुळे दि.31.03.2015 पर्यंत 2% दंडाची रक्कम रु151632x2%x21=रु.63985 चे नुकसान झालेले आहे.

चेना विभागाची एकूण वसुल पात्र रक्कम रु. 32533+45261=रु.77794.

प्रभाग क्र.5

2) मिळकत आकारणी नोटीस क्रमांक मनपा/कर/207/2014-15,दि.16.07.2014

मालमत्ता क्र.E0800339800/001

मालमत्ताधारकाचे नाव- श्रीमती अनिसा असगर खान, मिरा रोड पुर्व.

कालावधी- दि.01.04.2014 ते दि.31.03.2015

करयोग्य मुल्य= {(क्षेत्रफळ चौ.फूट.Xदर प्रती चौ.फूट x12)}-10%=(735x3x12)-10%=26460-2646=रु.23814

वार्षिक मालमत्ता कर=23824x57%=रु.13574

सदर मालमत्तेचे करनिर्धारण दि.01.04.2014 अगोदर रु1.60 प्रती चौ.फूट निवासी दराने रु.6016 प्रतीवर्षी प्रमाणे करण्यात आलेले होते. प्रभाग अधिकारी यांचे पत्र क्र.मनपा/प्र.का.मा./2296/2013-14,दि.30.01.2014 रोजी सदर मालमत्ता बिगर निवासी आढळल्याने सुधारीत बिगरनिवासी दराने करनिर्धारण करण्याबाबत मालमत्ताधारकास नोटीस बजावण्यात आलेली आहे.या नोटीसीमध्ये वरील मालमत्ता बिगर निवासी कोणत्या कालावधीपासून आढळून आली याचा उल्लेख नाही. तसेच करनिर्धारणाचा दर विभागाने उपलब्ध करुन दिलेला नाही. नोटीस कालावधीपासून बिगरनिवासी दराने करनिधारण न केल्यामुळे 13574/12x3=रु.3394 कमी वसुल करण्यात आलेली आहे. ही मालमत्ता विकासकाकडून मालमत्ताधारकाने दि.04.01.2005 रोजी रजिस्ट्रेशन झालेले आहे. वरील प्रमाणे बिगरनिवासी मालमत्ता आढलेल्या दिवसापासून रक्कम वसुलात आणावी.

3) मिळकत आकारणी नोटीस क्रमांक मनपा/कर/2544/146/14-15,दि.12.05.14

मालमत्ता क्र.E120031154013/001

मालमत्ताधारकाचे नाव- श्री.खुशवंतसिंग मेडतीया,मिरा रोड पुर्व.

कालावधी- दि.01.04.2014 ते दि.31.03.2015

करयोग्य मुल्य= {(क्षेत्रफळ चौ.फूट.Xदर प्रती चौ.फूट x12)}-10%=(437x3x12)-10%=15732-1573=रु.14159

वार्षिक मालमत्ता कर=14159x57%=रु.8072

सदर मालमत्तेचे करनिर्धारण दि.01.04.2014 अगोदर रु1.60 प्रती चौ.फूट निवासी दराने करण्यात आलेले

होते. मालमत्ताधारकाचा अर्ज दि.12.02.2014 नुसार बिगर निवासी दराने रु.8072 प्रमाणे 01.042014 पासून करण्यात आलेले आहे. मालमत्ताधारकाचा दि.12.02.2014 अर्जाच्या दिनांकापासून कार्यवाही न झाल्यामुळे रु.1345 वसुलपात्र आहेत. सुधारीत बिगरनिवासी दराने मालमत्ताधारकाच्या अर्जावरुन करण्यात आलेली आहे. वरील मालमत्ता बिगर निवासी कोणत्या कालावधीपासून आढळून आली याचा उल्लेख नाही. तसेच करनिर्धारणाचा दर विभागाने उपलब्ध करुन दिलेला नाही.

4) मिळकत आकारणी नोटीस क्रमांक मनपा/49/172/14-15,दि.16.05.14

मालमत्ता क्र.E150030202038 व E150030202039

मालमत्ताधारकाचे नाव- श्री.अनी फ्रान्सिस कोडी पारामबिल,मिरा रोड पुर्व.

कालावधी- दि.01.04.2014 ते दि.31.03.2015

करयोग्य मुल्य= {(क्षेत्रफळ चौ.फूट.Xदर प्रती चौ.फूटx12)}-10%=(509x1.65x12)-10%=10078-1007=रु.9070

वार्षिक मालमत्ता कर=9070x57%=रु.4945

सदर मालमत्तेचे करनिर्धारण दि.01.04.2014 ते 31.03.2015 या वर्षासाठी रु1.60 प्रती चौ.फूट अनिवासी दराने रु.4945 करण्यात आलेले होते. मालमत्ताधारकाचा अर्ज दि.04.012014 नुसार बिगर निवासी दराने रु.4945 प्रमाणे करनिर्धारण करण्यात आलेले आहे. ज्या दराने वरील करनिर्धारण करण्यात आलेले आहे त्या दराची सत्यता पटविणारे दस्तऐवज लेखापरीक्षणास अप्राप्त आहे.मिरारोड पूर्व मालमत्तांच्या करनिर्धारणांच्या इतर प्रकरणांमध्ये बिगर निवासी दर रु3 प्रती चौ.फूट घेण्यात आलेल आहे. तसेच ही मालमत्ता सर्व्हेक्षण अहवालामध्ये बिगरनिवासी मालमत्ता कधी रुपांतरीत झाली याबाबतचा साधार अहवाल नाही. या मालमत्तेची पुना नगर को.ऑ.सोसायटीने मालमत्ताधारकास वर उल्लेख मालमत्तेसाठी बिगरनिवास रुपांतरणासाठी दि.24.10.2013 रोजी नाहरकत दाखला दिलेला आहे. सबब वरील दोन्ही बाबीवरुन नाहरकत दि.24.10.2013 च्या पुढील महिन्यापासून म्हणजे दि.01.11.2013 व रु.3 प्रती चौ.फूट नुसार खालील प्रमाणे गणना करण्यात करुन रक्कम वसुलात आणावी.

करयोग्य मुल्य= {(क्षेत्रफळ चौ.फूट.Xदर प्रती चौ.फूटx12)}-10%=(509x3x12)-10%=18324-1832=रु.16492

वार्षिक मालमत्ता कर=16492x57%=रु.9400

दि.01.11.13 ते दि.31.03.15 पर्यंत एकूण 15 महिने =9400/12x15=13311

वसुलपात्र फरक रक्कम = आवश्यक वसुलपात्र रक्कम -विभागाने करनिर्धारण केलेली रक्कम

13311-4945=रु.8366

5)मिळकत आकारणी नोटीस क्रमांक मनपा/कर/620/2014-15,दि.26.03.15

मालमत्ता क्र.E120030840020

मालमत्ताधारकाचे नाव- श्री.रामसरण यादव व इतर,मिरा रोड पुर्व.

कालावधी- दि 01.04.2014 ते दि.31.03.2015

करयोग्य मुल्य={(क्षेत्रफळ चौ.फूट.Xदर प्रती चौ.फूटx12)}-10%=(600x1.60x12)-10%=11520-

1152=रु.10368

वार्षिक मालमत्ता कर=10368x108%(शास्तीसह)=रु.11197

सदर मालमत्तेचे करनिर्धारण दि.01.04.2014 ते 31.03.2015 या वर्षासाठी रु1.60 प्रती चौ.फूट निवासी दराने रु.10368 करण्यात आलेले होते. परंतू M/s.DROPLET CONSULTANT,CONSULTING ENGG.&ARCHITECH यांचे पत्र क्र.DC/CRT/MARCH/2014]fn.14.03.2014 मध्ये The open terr.at मालमत्ताधारकाचा अर्ज दि.04.012014 नुसार बिगर निवासी दराने रु.4945 प्रमाणे करनिर्धारण करण्यात 1st floor with H.N.104 admeasuring area आलेले आहे. ज्या दराने वरील करनिर्धारण करण्यात आलेले आहे sq meter असे नमूद आहे यानुसार सदर निवासी पत्राशेडचे क्षेत्रफळ 72x10.76=774.72 चौ.फूट आहे. या पत्राशेडचे नव्याने करनिर्धारण करण्याबाबतचा मालमत्ताधारकाचा अर्ज दिना.25.02.2014 आहे. त्यामुळे सदर पत्राशेडचे करनिर्धारण दि.01.03.2014 पासून 774.72 चौ.फूट प्रमाणे खालील प्रमाणे गणना करुन फरकाची रक्कम वसुलात आणावी.

करयोग्य मुल्य= {(क्षेत्रफळ चौ.फूट.Xदर प्रती चौ.फूटx12)}-10%=(774.72x1.60x12)-10%=14875-1487=रु.13388

वार्षिक मालमत्ता कर=13388x108%=रु.14459

दि.01.03.13 ते दि.31.03.15 पर्यंत एकूण 13 महिने =14459/12x13=15563

वसुलपात्र फरक रक्कम = आवश्यक वसुलपात्र रक्कम -विभागाने करनिर्धारण केलेली रक्कम

15563-10368=रु.5195

प्रभाग क्र.5 एकूण वसुल पात्र रक्कम रु. 3394+1345+8366+5195=रु.18300

एकूण वसुलपात्र रक्कम

1. चेना विभागाची ची एकूण वसुलपात्र रक्कम रु.77794.

2.प्रभाग क्र.5 ची वसुलपात्र रक्कम रु. =रु.18300

एकूण रु.96094

6)वरील लेखापरीक्षण केलेल्या विभागाचे खालील अभिलेख लेखापरीक्षावेळी पथकास उपलब्ध झाले नाहीत.

1.2013-14 ची प्रत्यक्ष जमा,पावत्या, रोखवही.

2.लेखापरीक्षण वर्षातील विभागाने बँकेत चेक जमा केल्याची बॅक रिसिट आणि प्रत्यक्ष जमा झाल्याचे खात्री पटविणारे बँकेचे मासिक विवरण पत्र.

वरील अभिप्रायासंदर्भात विभागास अर्धसमास पत्र क्र. 98 दि.16.11.2016 नुसार कळविण्यात आले होते. परंतू विभागाकडून अनुपालन प्राप्त झाले नाही.

DVESMBM7301 (Ret No : 60, Plan No : 98)

## 52 संगणक विभागातील टोनरची साठा नोंदवहीतील तफावतीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

*लेखा शीर्ष : संगणक विभाग मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 82320.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 82320.00/-

| ***टोनर साठा नोंदवहीतील शिल्लक साठयाबाबतचा ताळमेळ घेतलेला नाही.*** |
|---|

मिरा भाईदर महानगरपालिकेतील संगणक विभागाचे सन 204-2015 चे लेखापरीक्षण करीत असताना, टोनरची साठा नोंदवही तपासली असता खालील नमूद केलेल्या टोनरबाबत तफावत आढळून आल्या, याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.136 दि.21/12/2016 अन्वये विचारणा केली असता अनुपालन अप्राप्त आहे.

अ) सन 2014-15 मधील टोनर साठाबाबत

1) WC-12A Toner : i) प्रत्यक्षात साठा नोंदवहीनुसार मार्च-13 अखेर शिल्लक 15 असतांना एप्रिल-14 रोजीची प्रारंभिची शिल्लक दर्शविली नाही.सबब 15 x रु.1480 = 22200/- वसूलपात्र का करण्यात येऊ नये याबाबत लेखापरीक्षणास साधार स्पष्टता झाली नाही. भाडांर विभागाकडून दि.17/11/2014 रोजी 14 टोनर प्राप्त झाले. याबाबतचे भाडांर विभागाकडील Invoice लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

ii) दि.30/12/2014 रोजीची अखेरची शिल्लक 344 असतांना विभागाने साठा नोंदवहीत 314 अशी दर्शविलेली आहे. (म्हणजे 30 ने कमी दर्शविलेली आहे.) सबब 30 x रु.1480 =44400/- वसूलपात्र का करण्यात येऊ नये, याबाबत विभागाकडून लेखापरीक्षणास साधार स्पष्टता झाली नाही.

iii) सदर 350 टोनर दि.31/01/2015 रोजी प्राप्त झाले असतांना दि.19/11/2014 पासून टोनर वितरीत कसे, याबावत लेखापरीक्षणास स्पष्टता झाली नाही.

2) WC-88 Toner : i) प्रत्यक्षात साठा नोंदवहीनुसार मार्च-13 अखेर शिल्लक 04 असतांना एप्रिल-14 रोजीची प्रारंभिची शिल्लक दर्शविली नाही. सबब 4 x रु.1580 = 6320/- वसूलपात्र

का करण्यात येऊ नये याबाबत लेखापरीक्षणास साधार स्पष्टता झाली नाही. भाडार विभागाकडून दि.17/11/2014 रोजी आवक क्र.545 अन्वये 16 टोनर प्राप्त असून सदर टोनर दि.05/12/2014 पर्यंत वितरीत करून साठा निरंक दर्शविलेला आहे. याबाबतचे भाडार विभागाकडील Invoice लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

ii) दि.30/01/2015 रोजी मे.पॉवर पॉईट काटरेज प्रा.लि. कडून चलन क्र.2567 अन्वये कार्यादेश क्र.मनपा/संगणक/ 203/2014-15 दि.29/01/2015 अन्वये 305 टोनर प्राप्त झाले. दि.05/12/2014 रोजी साठा निरंक असतांना दि.08/12/2014 ते 30/01/2015 कालावधीत एकूण 118 टोनर वितरीत कसे, याबाबत लेखापरीक्षणास स्पष्टता झाली नाही. तसेच दि.01/04/2014 ते 18/11/2014 या कालावधीत वितरीत केलेल्या टोनरबाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

3) WC-53A Toner : i) प्रत्यक्षात साठा नोंदवहीनुसार मार्च-13 अखेर शिल्लक 05 असतांना एप्रिल-14 रोजीची प्रारंभिची शिल्लक दर्शविली नाही. सबब 5 x रु.1880 = 9400/- वसूलपात्र का करण्यात येऊ नये याबाबत लेखापरीक्षणास साधार स्पष्टता झाली नाही..भाडार विभागाकडून दि.17/11/2014 रोजी आवक क्र.545 अन्वये 40 टोनर प्राप्त झाले. दि.01/04/2014 ते 18/11/2014 या कालावधीत वितरीत केलेल्या टोनरबाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

ii) दि.30/01/2015 रोजी मे.पॉवर पॉईट काटरेज प्रा.लि. कडून चलन क्र.2567 अन्वये 02 टोनर प्राप्त झाले. सदर टोनर पुरवठाबाबतचे चलन लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

4) WC-43A Toner : i) एप्रिल-14 रोजीची प्रारंभिची शिल्लक दर्शविली नाही. दि.01/04/2014 ते 16/11/2014 या कालावधीत वितरीत केलेल्या टोनरबाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

ii) दि.30/01/2015 रोजी मे.पॉवर पॉईट काटरेज प्रा.लि. कडून चलन क्र.2567 अन्वये कार्यादेश क्र.मनपा/संगणक/203/2014-15 दि.29/01/2015 अन्वये 02 टोनर प्राप्त झाले. सदर टोनर पुरवठाबाबतचे चलन लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

**वसुलपात्र रक्कम रु.82320 (22200+44400+6320+9400)**

## 53 संगणक विभागातील खरेदी साहित्याबाबींच्या नोंदी साठा नोंदवहीत न घेतल्याबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 02

*लेखा शीर्ष : संगणक विभाग मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9इ*

***खरेदी साहित्याबाबतची नोंद व वितरण याबाबतच्या नोंदी, साठा नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत.***

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील संगणक विभागाचे सन 2014-15 ची साठा नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता खालील बाबींवर साठा नोंदवहीमध्ये जमेच्या व वितरणाच्या नोंदी निरंक आढळून आल्या. परंतु देखभाल दुरूस्ती / खरेदी बाबींवर खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे. तरी अद्यावत साठा नोंदवहीसह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्रं.145 दिनांक 28/12/2016 अन्वये विचारणा केली असता अनुपालन व अभिलेखे अप्राप्त आहेत.

1) वायरलेस ॲक्सेस पॉईंट (WAN)

2) कॅट केबल

3) (पर्जन्य मापक) यंत्र, बायोमॅट्रीक्स मशीन इतर यंत्रे

4) Windows Server

5) Computer Softaware

6) स्पाईगार्ड

7) मॉनिटर

मिरा -भाईंदर महानगरपालिका

*54 भाडे तत्वावर संगणक संच उपलब्ध करून घेतलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष** : 2014-2015
**अनियमितता संख्या** : 8

*लेखा शीर्ष : संगणक विभाग मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 637200.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 637200.00/-

***भाडे तत्वावर संगणक संच उपलब्ध करून घेतलेबाबतची निविदा प्रक्रिया, साठा नोंदवही व अनुषंगिक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.***

मालमत्ता कर विभागाच्या विभागीय कार्यालयाकरीता 08 संगणक संच, कार्यादेश क्र. मनपा/ संगणक /147/ 2012-13 दि.15/11/2012 अन्वये मे.के.जे.एम. ग्रुप सिस्टीम सोल्युशन यांचेकडून प्रतिमाह रू. 2950 प्रमाणे घेण्यात आले आहेत.

सिस्टीम मॅनेजर यांनी सादर केलेली नस्ती तपासता दि.19/12/2012 च्या टिप्पणीनुसार सद्यस्थितीत नवीन संगणक खरेदी करणेपर्यंत सर्व विभागासाठी भाडे तत्वावर संगणक घेण्याबाबत मा.आयुक्तांनी सूचना दिल्या असल्याचे नमुद आहे. सदर भाडे प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.24/12/2012 रोजी मान्यता दिली आहे. याबाबत कंत्राटदाराने Invoice No. KJM/Nov./388/2014-15 Dt.27/11/2014 अन्वये दि.15/11/2012 ते 14/11/2014 (24 महिने कालावधीसाठी) रक्कम रू.566400 संगणक संच भाडयापोटीची मागणी केली आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रं. 131 दिनांक 16.12.2016 निर्गमित करण्यात आला असून विभागाकडून अनुपालन प्राप्त झाले आहे.याबाबत लेखापरीक्षणास पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) संगणक भाडे करारावर घेणेबाबतची निविदा प्रक्रियासंदर्भात अभिलेख उपलब्ध झाले नाहीत.

2) संगणक खरेदीत मोठया प्रमाणात भांडवली गुंतवणूक नसतांना भाडे करारावर संगणक घेण्यामागचे आर्थिक विश्लेषण संचीकेसोबत जोडले नाही. महाराष्ट्र शासनाने संगणकाचे सर्वसाधारण आयुष्य हे 06 वर्षे ठरवले असतांना सरासरी रू.35000 किंमतीचा संगणक दरमहा रू.2950 एवढया चढया दराने घेतल्यामुळे एक संगणकावर 06 वर्षा अंती 6X12X2950=212400 एवढा अवास्तव खर्च होत आहे. सदर दरास मान्यता दिल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

3) कंत्राटदाराशी याकामी केलेल्या करारपत्राची मुळ प्रत उपलब्ध झाली नाही.

4) कंत्राटदाराने मालमत्ता कर विभागास 08 संगणक संच पुरवठा केल्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत.

5) महापालिकेस पुरविण्यात आलेले संगणक संच सुस्थितीत कार्यरत असल्याबाबतचे संबंधितांचे अहवाल नस्तीसोबत संलग्न नाही.

6) संगणक भाडे तत्वावर घेतेवेळी संगणक विभागाकडे शिल्लक असलेल्या संगणक संचाची संख्या (साठा नोंदवही) लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत.

7) संगणक संच भाडे तत्वावर घेण्यात आल्यानंतर खरेदी करण्यात आलेल्या नवीन संगणकांची संख्या व त्याबाबतची निविदा नस्ती, करारनामा, साठा नोंदवही व अनुषंगीक अभिलेख उपलब्ध झाले नाहीत.

8) सिस्टीम मॅनेजर यांनी सिस्टीम प्रोग्रामर यांना पाठविलेले पत्र क्र.217/2014-15 दि.12/02/2015 चे अवलोकन करता कंत्राटदाराने दि.15/12/2012 ते 15/01/2015 या कालावधीसाठी रक्कम रु.637200 संगणक भाडयापोटी मागणी केली आहे. याबाबतचे प्रमाणक उपलब्ध झाले नाही.

आक्षेपाधिन रु.637200

DATVGBM7201 (Ref No : 64, Hmm No : 131)

***55 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतंत "पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प" - भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर चाळघर पर्यंत नाला बांधणे (डावी बाजू)***

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
